THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192909
UNIVERSAL LIBRARY

# अमृतपुलिन.

## सुप्रसिद्ध बगाली कादबऱ्यांची

## सुरस मराठी रूपांतरें


१ [illegible] गमाचा अया या — १ –०

२ गा ा ोरमन — १२ ०

३ ानस या — –१२–०

४ नयुग — १–१२

५ मरम्नी — –१०–०

६ ाम्या सुनराइ — –१० ०

७ मृणा ी — १– ८–०

८ परिणामा हच — १– ८–०

९ अमृ ापु न — १– ४–०

१० यहर नहना — – ६–०

मनोरजक ग्रथप्रसारक मडळी,

गिरगाव, मुबई

मनोरजक ग्रथप्रसारक मडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ३९ वे

# अमृतपुलिन.

शशिन इव दिवातनस्य लेखा
किरणपरिक्षय-धूसरा प्रदोषम् ।
—कुमारसम्भव

लेखक—श्रीयुत सहस्रबुद्धे.

[ प्रथमावृत्ति ]

मनोरजक ग्रथप्रसारक मडळी,

गिरगाव, मुबई

किंमत ०-६-० ]

सर्व हक्क स्वाधीन

[ जाने. १९०९

Printed by B R Ghânekar at the "Nirnaya-sâgar' Press

Bombay.

for the Publisher

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रकाशकाचे दोन शब्द | | ७ |
| प्रकरण १ ले | प्राक्कथन | ९ |
| ,, २ रे | पशुयुद्ध | १३ |
| ,, ३ रे | कोणाच्या गळ्यात ? | १९ |
| ,, ४ थे | सम्राटाची विनति | २१ |
| ,, ५ वे | स्वप्नमय जीवन | २५ |
| ,, ६ वे | चित्रपट | २८ |
| ,, ७ वे | नवे सेनापति | ३४ |
| ,, ८ वे | यांत्रिक परिणय | ३७ |
| ,, ९ वे | प्रेमी मनुष्याचा पुरस्कार | ४० |
| ,, १० वे | मानवी की किन्नरी ? | ४२ |
| ,, ११ वे | वेडीचा पूर्ववृत्तांत | ४५ |
| ,, १२ वे | हिरण्मयी कोठे गेली ? | ४९ |
| ,, १३ वे | चमत्कारिक मागणे | ५२ |
| ,, १४ वे | अम्बरकुमारी | ५४ |
| ,, १५ वे | चांदण्यांत | ५८ |
| ,, १६ वे | सम्राट व राणा | ६३ |
| ,, १७ वे | पितापुत्र | ६५ |
| ,, १८ वे | यमुनेच्या वक्ष स्थलावर | ६८ |
| ,, १९ वे | अर्धांगना | ७० |
| ,, २० वे | गिरिराणी | ७३ |
| ,, २१ वे | गोकुलदास | ७५ |
| ,, २२ वे | गिरिराणीवरचे संकट | ७६ |
| ,, २३ वे | तापसकुमार | ८० |
| ,, २४ वे | वैराग्याचा उपदेश | ८३ |
| ,, २५ वे | रजपूताची रंगभूमि | ८६ |

| प्रकरण | नाव | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रकरण २६ वे | हिरण्मयीचा नूतन वेष | ८९ |
| ,, २७ वे | रजपूत सैनिक | ९२ |
| ,, २८ वे. | प्रतिमाविसर्जन | ९५ |
| ,, २९ वे | सम्राट् आणि बेगम | ९८ |
| ,, ३० वे | चपला व रजपूत सैनिक | १०१ |
| ,, ३१ वे | हे गीत कोण गात ? | १०४ |
| ,, ३२ वे | पवित्र जलात | १०६ |
| ,, ३३ वे. | उपसंहार | ११० |

## प्रकाशकाचे दोन शब्द

प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध वंगकादंबरीकार श्रीयुत ननिलाल बंदोपाध्याय यांच्या 'अमृत पुलिन' नामक कादंबरीचे भाषांतर असून ते इंदूर येथील आमचे मित्र श्रीयुत-सहस्रबुद्धे यांनीं लिहिलें आहे या कादंबरींत दिल्लीपति अकबर, मेवाडाधिपति प्रतापसिंह, सुलताना चांदबिबीप्रभृति कित्येक सुप्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्तींचा मूळग्रंथकर्त्यानें आश्रय केला आहे, तथापि तो केवळ कथानकाच्या सोईसाठीं आणि पुष्टीसाठींच होय ही गोष्ट प्रारंभींच लक्ष्यांत वागविली, ह्मणजे ह्या कादंबरींत क्वचित्प्रसंगीं आढळून येणाऱ्या इतिहासांतील विसंगतपणाचें वाचकाला फारसें महत्त्व वाटणार नाहीं

मनोरंजक ग्रंथप्रारक मंडळीचें कार्यालय, गिरगांव—मुंबई, तारीख १५ जानेवारी, १९०९

**काशीनाथ रघुनाथ मित्र,**
व्यवस्थापक.

# अमृतपुलिन.

## प्रकरण पहिले.

### प्राक्कथन.

सुमारें तीनशे वर्षापूर्वीची गोष्ट. ग्रीष्मऋतूतील एके दिवशीं सायकाळीं अरवलीच्या पश्चिमेकडील क्षितिजात भगवान् सूर्यनारायण प्रवेश करित होता. पर्वताच्या पायथ्याशीं नीलसलिला, तरगशीला वेत्रावती प्रेमविचारात दग होऊन तरगदर्शित स्मितहास्य करित उल्लसितवृत्तीनें व द्रुतगतीने चालली होती. विशालकाय तेज पुज अरवली, आपल्या उन्नतशिरावर तेज:पुज रक्त मुकुट धारण करून सहस्ररश्मीच्या सहस्रवर्णानी आपला वीर देह सुशोभित करित व जवळच वाहणाऱ्या तरगिणीच्या शीतल जलात पादप्रक्षालन करित वीरप्रसू राजस्थानभूमीच्या वीरपुत्राच्या शौर्यगौरवाबद्दल साभिमान उभा होता. प्रेममुग्धा तरगिणी पर्वताच्या त्या तेज:पुज सुदरकातीला हृदयाशी घट्ट आलिंगून मधुर निनाद करित नाचतबागडत होती.

अरे, पण त्या पहा बालक बालिका. या रमणीय वेळीं ही आठ वर्षाची बालिका त्या दहा वर्षाच्या बालकाच्या गळ्यात हात घालून नि:स्तब्ध उभी राहून विषण्णवदनाने पण उत्सुक नेत्रानीं चौफेर दृष्टि फेकून काय पहात असावी बरें? दोघेहि बराच वेळ स्तब्ध उभीं आहेत. पण नाहीं, त्या स्तब्धतेचा बालकानें भग केला. तो विचारित आहे "हिरण! तू आज माझ्यावर काग रागावलीस?"

बालिकेचे ओंठ किंचित् फुरफुरले. किंचित् सरोष दृष्टीनें बालकाकडे पहात तिनें म्हटले "तू माझा मोर कां उडवून लावलास?"

"मी त्याच्याबद्दल तुला पुष्कळसे सुरेख मोर धरून देईन, मग तर झालना ?"

"मला नकोत ते दुसरे मोर! माझा मोर तू का उडविलास, साग ?"

"बरें, मीं जर दुसरा मोर आणून दिला—"

"तर मी टाळी वाजवून त्याला उडवून लावीन. मला तो दुसरा मोर नको, माझाच मला पाहिजे!"

"अन् तुझाच मोर धरून दिला तर!"

"आण कुठ आहे तो—"

बालकानें समोर बोट दाखवून म्हटले "तो बघ!"

बालिकेने पाहिले, तो खरेच! तिचा मोर दूर पर्वतशिखरावर आपला सुदर पिसारा पसरून केकाध्वनि करित नृत्य करित होता जणू काय तो बालिकेला म्हणत होता कीं "हा बघ, मी तुझा मोर! जवळ येऊन ने मला धरून."

दोघानीहि एकमेकाचे हात धरले व तीं मोर धरण्यास धावलीं, परतु त्याना जवळ आलेले पहाताच मोर भर्कन उडून दिसेनासा झाला. बालिका मोरास मोठ्या प्रेमानें आळवून हाका मारू लागली, परतु मोर पुनः म्हणून दिसेना.

हिरणने डोळ्यास पाणी आणून म्हटले "अजय! माझा मोर नाहीं का रे माझ्याजवळ येणार ?"

अजय मोठ्या प्रेमानें हिरणच्या गळ्यात हात घालून तिचे डोळे पुशित म्हणाला "हिरण, रडत्येस का तू अशी ? अग, मी देईन तुझा मोर आणून! तो या पर्वतावर जाऊन बसला, तर मी तिथे जाऊन त्याला धरीन. तो नदींत जाऊन लपला, तर मी पर्वतावरून नदींत उडी मारून त्याला धरीन!"

हिरणने अजयाचा हात धरला व आधीं पर्वताकडे आणि मग नदीकडे पाहिलें. पर्वतावर सायकाळच्या भीषण आकाशाची छाया पसरली होती. त्यामुळे पर्वत त्याच्याकडे रागावूनच पहात आहे कीं काय

असें वाटे. नदीच्या वक्षःस्थलावर अधार पडला होता, अधारांत तिचे तरग फारच भयप्रद वाटत होते. काय! अजय ह्याच पर्वतावर जाणार? याच काळ्याकुट्ट पाण्यात उडी मारणार? बालिका एकदम रडू लागली. भयभीत मुद्रेने ती म्हणाली “नको नको, अजय! मला मोर नको!”

“हिरण! अशी भित्येस का? मी तुझा मोर घेऊन आत्ता परत येतों!”

बालिका रडत रडत म्हणाली “अन् तू या पहाडावरून परत नाहीं आलास तर? या अधारात हरवलास तर? या नदींत उडी मारल्यावर वर नाही आलास तर? तुझ्या पाया पडत्ये, तू नको जाऊ गडे!”

“मग हिरण! आपण उद्या सकाळीं मोरास हुडकू बरें.”

“हो गडे, अन् मोरहि पण अधाराच्या भयान रात्रभर इथच बसेल.”

नदीतीरीं कोणाची चाहूल लागली. आपला मोर आला असे वाटून बालिका आनदाने टाळ्या वाजवित तिकडे गेली, परतु तो तिचा आनद क्षणार्धात नाहींसा होऊन ‘अगबाई!’ अशी तिने एकदम आरोळी ठोकली. कोणी एक वेडी, गाणें गात व टाळ्या वाजवित त्या बालकां-समोर येऊन उभी राहिली. तिने जीर्ण वस्त्रे परिधान केलीं होतीं, सर्वांगास भस्म माखले होते तरी पण पूर्णतारुण्यप्राप्त अशा तिच्या सौदर्यात याने काहींच फरक पडला नव्हता. तिचे विस्तीर्ण ललाट तिच्या अपरिमेय मानसिक शक्तीचा परिचय करून देत होते. विशाल नेत्र मूर्तिमत तेजच ओकत होते.

वेडीने दोघा बालकाकडे एकवार तीक्ष्ण नजरेनें पाहिल्यावर टाळ्या वाजविल्या व विकट हास्य केले. नतर ती म्हणाली “होय, होय, आतां ओळखल तुला! अग तू त्याच डाकिणीच्या पोटीं जन्म घेतलास! —त्याच पिशाची ताराबाईच्या पोटीं तू झालीस!”

भय आणि आश्चर्य याच्या तडाक्यात सापडलेली ती बालिका वेडीकडे पहात व तिचे बोलणें ऐकत तटस्थ उभी होती. बालक आता पुढें सरला व उजव्या हाताची मूठ वळून त्यानें रागानें विचारलें

"कोणग तू? माझ्या हिरणला का शिव्या देत्येस? स्पष्ट साग कायतें, नाहीं तर याच बुक्कीने तुझें डोके फोडीन!"

बालकाच्या या धमकावणीस वेडीचें पहिले उत्तर म्हणजे विकट हास्य! ते संपल्यावर ती म्हणाली "वा·! खूप! काय म्हणालास, तुझी हिरण? तुला ही अवदसा का सुचली? काय! तुझ्या पित्याचा कमलमीरदुर्ग, त्या राक्षसी ताराबाईच व तिच्या पोटच्या कारटीच—ही माझ्या हातांत सांपडल्यावर—रक्षण करण्यास समर्थ आहे? आजपासून जर या कारटीची सगत सोडली नाहींस तर तुम्ही दोघहि एकदम मराल! या काळ्या नदीच्या अथाग पाण्यात दोघहि एकदम मराल! पहा बर, सावधान!"

बोलता बोलतां वेडी टाळ्या वाजवित झपझप पावले टाकून नदीपलीकडे पर्वतावर निघून गेली

दोन्ही बालके नदीतीरावर स्तब्ध बसून राहिलीं. क्रमाक्रमाने निशासमयींचा अधकार तटिनीच्या वक्षस्थलास अधिकाधिक काळिमा आणू लागला. अजय म्हणाला "चल हिरण, आज आता काहीं मोर येणार नाहीं, उद्या सकाळीं आपण त्याला धरू."

बालिका म्हणाली "नाहीं अजय! पुनः मी तुझ्याबरोबर येणार नाही. ती वेडी काय म्हणाली, तू नाहीं ऐकलस?"

बालकाने धिटाईने उत्तर दिले "वेडीच ती! अग, वेडीच्या बोलण्याचे का भय मानतात? ती पळून गेली, नाहीं तर पाहिलें असतें कोण कुणाला नदींत बुडवते ते!"

अजयाने हिरणचा हात धरला व ती हळुहळू राणा प्रतापसिंहाच्या जनकोलाहलपूर्ण व दीपमालाविभूषित कमलमीरदुर्गाजवळ आलीं. दुर्गातील देवालयात वीरगणाच्या सायस्तोत्राच्या पुनरुच्चारणाचा घोष चालला होता. दोघेहि आंत शिरलीं. आतांपर्यंत दोघेहि अगदीं गप्प होतां. दुर्गात शिरल्यावर हिरणनें विचारले "अजय! मघांची ती वेडी कोण?"

---

## प्रकरण दुसरें.

### पशुयुद्ध.

इसवी सनाचे सोळावे शतक, हिंदूंच्या वीरगौरवास आपल्या कडेवर घेऊन कालसागराच्या अगाध लाटात निमग्न झाले होते. यवन-सौभाग्याचा पूर्ण अभ्युदय होऊन अकबर बादशहा हिंदुस्थानचा सम्राट् झाला होता यवन सम्राटाबरोबर, स्वजातीय नरपशूबरोबर आणि भारतवर्षाच्या अदृष्टाबरोबर झगडणारा प्रतापसिह बाप्पारावळादि पूर्वजाच्या समागमसमयाची प्रतीक्षा करित होता प्रतापसिहसूर्य अस्त-मितप्रायच झाल्या कारणाने राजस्थानकमल लीन झाले होते. अधकाराचे साम्राज्य होणार हे पाहताच तेजोनिधि दिवाकरसुद्धा अस्ता-चलाचा आश्रय करून विषण्ण मनाने डोळे मिटतो, हे आपण पाहतच असतो! साराश, वीरवृंदाचे लीलागृह राजस्थान, भयकर कालशस्त्राने जमीनदोस्त झाले होते. रजपूतशौर्याच्या–क्षत्रियमहत्त्वाच्या रगभूमीवर यवनप्रवेश झाला होता साप्रत अरवली पर्वत क्षत्रिय वीराच्या पाद-ताडनानें कपित होत नव्हता, निस्तब्ध रात्री आता नग्या तरवारींच्या खणखणाटाचा किवा वीरजननीच्या शब्दाचा प्रतिध्वनि करित नव्हत्या, ती अतुल स्फूर्ति, तो असीम उत्साह, यावनिक मोहमत्राने भारून टाकिला होता, तर मग आज उदयपुरात हा आनन्दकोलाहल का ? राजवाडा पुष्पहारानी सुशोभित का ?

त्याचे कारण आहे. आज विजयादशमी. भारतसम्राट् अकबर-शहाचा प्रतापसिहाशीं तह होऊन तो स्वतः उदयपुरास आला आहे, आणि म्हणूनच इतक्या कालानतर आज रजपूत राजधानींत हा उत्सव चालला आहे. अनेक वर्षापूर्वी असाच एके दिवशीं–ज्या वेळेस मेवाडचा राजदड यवनपति अल्लाउद्दीनापासून हिसकून घेतला होता, त्या वेळेस–वीरप्रसविणी राजस्थानभूमीच्या वीरतनयगणाचा आनन्द-कोलाहल व अशीच विजयभेरी ऐकू आली होती. त्या वेळेस चितोडच्या

राजवाड्यास असेंच पुष्पहारानें सजविलें होतें. ज्या दिवशीं हिंदूराजसूर्य बाप्पा रावळ राजगुरु ही पदवी धारण करून मेवाडच्या सिंहासनावर आरूढ झाला होता, त्या दिवशीं हीच पंचरंगी पताका आजच्या-प्रमाणेंच पूर्ण उल्लसित अंतःकरणानें चितोडदुर्गाच्या उच्चतम शिखरा-वर आरूढ होऊन मारुतक्रीडा करित होती! आज रजपूतगणांच्या आनन्दसागरास भरती आणण्यासाठींच कीं काय, मादक द्रव्यें यथेच्छपणें आपलें साम्राज्य चालवित होतीं. अकबरशाहाच्या सैन्यांतहि असाच कोलाहल ऐकूं येत होता.

नगरांत या प्रकारें सर्वत्र आनंदीआनंद झाला होता. इकडे नगराच्या पश्चिमेकडील अरण्यांत अरवली पर्वतावर एक हजाराहून अधिक योद्धे एकत्र झाले होते. यांपैकीं अर्धे अकबराकडचे असून बाकीचे रजपूत होते. अश्वांच्या फुरफुरण्यांनीं व हत्तींच्या मदोन्मत्त रवांनीं अरण्य दुमदुमून गेलें होतें. सर्वांचीं मुखमंडलें आनन्दपूर्ण झालीं होतीं. आधीं रजपुतांचा विजयादशमीचा उत्सव, आणखी त्यांत अकबरशाह मेवाडाधिपतीबरोबर मृगया करण्यास आलेला. पशुयुद्धांत आपलें वीरत्व दाखविण्यास सर्व उत्सुक झाले होते. एक तरुण मात्र सर्वांच्या मागें आपल्या घोड्यावर बसून विषण्ण वदनानें रेंगाळत चालला होता. तरुणाचा घोडा मोठमोठ्यानें फुरफुरून, मान बाहेर काढून त्या सर्व स्वारांच्या घोड्यांस मागें टाकावें अशी इच्छा प्रदर्शित करित होता. अश्वाची ही अधीरता पाहून आमचा तरुण शिपाई लगाम जोराजोरानें खेंचून त्याची इच्छा दाबण्याचा प्रयत्न करूं लागला. तरुणानें घोड्याची पाठ थोपटली व म्हटलें "मानवदमन! यवनचरण-स्पर्शास तूं असा अधीर कां होतोस बेटा! बाबा आज्ञा करित नाहींत, मग मी तुला या कोलाहलांत—या पशुयुद्धांत—या पोरखेळांत—कसें नेऊं बरें?"

क्रमाक्रमानें सर्वांनीं निबिड अरण्यांत प्रवेश केला. सर्वांच्या पुढें अकबरशहा व त्याच्या उजव्या हातास प्रतापसिंह होते. प्रतापसिंहानें

एक दीर्घ निश्वास सोडून म्हटलें "दिल्लीश्वर! पहा, या नदीपलीकडे आपणास श्वेतपाषाणनिर्मित स्तंभराशी दिसते काय? याच जागीं एके दिवशीं रजपूतवीरवृंदानें या पुण्यभूमीकरितां राणा संग्रामसिंहाबरोबर आपले पितामह बाबरशहाशीं लढून प्राणाहुती दिली होती. आणखी तो पहा, दूर पर्वतशिखरावर अगदीं जीर्णावस्थेंत असलेला वाडा! याच प्रासादशिखरावर आरोहण करून देवी मीराबाईनें वीररमणीं-सांगातीं गाणीं गाऊन रजपूतवीरगणांस युद्धास प्रवृत्त केलें! पण हाय! तें सर्व आतां कालमुखांत लोपून गेलें!"

अकबरानें गंभीरपणें उत्तर दिलें "राणासाहेब! मीं याच अरण्यांत-याच क्षत्रियशौर्याच्या रंगभूमीवर—या सर्वांपेक्षां उच्चतर कीर्तिस्तंभ पाहिला आहे! याच प्रस्तरराशीच्या मागल्या बाजूस वीरश्रेष्ठ प्रताप-सिंहानें फक्त दोनशेंच लोकांच्या सहाय्यानें सहस्राधिक मोंगल लोकांचा पराभव केला आहे. आणि एके दिवशीं छद्मवेषी अकबराच्या अहंकाराचें याच पर्वताच्या पायथ्याशीं शूर प्रतापसिंहाच्या शौर्यानें खंडण केलें आहे. या विजन अरण्यांतील प्रत्येक स्थान, या अरवली पर्वताची प्रत्येक शिला, वीरकेसरी प्रतापसिंहाच्या शौर्याचें स्मृति-चिन्हच होय! या पृथ्वीतलावर प्रतापसिंहासारखा वीरपुरुष केव्हांहि व कोठेंहि अवतरणार नाहीं!"

प्रतापसिंहाचा भालप्रदेश संकुचित झाला. नेत्रांचा विस्तार झाला. त्यानें उत्तर दिलें "दिल्लीश्वर! हेंच जर मीं दुसऱ्या कोणाच्या तोंडून ऐकलें असतें, तर मग मला हर्ष किंवा खेद यांपैकीं कांहींच वाटलें नसतें! प्रतापसिंह नेभळा नसता, प्रतापसिंह सूर्यवंशांत जन्म घेऊन कुलांगार झाला नसता, तर त्यानें आपलें स्वातंत्र्य दिल्लीश्वरास कधींहि विकलें नसतें! आज या स्वर्गरूप मेवाड भूमीवर मोंगलसैन्याच्या चरणरेणूंची छाया कधींहि पडली नसती!"

अकबरशहा म्हणाला "राणाजी!. आपण चुकतां. ईश्वरसाक्ष या भुवनविदित प्राचीन वंशाचें स्वातंत्र्य हरण करावें, हा अकबराचा

मुळींच उद्देश नाहीं! दिल्लीश्वर आपला मित्र, त्याचें मन इतकें हलकें आहे ही कल्पनासुद्धा मनात आणू नका. उभय जातींनी पूर्ववैर विसरून जातीजातींतील वैरभाव पार गिळून एकमेकाच्या हातात हात घालावे व भारतसाम्राज्याचा कोट मजबूत करावा, हीच माझी इच्छा आहे."

प्रतापसिंहानें दीर्घनिश्वास सोडून म्हटले "जर हिंदूच्या अदृष्टात तसेच लिहिले असेल, जर मातृभूमीच्या रक्षणाकरिता क्षत्रियवीरास यवनापाशीं अशी भिक्षा मागण्याचा प्रसग यावा अशी ईश्वराची इच्छा असेल, तर अकबरास लवकरच यशप्राप्ती होईल."

अकस्मात् प्रतापसिहाने पर्वताकडे पाहून मोठ्याने म्हटले "दिल्लीश्वर! आज या भारताच्या भावी नशिबाची परीक्षा आहे तो पहा पाढरा महिष! त्याच्या हातूनच आज आपण हिदूयवनाच्या नशिबाची परीक्षा पाहू. जर आज या विजयादशमीच्या दिवशीं—भगवती सिंहवाहिनीच्या दैत्यविजयोत्सवाच्या दिवशी—कोणी हिदू या महिषाशीं एकटा लढून सूर्यास्तापूर्वी याचा सहार करील, तर हिन्दूसौभाग्यरवीच्या अस्तास अझून विलब आहे हे निश्चित समजा आणखी, जर कोणी यवन ही गोष्ट करील तर राजपुतान्याच्या राज्यलक्ष्मीने मेवाड सोडले, हे निश्चित!"

बोलता बोलता मेवाडाधिपतीचे मुखमडल आशेने, उत्साहानें व अभिमानाने लाल झाले त्याचे विशाल नेत्र अनलज्योतिपूर्ण व तेजः-पुज दिसू लागले त्याने तीव्र दृष्टीने हिदू वीरगणाकडे पाहिले. मोगल सम्राटाने आपल्या सैन्याकडे पाहून त्या रेड्याचा पाठलाग करण्यास इषारा केला. मोगलाच्या 'आल्लाईलआल्ला' व रजपुताच्या 'जय हर जय हर' शब्दानीं दशदिशा दणाणून सोडल्या. दोन्ही बाजूकडील वीरांनीं आपले घोडे भरधाव फेकले. सर्वांच्या मागून चालणाऱ्या तरुणाच्या कर्णातहि प्रतापसिंहाच्या गभीरवाणीने प्रवेश केला. त्यानें घोड्याचा लगाम सैल सोडून त्याच्या पाठीवर थाप मारली. घोडा वायुगतीनें सुटला. आपला पाठलाग करित येणाऱ्या स्वारास पाहून महिषहि पळू लागला व कोठेंतरी जाऊन लपला.

सूर्यास्ताची वेळ समीप आली होती. अरण्याचा एक भाग अगदीं जनशून्य. केवळ एक तरुण व्याकुल चित्ताने चाऱ्ही दिशाकडे पहात होता. त्याची दृष्टि क्षणोक्षणीं अस्तास जाणाऱ्या सूर्याकडे वळत होती. तरुण आपल्या घोड्यास म्हणाला "मानवदमन! आज मी उदयपुरात कसे तोंड दाखवू? सूर्यास्तापूर्वी या पशूचा प्राण घेईन ही माझी लहानशी प्रतिज्ञा आज विधाता पूर्ण होऊ देत नाहीं ना? आतापर्यंत त्याचा पाठलाग केला, क्षणभर सुद्धा डोळा चुकवू दिला नाहीं, आणखी आताच तो कुठे जाऊन लपला?"

एकाएकीं जवळच जगलात त्या महिषाचा आवाज व त्याच्याशीं लढणाऱ्या मनुष्याचा शब्द ऐकू आला. आश्चर्यचकित होऊन तरुणाने आपला घोडा तिकडेच फेकिला. काट्यातून जाताना त्याचे अग बरेच ओरखडले गेले, व त्याच्या मानवदमनाचा श्वेत देह रक्ताने लोहितवर्ण झाला. थोडकेच दूर गेल्यावर तो पशु एका घोडेस्वारावर चवताळून धावून जात आहे, असे त्याच्या दृष्टीस पडलें. घोडेस्वारसुद्धा तरवार सावरून त्याच्या येण्याचीच वाट पहात होता. घोडेस्वार म्हणजे स्वतःच भारतसम्राट अकबरशहा! तरुणाने हातपाय गाळले. अकबरशहा आज महिषाचा प्राण घेणार, ही त्याची खात्री झाली. पण अकबरशाहा आता तरवारीने महिषाच्या मस्तकावर वार करणार, इतक्यात त्याच्या घोड्यानें भीतीने उडी मारली. त्यासरशी त्याची तरवार जवळच्या झाडाच्या फादीवर लागून फादीचे दोन तुकडे झाले! इकडे महिषाच्या शिंगानी घोड्याचे पोट फाडले अकबराचा चेहरा पाढरा फटफटीत झाला. बादशहाचा राग अनावर होऊन त्यानें त्या झाडाची दुसरी फादी तोडली! महिषाचा उत्साह द्विगुणित होऊन तो अकबरावर धावून गेला, पण इतक्यात तरुणानें आपला घोडा दोघाच्या मध्ये टाकला. आता महिषाने आपला मोर्चा नवीन शत्रूवर फिरविला. तरुण हसून म्हणाला "दिल्लीश्वर! रजपूत वीर पशूशीं कसे लढतात–पहा!"

बोलता बोलता तरुणाने महिषाच्या मस्तकावर लाथ मारली व आपली तरवार म्यानात घातली टण्दिशीं उडी मारून तो महिषाच्या पाठीवर बसला व दोन्हीं हातानी त्याचीं शिंगे त्यानें घट्ट धरून ठेवलीं. मग तो म्हणाला "पहा पहा, यवनराज! मी केवळ याच रीतीने मुष्टिप्रहारानीच या रेड्याचा प्राण घेऊ शकेन, परतु हा पहा सूर्य मावळत आहे. सूर्यास्तापूर्वी रेडा मारला पाहिजे अशी राणाजींची आज्ञा आहे, आणि म्हणूनच ही पवित्र तरवार आज पशुरक्ताने दूषित करावी लागत आहे!"

तरुणाने पुनः म्यानातून तरवार बाहेर काढली. महिषाच्या विशाल देहाने भूमिमातेस आलिंगन दिले. मोगलबादशहा चकित अतः-करणाने त्या महिषाकडे व त्या क्षत्रिय तरुणाच्या कोमल शरिराकडे पहात राहिला, व मग भेरी वाजवून आपल्या अनुचरास जवळ येण्यास त्याने सज्ञा दिली. हिदूमुसलमानानी भेरी ऐकताच तिकडेसच घोडे सोडले, परतु या सर्वांच्या आधींच राणा प्रतापसिह तेथे येऊन पोहोचला. त्याचें मुखमडल अस्तास जाणाऱ्या सूर्याप्रमाणे रक्तिमवर्ण झाले होते, व डोळे खदिरागाराप्रमाणे लाल होऊन गेले होते. राण्यानें सर्वांगास आळेपिळे देऊन म्हटले "शाबास यवनवीर! मेवाडच्या राज्यलक्ष्मीने मेवाड सोडले, त्याला हेच प्रत्यक्ष प्रमाण! आज हा वन्य महिष यवनशस्त्राने मारला गेला—हेच त्याला प्रमाण!"

अकबरशहाने हसून उत्तर केले "मेवाडराज! आपण राज-स्थानाच्या भावी दैवाला का दोष देता? या वीर रजपूत तरुणाने आजचा पण जिंकला. याचे शौर्य पाहून मी थक्क झालो. हा अतुल साहसी, शूर तरुण कोण बरें राणाजी?"

अभिमानयुक्त वाणीने प्रतापसिंहाने उत्तर दिले "हा तर माझा धाकटा बाळ अजय!"

## प्रकरण तिसरे

## कोणाच्या गळ्यांत ?

उदयपूरच्या राजवाड्याला दीपमाला शोभा देत होत्या. सज्जावर दोघी रमणी उत्सुक अंत:करणाने मृगयेस गेलेल्या वीरगणाची मार्गप्रतीक्षा करित उभ्या होत्या. त्यापैकी एक राणा प्रतापसिहाची कन्या कमलावती व दुसरी तिची समवयस्या ग्वाल्हेरची राजकन्या हिरण्मयी. ग्वाल्हेरचे राजे म्हणजे यवनसंग्रामात प्रतापसिहाचा केवळ उजवा हात! जेंव्हा ग्वाल्हेराधिपतीने मोगलाशीं लढताना धारातीर्थी देह ठेविला, तेंव्हापासून हिरण्मयीला जीव कीं प्राण समजून प्रतापसिहाने तिला लहानाची मोठी केली होती. बाळपणापासूनच हिरण्मयीचे व कमलावतीचे फार सख्य असे. दीपमालाच्या प्रकाशाने दोघीच्याहि मुखमडलास विशेषच शोभा आली होती. तारकामय आकाशात जणू हे शशिद्वय उदयास आले आहे, असा पहाणारास भास होई. कमलावती म्हणाली "हिरण्मयी! तू आज सगळा दिवस कुठ होतीस ? तू आज एकदासुद्धां दृष्टीस पडली नाहींस!"

हिरण्मयीने उत्तर दिले "मी हा हार गुफित बसल्ये होत्ये."

कमलावतीने मृदुहास्य करून विचारले "कोणाच्या गळ्यात घालणार आहेस हा हार ?"

"जो वीर आज सर्वांहून अधिक शौर्य गाजवील, त्याच्या !"

"शाबास आहे बाई तुझी! पाचशे क्षत्रिय आणखी पाचशे मुसलमान मृगयेला गेले आहेत, अन् ते सगळेच शूर! त्यात कुणाच नशीब प्रबळ कुणास ठाऊक ? जर एखाद्या मुसलमानानच शौर्य दाखविल, तर ?"

"सिंहास माग टाकून कोल्हा शूर होऊ शकेल, मेवाडची रक्षणकर्ती भगवती सिंहवाहिनी मिथ्यावादिनी असेल, तर हा हार ज्याच्याकरितां गुफिला आहे त्याच्या गळ्यात पडणार नाहीं!"

कमलावतीनें हिरण्मयीच्या हातून तो हार घेतला व म्हटलें "अग, यांत तर तू माझ्या दादाच नाव गुफल आहेस! आज दादाच यशस्वी होणार, हे तू कस ओळखलस ?"

हिरण्मयी काहीं वेळ कमलावतीच्या तोडाकडे पहात राहिली. नतर म्हणाली "ऐक. काल माझ्या स्वप्नात देवी आली व तिन हसऱ्या प्रेमपूर्ण दृष्टीन माझ्याकडे पाहून मला विचारल 'या सगळ्या क्षत्रिय-वीरात माझ्या प्रीतीतला अन् सर्वांहून शूर कोण आहे ?' मीं सागितल 'अजय!' देवीन हसून म्हटल 'खर बोललीस तू वीर अजयसिह माझा सर्वांत लाडका त्याच्याकडूनच मी आज अकबरास चकित करविणार आहे' मला तिन तो महिष दाखविला त्याला पाहून मी भयभीत झाल्ये. हात जोडून मीं देवीला विनति केली 'आई जगदबे! माझी विनति ऐक. अजयाला ह्या भयकर पशूबरोबर लढण्यास लावू नकोस.' देवीन कपाळाला आठ्या चढवून माझ्याकडे रागान पाहिल व अजयाला त्या महिषाशीं लढण्याला नेत्रसकेत केला. अजय हसतहसत पुढ झाला व त्यान क्षणार्धात आपल्या शत्रूचा वध केला. हे पाहून मी आश्चर्यचकित होऊन अधीरतेन अजयाच्या गळ्यात हार घालायला पुढ झाल्ये, तोच देवीन माझ्याकडे पाहून गभीरवाणीन म्हटल 'हिरण्मयी! अजयसिहाच्या अगास हात लावू नकोस! तू क्षत्रियकन्या असून रजपूतवीरास अगवळणीं पडलेल्या शस्त्राघातास भित्येस— तू अजयास स्पर्श करण्यास योग्य नाहींस! नीट ध्यानात धर.' हे ऐकून माझ्या अगावर काटा उभा राहिला. मीं माग सरून लाबूनच अजयसिंहाच्या अगावर हार फेकिला. अजयान हास्यवदनान तो झेलला व गळ्यांत घालणार तो तरवारीस लागून त्याचे दोन तुकडे झाले व तो विसकटलेला हार भुईवर पडला सिंहवाहिनी माझ्याकडे पाहून हसली व अतर्धान पावली."

हिरण्मयीच्या डोळ्यांस पाणी आलें. तिनें दीर्घ निःश्वास सोडून म्हटलें "कमल! तुझ्या दादाच्या अगास हात लावण्याइतकी नसेल

माझी योग्यता! हे स्वप्न खर कीं खोट हे आताच कळून येईल. ही बघ, आली सर्व मडळी परत."

कमलावती म्हणाली "हिरण! तुझ स्वप्न खरच गडे! हा पहा, भगवतीचा लाडका अजयसिंह गळ्यात जयमाला घालून येत आहे! आणखी हे पहा, बाबा त्याच्याकडे कसे अभिमानान पहात आहेत."

वीरगण तारामडलास आपल्या जयध्वनीचा प्रतिध्वनि करावयास भाग पाडित होते. पचमहाभूतें जणू काय आज अजयाचा जयजयकारच करित आहेत, असा भास होत होता. चद्र आपल्या शीतल किरणानी त्या शूर योद्ध्यास मगलस्नान घालित होता. जसा आकाशात तारागण —तसाच पृथ्वीवरहि पण तारागण! स्वारी राजवाड्याखालीं आली हिरण्मयीच्या अतःकरणात जयाची दुदुभी झडू लागली. तिचें शरीर पुलकित झाले. तिच्या हातास आता आपण ही माळ अजयसिंहाच्या गळ्यात केंव्हा घालूं, असे झाले. हिरण्मयीने अजयसिहाच्या शिरावर पडेल अशा बेताने माळ फेकिली. पण हाय! **'दैवमन्यत्र नीयते!'** माळ अजयाच्या गळ्यात न पडता त्याच्या खाद्यावर पडून तेथून उडून एका लाब दाढीच्या व एक डोळ्याच्या मुसलमानाच्या मस्तकावर जाऊन पडली. एकाक्ष यवनाने आपला डोळा वर फिरवून व हसून हात जोडून सलाम केला व माळ गळ्यात घातली.

कमलावतीच्या अगावर रोमाच उभे राहिले. तिने किंकाळी फोडून म्हटले "हायहाय सर्व नाश झाला! कोणाच्या गळ्यात?"

---

## प्रकरण चौथे.

## सम्राटाची विनंति.

रजपूत व मुसलमान वीर आपापल्या घोड्यावरून उतरून वाड्यांत शिरले. राणा प्रतापसिंह व अकबर मात्र घोड्यावरून उतरून हळुहळू शहराकडे चालू लागले. अकबरशहा म्हणाला "राणाजी! माझ्या म्हणण्यास आपला रुकार कां पडत नाहीं?"

"आपले मागणे अगदीं असभवनीय आहे! माझ्या उतार वयांत आपण माझ्या पासून माझ्या लाडक्यास दूर नेण्यास इच्छिता ?"

"आपण विचार करून पहा. माझे म्हणणे उभयपक्षास मगलकारक आहे आपल्या पुत्राच्या शौर्यौदार्यादि गुणाशीं आज माझा चागलाच परिचय झाला आहे. दिल्लीच्या सरदार मडळींत राहून त्याच्या गुणात चागली भर पडेल."

"काय, यवनदरबारात राहून बाप्पारावळाच्या वंशजाने सद्गुण शिकावेत ? अकबरशहा! माझ्या काळजाला घरे पडतात या आपल्या बोलण्याने."

क्षणभर अकबराचा चेहरा लालभडक झाला, पण आपला तो क्रोध आतल्या आत दाबून बळेच हास्यमुख करून त्याने उत्तर दिले "राणाजी, आपल्या पुत्रास जवळ ठेवून मी त्याला यावनिक आचारविचार शिकवीन, असे तुम्हाला वाटते काय ? अकबर हा रजपुताचा पक्षपाती नाहीं, असे या भूतलावर कोण म्हणणारा आहे ?"

मागून कोणीसे बोलले "मेवाडराज! दिल्लीश्वर यथार्थ बोलतात. प्रसगीं कोकिलासहि कावळ्यापाशीं शिकावे लागते!"

प्रतापसिंहानें आगतुकाकडे क्रोधयुक्त दृष्टीने पाहून म्हटले "तू रे कोण ?"

ब्रह्मचारीवेषी आगतुकानें प्रतापसिहासमोर येऊन आशीर्वाद देऊन म्हटले "राणाजी! क्षणभर मन:सयमन करून या ब्रह्मचाऱ्याचे म्हणणे ऐकून घ्या. आज सध्याकाळीं मी उदयसरोवराच्या कांठीं, राणा उदयसिहाच्या देवळाच्या पाठीमागे भवानीपतीच्या ध्यानात मग्न होतो. तोच आकाशात त्रिशूलधारी दिगबरमूर्तीचा छायापात झाला. ती मूर्ति गभीरवाणीने म्हणाली 'एक दिवस हेच वीरवृदाचें निकेतन, हीच पुण्यभूमि स्मशानासारखी भयाण होईल! ग्वाल्हेरची राजकन्या हिरण्मयी हिच्याशीं आपल्या पुत्राचा विवाह करण्याचा

प्रतापसिंहाचा विचार आहे, तर तू आताच जाऊन त्यांनां साग कीं, त्यानी हा विचार सोडावा अशी माझी इच्छा व आदेश आहे."

"तू कोणी कपटी, भोदू दिसतोस!"

प्रतापसिह आणखी म्हणाला "माझ्या वीरश्रेष्ठ मित्राच्या रूपगुणयुक्त कन्येशीं मीं आपल्या मुलाचे लग्न करण्याचा विचार केला आहे हे भवानीश्वरास आवडणार नाहीं काय?"

ब्रह्मचाऱ्याचा चेहरा पूर्ववतच गभीर राहिला तो म्हणाला "मी देवाधिदेवाच्या आज्ञेप्रमाणे त्याचे सांगणे आपणास निवेदन केले आहे; आता आपणास वाटेल ते करा. पण सावध रहा, भवानीपतीची आज्ञा मोडून सर्वनाशास कारणीभूत होऊ नका!"

इतके बोलून उत्तराची प्रतीक्षा न करिता ब्रह्मचारी झपाट्यानें निघून गेला. काही काळ प्रतापसिंह निःशब्द उभा राहिला. नतंर म्हणाला "दिल्लीश्वर! अपरिचित ब्रह्मचर्यवेषधारी या पाखड्यावर मी विश्वास ठेवीन, हे मनातसुद्धा आणू नका! आपले मागणे मी कबूल करितों. आता चला माझ्या महालात, आपण थोडी विश्राति घेऊ. उद्या सकाळीं अजयाला आपल्याबरोबर जायचें आहे पण हे त्याला अझून माहीत नाहीं. तेव्हा ते त्याला कळविले पाहिजे."

उभयतानीं महालात प्रवेश केला. प्रतापसिंहाने अजयास हाक मारिली. पितृभक्तिपरायण अजय आपल्या पित्याने स्वीकारलेल्या खडतर व्रतात त्याची सेवा करण्यास तत्पर असे. तो नेहमीं प्रतापसिंहाच्या महालात हजर असे. वडिलाची हांक ऐकताच अजय प्रतापसिंहासमोर हात जोडून उभा राहिला. प्रतापसिह म्हणाला "बाळ अजय! दिल्लीश्वर आज तुझें शौर्य पाहून खुष झाले आहेत. अन् तू त्यांच्याजवळ राहून त्याना सहाय्य करावेस अशी त्याची इच्छा आहे."

अकबरशहा म्हणाला "कुवरजी! आज तुम्हीं माझे प्राण वाचविलेत, या उपकाराची फेड करणे केवळ अशक्य आहे! तरी पण आपली जी जी

म्हणून इच्छा असेल ती पूर्ण करण्यास हा आपला ऋणी अकबर प्राण खर्ची घालण्यास तयार आहे."

अजयसिंहानें आश्चर्ययुक्त मुद्रेनें प्रतापसिंहाकडे पाहिलें व अकबरास म्हटलें "यवनराज! आज आपले प्राण वांचवावेत म्हणून कांहीं मीं त्या जंगली रेड्यास मारिलें नाहीं. तर बाबांची आज्ञा पाळण्याकरितां म्हणून मी इच्छा नसतांनासुद्धां आज यवनसेनेबरोबर मृगयेस गेलों. बाबा! आपल्याशीं मी जें कांहीं शिकलों, त्याचा परिणाम हाच का?"

प्रतापसिंह म्हणाला "बाळ! तुझ्या मनांतला हेतु मी समजलों. पण विधात्याची इच्छा अखंडनीय आहे. अकबरशहांनांहि पण माणसांची परीक्षा आहे. मेवाडच्या राजपुत्रानें क्षत्रियकुलकलंक मानसिंहाप्रमाणें यवनदास्य करावें, असें त्यांच्या मनांत नाहीं. तेंव्हां मीं पुष्कळ विचार करून त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला आहे."

अजयसिंहानें मस्तक लववून पित्याची आज्ञा मान्य केली. प्रतापसिंह पुढें म्हणाला "आणि तुझ्या आईच्या सांगण्याप्रमाणें हिरण्मयीशीं तुझें लग्न करून देणाचा माझा विचार आहे; पण कांहीं कारणामुळें ही गोष्ट लांबणीवर टाकावी लागत आहे. जेंव्हां बेत ठरेल तेंव्हां तुझ्याकडे दूत पाठवीन."

एकाएकीं अजयसिंहाचें मुखमंडल प्रफुल्लित झालें; पण लगेच त्याच्यावर खेदाची छाया पडली. तो बाहेर जाण्यासाठीं म्हणून चालूं लागला, तोंच राण्यानें त्याला म्हटलें "बाळ अजय! तूं उद्यां आग्र्यास जाणार. तेंव्हां तुझी भेट पुन्हा कधीं होईल हें सांगवत नाहीं; परंतु तुला दोन गोष्टी सांगतों त्या पाळण्यांत मात्र हयगय करूं नकोस. एक तर यवनांस सहाय्य करून हिंदूंबरोबर युद्ध करूं नकोस, व दुसरी हातांत तरवार धरल्याशिवाय यवनाला स्पर्श करूं नकोस! जा आतां, वाड्यांत जा."

अजयसिंह विषण्ण वदनानें शयनमंदिराकडे जाण्यास निघाला.

---

## प्रकरण पांचवें.

## स्वप्नमय जीवन.

दोन प्रहर रात्रीचा सुमार. अजयसिंह आपल्या खोलीची खिडकी उघडी टाकून आकाशाकडे टक लावून पहात होता. आकाशांत चंद्र विलसत होता, मेघहि नव्हते; तरी पण सर्वत्र अंधकारमय दिसत होतें. अवनी निःस्तब्ध होती. श्वासनिश्वासाशिवाय कसलाच शब्द ऐकूं येत नव्हता. क्वचित् आलाच तर घूकांचा अमंगलसूचक चीत्कार कानीं येई. अजयसिंहानें कितीकदांतरी याच खिडकींतून, अशाच अंधकारपूर्ण रात्रींकडे पाहिलें असेल; पण आकाशांत चंद्र प्रकाशत असतां आणि एकहि ढग नसतां असा अंधकार त्याच्या कधींच दृष्टीला पडला नव्हता! भीति, कीं विषाद, यांपैकीं त्याच्या हृदयास काय टोंचत होतें, हें त्याला कांहींच कळेना! जणूं काय त्याच्या अंतःकरणांतहि या कालिमामय रात्रीचें प्रतिबिंबच पडलें होतें. त्यानें दीर्घ निश्वास सोडून म्हटलें "मी क्षत्रिय-वीर-क्षात्रसूर्य प्रतापसिंहाचा पुत्र. असें असतां आज या सृष्टीच्या भेसूर स्वरूपाकडे पाहून माझें मन असें कां बरें कचरावें?"

त्यानें स्वतःचा धिक्कार केला व खिडकी बंद करून घेऊन तो शय्येवर येऊन पडला. पण काय? तेंच अंधकारपूर्ण आकाश—तो घोर अंधार त्याच्या डोळ्यांपुढें दिसूं लागला! जणूं काय या जगतांत आणखी दुसरें कांहींच नाहीं! केवळ अनंतव्यापी अंधार व त्याच्यावर अनंत आकाश! खालीं, वर, मागें, पुढें कालिमामय काळेंकुट्ट आकाश!

त्यानें डोळे मिटले. पण आतां तर पूर्वीचा भयंकर अंधार अधिकच भयंकर भासूं लागला. आधींच काळा असलेला आकाशाचा रंग अधिकच काळाकुट्ट दिसूं लागला. इतक्यांत आकाशपटावर एक सौंदर्यमयी मूर्ति चित्रित झाली. ती त्याची शैशवसखी हिरण्मयी. हळुहळू हिरण्मयीची सुवर्णकांति अंधारांत विलीन होऊं लागली. पहातां पहातां हिरण्मयीच्या वपूचा अंधाराशीं एकजीव झाला. अजयसिंह चकित होऊन उभा राहिला, व चंचल पदांनीं तो खोलींत

येरझारा घालू लागला. तो आपल्याशींच विचार करू लागला "आजच्या या चित्तचाचल्याचे कारण काय असावे बरे? भावी अमगलाचे हे सूचक तर नसेल? भविष्यत् अदृष्टाच्या भीतीने मी कधींच गागरलो नव्हतो! अमगलाशीं झगडणे हे तर आम्हा क्षत्रियवीराचे कर्तव्य आहे मी येथून गेल्यावर हिरण्मयीवर सकट तर येणार नाहीं ना? सकट येणार असल्यास कोणते येणार? आपण जवळ असलो तर तिचे सकट दूर करता येईल तर मग अकबराबरोबर जाण्याचे नाकारावे? नाहीं! क्षत्रियपुत्र होऊन पित्याची आज्ञा मोडायची? वचनभग करायचा? छत्!"

तो पुन्हा जाऊन शयनावर पडला. पण काय? सारखी तळमळ! किती तरी वेळाने त्याचा किंचित् डोळा लागला. पण तेथेतरी स्वस्थता कोठे होती? झोपेत त्याने पुढील स्वप्न पाहिले. एक वेडी विकटहास्य करित त्याच्यासमोर आली. दहा वर्षांपूर्वी एके दिवशीं सायकाळीं अरवली पर्वतावर हिरण्मयीचा मोर धरून देण्यास अजयसिह गेला होता, त्या दिवशीं हीच वेडी अशीच हसत हसत त्याच्या समोर येऊन उभी राहिली होती. वेडी म्हणाली "तूच ना या वेडीच्या हातून हिरण्मयीच रक्षण करण्याची प्रतिज्ञा केली होतीस? आता कुठ आहेस तू अन् कुठ आहे तुझी हिरण! ही पहा—"

वेडी आकाशाकडे बोट दाखवून आवेशाने म्हणाली "ही पहा—तुझी लाडकी हिरण अधकाराच्या भयकर जाबाड्यात सापडली आहे! आता कोणता वीर तिला सोडवितो, ते पहात्ये!"

बोलता बोलता वेडी हसत हसत अदृश्य झाली. अजयसिंहाची झोप उघडली. त्याने उठून सगळीकडे पाहिले, पण खोलींत दुसरें कोणीच नव्हते. तेव्हा त्याला समजले कीं, आपण पाहिले ते निव्वळ स्वप्न! झोप यावी म्हणून त्याचे पुन्हा यत्न सुरू झाले, पण इतक्यात उजव्या बाजूकडील मदिरातून कोणा तरी स्त्रीची भययुक्त किंकाळी ऐकू आली. या मदिरात अजयसिहाची बहीण कमलावती व हिरण्मयी

निजत असत. किंकाळी ऐकताच ही हिरण्मयीच ओरडली, हे अजयसिंहाने तत्काळ ओळखले इतक्यात याच वेळेस आकाशात कोणाच्या तरी टाळ्याचा व कोणाच्या तरी हास्याचा प्रतिध्वनि झाला. त्याच वेडीच्या ह्या टाळ्या! त्याच वेडीचे हे हास्य! केवढ्या आश्चर्याची गोष्ट! मग आपण पाहिले ते स्वप्न नव्हे तर? अजय स्तंभितच झाला!

लगेच तो मंदिराच्या दाराशीं आला व त्याने मोठ्याने विचारले "कमल! काय झाले ग?"

कमलावतीने कापऱ्या आवाजाने उत्तर दिले "दादा! इकडे ये, हिरण स्वप्नात भ्याली आहे"

अजय मंदिरात गेला. पहातो, तो हिरण्मयी कमलावतीच्या वक्षःस्थलावर मुखकमल ठेवून रडत आहे तिची सुकुमार देहलता वाऱ्यानें हालविलेल्या माधवीलतेप्रमाणे कापत होती. अजयानें विचारले "हिरण! काय झाले तुला?"

हिरणचे डोळे विधुकरस्पर्शाने उल्लसित होणाऱ्या कुमदिनीप्रमाणे विकसित झाले आपल्या बुभुक्षित नेत्रानी एकवार अजयसिंहाकडे पाहून तिने विचारलें "अजय! खर साग, तू बादशहाबरोबर आग्र्यास जाणार का?"

आजपर्यंत अजयसिंहाने असे विषादामुळे मधुर व निराशेमुळे कोमल शब्द हिरण्मयीच्या तोंडून कधींहि ऐकले नव्हते. असे भावनामय आणि म्हणूनच प्रेमस्निग्ध, असे विषादपूर्ण आणि म्हणूनच सुधामय प्रेमकटाक्ष फेकताना अजयानें हिरणच्या डोळ्यास कधींहि पाहिलें नव्हते. त्यानें विचारले "तुला कोणी सागितले हिरण?"

हिरणच्या डोळ्यानीं पुन्हा तसेच प्रेमकटाक्ष फेकिले. तिच्या मुखातून पुन्हा तसेच प्रेमस्निग्ध मधुर शब्द बाहेर पडले. "अजय! दहा वर्षापूर्वीं एके दिवशीं सध्याकाळीं आपण नदीतीरीं पहाडात खेळत असतांना आपल्यासमोर एक वेडी आली होती, तें तुला आठवत?

तीच आज माझ्या स्वप्नात येऊन मला म्हणाली 'का? आता माझ्या हातातून तुला कोण सोडवत ते पहात्ये! आता कुठ आहे तुझा अजय अन् कुठ आहेस तूं? उद्या तुझा अजय तुला सोडून आग्र्यास जाणार?' मी मोठ्यान ओरडून जागी झाल्ये व ती वेडी विकट हास्य करित व टाळ्या वाजवित आकाशात निघून गेली."

अजयसिहाच्या अगावर शहारे आले! हिरण्मयीचे सात्वन कसे करावे, हे त्याला काहीच समजेना. त्याने आपल्या त्या शैशवसखीचे ते विषादमय–अमृतमय अधर, ते नैराश्यमय–आदरमय नयन डोळे भरून पाहिले. पण लगेच अश्रुधारानी त्याची दृष्टि अध केली. लगेच तो उठून उभा राहिला तोड फिरवून तो कमलावतीस ह्मणाला "कमल! हिरणचे सात्वन कर. भिण्याचे काही कारण नाही, मी आग्र्याहून लवकरच परत येईन."

इतके बोलून अजयसिह झपझप पावले टाकित तेथून निघून गेला. आपल्या शयनमदिरात आल्यावर तो स्वतःशीच म्हणाला "काय, हे सर्व स्वप्नच ना? विधात्या! मनुष्यजीवन स्वप्नमयच का?"

---

## प्रकरण सहावे
## चित्रपट

वाचकहो! चला दिल्लीत. हा बघा शहाजादा सेलीम आपल्या बगीच्यात अबुल फाजलच्या जारिणीपुत्रास–सखायत अल्लीस बरोबर घेऊन सुरापान करण्यात मग्न झाला आहे. हातातील प्याला घशात ओतून हा काय म्हणतो आहे, ऐका. "सखायत! आता विलब करणे मुळींच उपयोगी नाहीं मला वाटते, बाबाच्या हल्लीच्या अविचाराच्या वर्तनाने दिल्लीचे सिंहासन लवकरच हिदूच्या हाती जाईल!"

सखायतचा सुरापानाचा अभ्यास बेताचाच होता. आज जरा वारुणाबाईची सेवा अधिक घडल्यामुळे स्वारी स्वर्गातून पाताळांत व पाताळांतून अन्यलोकी बरीच जात येत होती! आवेशानें तो म्हणाला

"जहांपनाह! हे काय बोलतां? दिल्लीच्या तक्तावर काफर बसेल! आणि आम्हीं जिवत असता हे सहन करू?"

"खोटे म्हणतो का मी? तुला दिसत नाहीं वाटतें? काफर मानसिंहाचे आपल्या भाच्यास दिल्लीची गादी मिळावी म्हणून सारखे प्रयत्न चालले आहेत."

"जहापनाह! या सेवकास आज्ञा व्हावी, कीं त्या पाप्याचे शिर आपल्या चरणकमलावर वाहिलेच समजा!"

"आणखी हे नवल पहा. अहमदनगरच्या स्वारीवर जाण्याकरिता म्हणून एक अजागळ, बिन दाढीमिशाचे कोवळे पोर सेनापति करून धाडले आहे! माझी स्वत ची त्या स्वारीवर जाण्याची फार इच्छा होती, पण ते बादशहाला नाही पडले पसत!"

"पण ते एका अर्थी बरेच झाले! जगली जनावराबरोबर झुजण्यात व मनुष्याबरोबर युद्ध करण्यात किती अतर आहे, हे आता या काफराच्या पोरास चागले समजून येईल!"

"तू काय म्हणतोस, मला काहीच समजत नाही दोनच प्यालात गुगलास वाटते?"

सखायतअल्ली म्हणतो "आपणास माहीत नाहीं का? हा त्या प्रतापसिंहाचा कारटा—एका रेड्याला मारिले म्हणून बादशहा त्याच्यावर बालबाल खुष झाले आहेत!"

"केवढा वेडेपणा! काय म्हणावे याला! प्रतापसिंहाशीं तह करायचे काय नडले होते? प्रतापसिंहाचे म्हणणे कबूलच करायचे होते, तर हा इतका पैसा का खर्च केला? उगीच्याउगीच इतका रक्तपात कशाला करविला व इतके लोक पहाडात उपाशीं का मारविले?"

"पुन्हा प्रतापसिंहाशीं लढाई सुरू झालीच पाहिजे, जहापनाह! मी आपणाला जिवात जीव आहे तोपर्यंत सहाय्य करीन. आणखी याबद्दल मला काहींसुद्धा नको! फक्त एकच जहापनाह—"

स्वभावतःच नीचप्रकृति, आणखी त्यांत सुरापानानें उल्लू बनलेला सखायतअल्ली सेलीमच्या पायापाशीं जाऊन पडला. त्यानें सेलीमचे पाय आपल्या डोक्यावर ठेवून म्हटले "जहापनाह! आपण चहाल तर मेवाडच्या लढाईत जय हा ठरलेलाच! मी आपल्याला सहाय्य करीन! पण आपणाजवळ एकच भिक्षा मागतो माग म्हणाल तर मागेन कोणती ती!"

सेलीम म्हणाला "काय ते बोलना! एवढे अवडबर कशाला?"

"हे पहा जहापनाह! आपल्या या गुलामाच्या जिवाला आताशा चैन नाही. त्याच्या अगात बळ नाहीं, स्फूर्ति नाही, काहीं नाहीं! हाय! दिवसे-दिवस मी रोड होत चाललो आहे! याला कारण काय म्हणाल तर चिता—घोर—घोर—भयकर चिता!"

"कसली चिता रे मूर्खा?"

"कसली चिता! हाय हाय! प्रेमाची चिता! जहापनाह! प्रेमाची चिता! त्या चद्रमुखी चारुगात्रा सुदरीची चिता! मी आपल्या मनातले सर्व काही आपल्याला सागतो. आज दोन महिने झाले, बादशहाबरोबर मी उदयपुराला गेलो होतो. रात्रीं शिकार करून परत राजवाड्यापाशी आलो. हाय हाय! काय सागू! त्याच वेळेस त्या सुरसुदरीने माझ्या गळ्यात फुलाची माळ घातली! छे छे, माळ नव्हे—माझ्या डोक्यावर अग्नि फेकिला! माझ्या सर्वांगाला आग लावली! ती आग आज दोन महिने मला जाळित आहे, जहापनाह! आता ती माझ्या हृदयाला जाऊन भिडली आहे! या जगात असे सुदर रमणीरत्न असेल असे मला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते! मी कःपदार्थ! अधमाधम! तसा नसतो, तर आजपर्यंत तिचा लाभ तरी करून घेतला असता, नाहीं तर प्राण तरी दिला असता! धिक् माझे जीवन! धिक् माझा मनुष्यजन्म!"

बोलता बोलता सुरामत्त सखायत सेलीमच्या पायावर डोके ठेवून रडू लागला. सेलीमनें हसून म्हटले "अशी ती सुदरी तरी कोण?"

"हाय हाय! तें मी आपणास कसे सागू शकेन? मेवाडची लढाई झाली तर ते आपणास सर्व समजेल. मी जरी जन्मात तिला एकदाच पाहिली आहे, तरी लाखातून ओळखून काढीन. मी आपणास युद्धात सहाय्य करीन लढाईत आपणास यश येईलच माझे एवढें मागणे मान्य करा जहापनाह!" सखायतनें मद्याचा पेला पुढे केला.

दाराआड, सायकाळच्या अस्पष्ट प्रकाशात, सर्वांगास भस्मलेपन करून जीर्णवस्त्रे परिधान केलेली व मानेवर केश मोकळे सोडलेली कोणी एक उन्मादिनी उभी होती या सुहृद्द्वयाच्या हितगुजाच्या कथा श्रवण करण्यात तिची श्रवणेंद्रिये अगदी गढून गेलीं होती. सेलीम म्हणाला "सखायत! तू अगदीं मूर्ख कच्च्या दिलाचा आहेस! तसा नसतास तर एका सामान्य काफर तरुणीसाठी तू मला बाबाच्या मताविरुद्ध लढाई करण्यास प्रवृत्त करू पाहिले नसतेस!"

पुढें केलेला मद्याचा पेला जमिनीवर ठेवून सखायतनें आपले दाढीचे केश दोन्ही मुठीत गच्च धरले त्याचे डोळे पाण्याने भरून आले व तो रुदन करू लागला. काही वेळाने तो म्हणाला "काय म्हटलें जहापनाह! सामान्य बायको! हायरे दैवा! त्याच अप्सरेला—त्याच अस्मानच्या बिजलीला जहापनाह सामान्य काफरनारी म्हणतात? आज दोन महिने मी आतल्याआत जळत राहिलो तसाच मेलो असतो, तर काय वाईट झाले असते? आपले दु:ख आपल्या कलीजाला सागून कमी करावे म्हणून बोललों, तो येथे गोड शब्द दूरच राहिले—पण काय म्हटलेत जहांपनाह! सामान्य काफरतरुणी! आपल्या या गुलामाचा खुदाच्या घरच्या बिदागीचा दिवस ठेपला! आता ह्या प्राणाचे ओझे वाहण्याची आवश्यकता उरली नाहीं. जातो मग आता, ही सभाळा आपली वारुणी अन् हे सुवर्णपात्र. मी आज त्याच सुवर्णपात्रांतून आपल्या मनातल्यामनात वारुणीपान करीन! जातो आता! आपला हा गुलाम आपली व जगाची परवानगी मागतो, जहापनाह!"

सुरामत्त, विव्हलचित्त, नीचाशय सखायतअल्ली लगेच तेथून जाण्यास निघाला. अकस्मात् त्याची दृष्टि दाराबाहेर उभी असलेल्या वेडीवर पडली. सखायतची भीतीने गाळणच उडाली! त्याची दारूची निशा पार उतरली. "जहापनाह! ही डाकीण पहा!" असे भयपूर्ण शब्द उच्चारताना त्याची बोबडीच वळली.

वेडी हळुहळू पुढे सरली. सखायतने सेलीमचे पाय घट्ट धरून तो ओरडला "मला वाचवा! मेलो मेलो–"

सेलीमने वेडीकडे पाहून म्हटले "भिऊ नको वेड्या, ती भूत नव्हे!"

"भूत नाही पण देवदूत आहे! पिशाची कधीं अधारात उभी राहून प्रेमाच्या गोष्टी ऐकत बसेल?" वेडी गभीर स्वराने म्हणाली. "भूत कधीं राजवाड्याच्या बागेत येण्याच साहस करील? पिशाची कधीं एका अप्सरेची छबी हृदयाशी धरून लोकाच्या मनातला प्रेमाग्नि शात करण्यास देशोदेश हिंडेल? हे पहा, वेड्या भूतानी कधीं अप्सरेच अस सुरेख चित्र काढल आहे?"

बोलता बोलता वेडीने आपल्या वस्त्रात लपविलेली एक सुदर तसबीर बाहेर काढून ती सेलिमासमोर ठेविली. सेलीमने ती हातात घेऊन पाहिले, तो ती एका सौदर्यशालिनी किशोरीची प्रतिमा! सखायतअल्ली एकदम उठून उभा राहिला व सेलीमच्या हातातील ती तसबीर हिसकून घेऊन क्षणभर हृदयाशीं धरून म्हणाला "हीच–हीच ती परी! ह्याच सौदर्याच्या बिजलीने माझ्या हृदयास आच लावली आहे. तेच हे गाल! तेच हे डोळे! डाकिणी! तुला ही मूर्ति कोठे दिसली?"

"खरे साग, ही कोणाची तसबीर?" सेलीमने गभीरवाणीनें वेडीला विचारले.

"ही तसबीर? त्याच हडळीची, त्याच पिशाच्चिनी ताराबाईच्या पोरीची–त्या हिरण्मयीची! आणि हे पहा, ही ज्या तरुणाच्या गळ्यात माळ घालित आहे तो प्रतापसिंहाचा धाकटा मुलगा अजयसिंह!

हाय हाय! अजयसिहाच्या गळ्यात ही माळ घालणार व हिची मनकामना पूर्ण होणार!"

सेलीमने उत्तर दिले "छत्, ही गोष्ट घडणेच नाहीं! तू निर्धास्त ऐस. जर खरोखर अशी भुवनमोहिनी अप्सरा या जगात असेल तर तिला ह्या काफराच्या पोराच्या गळ्यात माळ घालता येणार नाही, हे पक्के समज! ही सेलीमच्या अकासच शोभा देईल!"

"पाहीन, पाहीन वर, हिची मनकामना सिद्ध होते कीं तुमची प्रतिज्ञा पूर्ण होते!" असे म्हणून वेडी झपाट्याने निघून गेली

सेलीमने एका हुजऱ्यास टाक मारून म्हटले "अबदुल! या वेडीच्या मागोमाग जा ही कोठे जाते, कोठे राहते, हे सर्व नीट लपून लपून पहा. उद्या पुन्हा याच वेळेस मला भेट, जा. हुकुमाची नीट बजावणी कर. सखायत! एक पेला भर रे आणखी?"

वेडी हळुहळू आपल्या मनाशींच गुणगुणत दिल्लीच्या दक्षिणभागास यमुनेच्या काठीं असलेल्या अरण्यात शिरली. या अरण्यात सुमारे शभर रमणी एकत्र बसल्या होत्या त्या सर्व यौवनसपन्न व सौंदर्यपूर्ण होत्या. वेडीला पाहताच त्या सर्वांनी उठून उभे राहून तिचा सत्कार केला.

त्याच निर्जन अरण्यात एक रत्नमडित सिहासन होतें. तरुगण चद्रप्रकाशात नहात होते तटिनी यमुना शशिरायास हृदयाशीं धरून हास्यमय क्रीडा करित होती जगत् सर्व आनदमय दिसत होते.

सर्वांनी मिळून उन्मादिनीचा पूर्ववेष उतरून तिला बहुमूल्य भरजरी पोशाख चढविला तिच्या अगावर रत्नखचित अलकार घातले. काहीं जणी तिच्यावर रत्नाच्या मुठीच्या चवऱ्या ढाळू लागल्या व काहीजणी तिच्या अगास सुवासिक द्रव्याचे लेपन करू लागल्या. उन्मादिनी आता भुवनेश्वरी बनली. तिच्या रूपाचा चद्र हेवा करू लागला. चद्रा! हा उपद्व्याप कशाला करतोस बाबा? आपल्या देहावरला डाग काढलास, तरी या मुखचद्राची बरोबरी करणे तुला अशक्य आहे! मग सकलक असता हा खटाटोप का म्हणून?

वेडी म्हणाली "आज त्या राक्षसिणीच्या रूपानें सेलीमच्या हृदयात प्रचड वणवा पेटवून तर मी आल्ये, पण इतक्यातच मला हा उची पोशाख का घातलात? जोपर्यंत माझ्या हृदयातील सूड पार शात होत नाहीं, तोपर्यंत या वेषान मी सुरेखका दिसेन? सख्यानो! जा, लवकर जा, माझा आपला वेडीचा पोशाख पुन्हा आणून द्या"

---

## प्रकरण सातवे.

## नवे सेनापति.

आग्र्याच्या नवीन राजप्रासादातील एका सुदर दिवाणखान्यात बादशहासमोर अजयसिह एकटाच बसला होता दिल्लीश्वराने काहीं वेळ विचार करून म्हटले "मेवाडराजकुमार! आपला माझ्या म्हणण्यावर विश्वास बसत नाही? अतःपुरात राहणाऱ्या एका अबलेवर हजारो जवानमर्द गडी घेऊन स्वारी करण्याचा प्रसग यावा ह्याचे आपणास नवल वाटते?"

"दिल्लीश्वर! अशातला काहीच प्रकार नाही मला या स्वारीबद्दल मुळींच आश्चर्य वाटत नाही भारतललनाचे अप्रतिम देशवात्सल्य, अतुल्य वीरत्व आपण स्वत. डोळ्यानी पाहिले नाही काय? राजस्थानच्या प्रत्येक अत पुरातील वीररमणींच्या हृदयात वीरजननी भारतमातेची प्रतिमा आपण पाहिली नाही काय? हिन्दुरमणींचे विस्मयकारक वीरत्व भारतवर्षाच्या इतिहासात सुवर्णाकित अक्षरानी लिहिलेले नाही काय?"

अकबर हसून म्हणाला "परतु आता ज्या स्त्रीशीं युद्ध करायचे आहे ती हिन्दू नसून मुसलमान आहे!"

"असेना! तरी पण भारतरमणीच ना? चदनाच्या वनात देवदारू उत्पन्न झाला तरी त्याला चदनाचा वास आलाच पाहिजे!"

"मग महमदी स्त्रिया गुणरूपाने हिन्दूस्त्रियाच्या बरोबरीच्या असू शकतात, हे तुम्हाला कबूल आहे तर? आता मी आपले मत तुम्हाला

सागतो, ऐका. जर कोणी भारताचे मगल चाहत असेल तर त्याला जोपर्यंत हिन्दूमुसलमानात परस्परात विवाहादि सबध होत नाहींत तोपर्यंत या उभयताचे ऐक्य होणे केवळ अशक्य आहे, हे कबूल केलेच पाहिजे, आणखी,असे ऐक्य झाल्याशिवाय भारतभूमीचा जगावर दरारा बसणे अगदी अशक्य आहे, हे माझे ठाम मत आहे !"

"परतु जोपर्यंत हिन्दसाम्राज्याच्या सिहासनावर केवळ यवनच बसतील, तोपर्यंत हिदू लोक त्याना लुटारू म्हणणारच !"

"केवळ मुसलमानानीच दिल्लीच्या तक्तावर बसावे, असे माझे मुळीच म्हणणे नाही, आणि म्हणूनच क्षत्रियवीर अजयसिहाचा विवाह त्याच्या पित्याच्या समतीने एका उच्चकुलोत्पन्न आणि रूपगुणशाली यवनतरुणीशीं करून द्यावा, असा माझा विचार आहे"

"बाबानी समति दिली, तरीहि अजयसिहाचा एका मुसलमान स्त्रीशी विवाह होणे अगदी अशक्य आहे !"

"आणखी, जर राणाजी हिरण्मयीशी आपल्या विवाहाचा बेत रहित करतील, तर ?"

अजयसिहाचा चेहरा एकदम लालभडक झाला ! लगेच पाढरा फटफटीत झाला. शरीराचे रोमाच ताठ उभे राहिले त्याने एकवार तीव्रदृष्टीने अकबरशहाकडे पाहिले व लगेच त्याची केविलवाणी, चिन्तातुरदृष्टि आकाशपथाकडे रोखलेली दिसली अकबरशहाचे गभीर मुख गभीरतर झाले. तो म्हणाला "बेटा अजय! दिल्लीश्वराचें तुझ्यावर पुत्राप्रमाणे प्रेम नाहीं असे तुला वाटलेना ? मी आमच्या तहाकरिता म्हणून तुझ्या भावीसुखात माती कालवीन, हे तू मनात देखील आणू नकोस! मी देखील एक वेळ तुझ्यासारखा तरुण होतो अकबराच्या मनात देखील एकदा प्रेमाचा दुर्दमनीय ओघ वेगाने वहात होता. मला तुझ्या मनातला भाव समजला—पण हे काय ? दिल्लीहून स्वार ? समजलो !"

याच वेळेस एक घोडेस्वार वेगाने घोडा फेकित राजवाड्याकडे येत होता बादशहा तटकन् उभा राहून म्हणाला "समजलो! अक्कलशून्य सेलीमाने दिल्ली शहरास आग लावली असेल! नाहीं तर वृद्ध मानसिहाच्या पाढऱ्या दाढीस—"

अकबराचे वाक्य पुरें झाले नाहीं तोच घोडेस्वाराने मुजरा केला व गुडघे टेकून तो तेथेंच उभा राहिला गभीरवाणीने बादशहा म्हणाला "काय बातमी आहे?"

स्वाराने पुन्हा वदन केले व बादशहासमोर एक लखोटा टाकिला. बादशहा पत्र वाचण्यात चूर झाला पत्र वाचून झाल्यावर त्याच्या मुद्रेवर चिंतेची गाढ छाया पसरली त्याने पुन्हा पत्र उचलले व पुन्हा वाचले त्याच्या भव्य कपाळावर चिंतेमुळे सुरकुत्या पडल्या व चर्येवर विषादाची लहर मारू लागली तो आपल्याशीच पुटपुटला "रजपुतकन्या! सखायतअल्ली—उदयपुरचा तह!"

अजयसिहाकडे तीव्र पण दयार्द्र, चिन्तातुर पण आशापूर्ण अशा दृष्टीने त्याने पाहिले. बादशहाने पत्राचे फाडून फाडून तुकडे केले हुजऱ्यास हाक मारून म्हटले "महमद!"

महमद चटकन् धावत आला बादशहाने त्याला पागेतून सर्वात चपळ घोडा आणण्यास सागितले व दूतास निरोप दिला

महमद स्वारास घेऊन पागेकडे चालता झाला.

अकबराने अजयसिहाचा हात धरून म्हटले "बेटा अजय! अहमदनगराकडील युद्धाचा भार तुझ्यावरच आहे. जपून वाग. रजपूत वीरास शोभेलशा, शूर प्रतापसिहाच्या वीरपुत्रास योग्यशा, व अकबराच्या जीवलग व पुत्रवत् प्रिय सेनापतीने करावे अशा गीतीने हे काम पार पाड. जय देणार खुदा आहे! मी केव्हा परत येईन हे काहींच निश्चित नाहीं. पहा, या नारीच्या शौर्याने दिपून जाऊ नकोस किंवा तिच्या डोळ्याच्या

कटाक्षबाणांनी जेर होऊ नकोस! तुझ्या या कामगिरीबद्दल तुला एकच इनाम व ते सुरसुदरी हिरण्मयी!"

महमदाने घोडा तयार करून आणिला. तत्काळ बादशहा घोड्यावर स्वार झाला. बरेचसे घोडेस्वार मागून जाण्यास निघाले! पण अकबराने त्याना हातानेच न येण्यास खुणाविले. भारतसम्राट् अकबरशहा एकटाच वायुगतीने उदयपुराकडे जाण्यास निघाला.

---

## प्रकरण आठवे
## यावनिक परिणय.

निदाघातील रात्रीच्या चतुर्थ चरणाची शेवटची घटका. निशानाथाचे प्रेमाभिनयपूर्ण नाटक सपत आले होते. त्या प्रीतिमय, आलोकमय, रगभूमीवरील एक एक दीप हळुहळू विझत होता. हिरण्मयी एकटीच उदयपुरच्या राजवाड्यामागील बगीच्यात उभी होती रोज या वेळीं देवपुजेकरिता फुले खुडण्याचा तिचा नियम असे आज तिचा मुखचद्र अगदीच म्लान दिसत होता. जणू काय आकाशातील म्लान चद्राचे या निसर्गदर्पणावर हे प्रतिबिबच पडले होते! किती वेळ तरी हिरण्मयी जागच्याजागींच उभी होती. काहीं काळानतर हिरण्मयीच्या डोळ्यातून अश्रूचा प्रवाह सुरू झाला तिने पदराने डोळे पुसले व त्याना आकाशनिरीक्षण करण्याकरिता नियुक्त केले नतर तिने नेत्र मिटून घेतले व वर आकाशाकडे तोड करून आणि दोन्ही हात जोडून म्हटले "हे न्यायपरायण, सर्व शक्तिमान् प्रभो! माझे स्वप्न खरच होणार काय? होणार असेल तर माझ्या अजयावरच हे सकट कस दूर होईल? मी काय करू म्हणजे त्या सकटाच निवारण होईल?"

एकाएकीं आकाशात "होईल, खात्रीने होईल!" या शब्दाचा प्रतिध्वनि झाला. हिरण्मयीने डोळे उघडून पाहिले, तो तिच्यासमोर जटाधारी, भस्मचर्चित एक ब्रह्मचारी मूर्ति उभी असलेली दिसली. ब्रह्मचाऱ्याची शरीरकाति फारच तेजःपुज होती. त्याच्या वदनमडलास

स्वैरगतीने वाढलेल्या श्मश्रूनी व जटानीं फारच गभीरता आणिली होती. त्याच्या विशाल नेत्रावर प्रात कालच्या वाऱ्याने उडविलेल्या जटा विखुरल्या होत्या, त्यामुळे त्याचे डोळे शैवालामध्ये गुरफटलेल्या कमलासारखे शोभिवत दिसत होते. दयापूर्णस्वराने ब्रह्मचारी म्हणाला "बेटा, भिऊ नकोस! भवानीपति सर्व अमगल दूर करील!"

हिरण्मयीच्या मनात ब्रह्मचाऱ्याविषयी अत्यत आदरबुद्धि उत्पन्न झाली. ती हात जोडून विनयाने म्हणाली "महाराज! आज स्वप्नात मीं अजयसिहाला सकटात पडलेल पाहिल. महाराज, हे खरच का? अस असेल तर काहीं उपाय सुचवा"

ब्रह्मचाऱ्याने डोळे मिटून घेतले व क्षणभर तो ध्यानमग्न झाला. समाधि उतरल्यावर तो म्हणाला "तुझे स्वप्न खरेंच, पण भ्यायचे काहीं कारण नाहीं. बेटा! तू माझ्याबरोबर या जवळच्या देवळात चल व देवाला सकट घाल, तो तुझ्या सर्व इच्छा पूर्ण करील!"

हिरण्मयी ब्रह्मचाऱ्याकडे टकमक बघू लागली. ब्रह्मचारी किंचित् हसत, दयार्द्र दृष्टीने तिच्याकडे पाहून लडिवाळपणानें म्हणाला "बेटा! अशी भितेस का? देऊळ जवळच आहे. तू आत्ता परत येशील!"

हिरण्मयी ब्रह्मचाऱ्याबरोबर चालू लागली. हिरण! मूर्खे! माघारी फीर! अजून तरी माघारी फीर! काहीं दूर गेल्यावर ती एका लहानशा देऊळवजा घराजवळ थाबली. ब्रह्मचारी म्हणाला "बेटा! जा आत देवळात, देवाची पूजा कर व नवस करून परत ये."

हिरण्मयीच्या मागोमाग ब्रह्मचारी आत शिरला व देवळाचे दार दोन्हींकडून बद झाले. महादेवाची मूर्ति कोठें आहे हे पहाण्याकरिता हिरण्मयीनें चोहींकडे पाहिले, पण हे देऊळ नव्हे ही—मशीद! तेथें महादेवाच्या मूर्तीचें नाव नाहीं, पण एक सगमरवरी चबुत्रा होता. या चबुत्र्यावर एक लोखडाचा पत्रा ठोकला होता, व त्यावर एक फुलदानी व एक लहानसे पुस्तक ठेविले होते. एक पाढरी दाढीमिशीवाले मियासाहेब चबुत्र्याशेजारींच बसले होते, व दोघे तरुणहि

पण तेथें होते. यांपैकीं एकाच्या तोंडावर राजतेज स्पष्ट झळकत होतें. पण हा दुसरा कोण? त्याला पहातांच हिरण्मयीच्या अंगावर अकस्मात् कांटा उभा राहिला. तिनें याला कधींतरी पाहिलें होतें खास! अजयाच्या खांद्यावरून उडून ज्या एकाक्षाच्या गळ्यांत हिरण्मयीचा हार पडला होता तोच हा एकाक्ष! मियांसाहेब हंसत हंसत व डोळे मिचकावित मिचकावित आतां पुढें झाले. भयभीत हिरण्मयीनें ब्रह्मचाऱ्याकडे दृष्टि फेंकली, पण ब्रह्मचारी बोवा कोठें होते! ते आंत आले खरे, पण आतां त्यांच्या जागीं पाठीवर केश मोकळे सोडून उभी असलेली उन्मादिनी! ज्या वेडीला लहानपणीं हिरण्मयीनें अरवली पर्वतावर पाहिलें होतें—तीच! अजयसिंह आग्र्यास जाणार होता त्याच्या आधले रात्रीं जी वेडी हिरण्मयीला स्वप्नांत दिसली होती ती हीच! लहानपणापासून ज्या वेडीचे भीषण नेत्र, भयप्रद शब्द, विकटहास्य हिरण्मयीच्या हृदयास कंपित करित होतें—तीच! हिरण्मयीशीं दृष्टादृष्ट होतांच वेडी हंसून टाळ्या वाजवूं लागली. हिरण्मयीचें मस्तक भ्रमण करूं लागलें, व ती बेशुद्ध झाली. सखायतअल्लीनें लगेच पुढें सरून तिचा हात धरला व त्याचें चुंबन घेऊन जवळच बसलेल्या सेलीमास तो म्हणाला "आतां काजीसाहेब उशीर कां करतात? जहांपनाह! आपणहि कांहींच बोलत नाहीं?"

सेलीम अगदीं मंत्रबद्ध व वाक्शून्य बसला होता. त्याचे डोळे हिरण्मयीकडे लागून राहिले होते. सखायत पुन्हा बत्तीशी विचकून म्हणाला "इजब ओ कबूल! झालें या माझ्या शादीपासून या परीजानला कोणताहि त्रास होणार नाहीं!"

काजीसाहेब उठून उभे राहिले व म्हणाले "पण इजब ओ कबुलीला साक्षी कोण?"

"साक्षी? खास जहांपन्नाह आणखी ही वेडी!"

काजीसाहेबांनीं कुराण मोठमोठ्यानें वाचण्यास आरंभ केला; पण इतक्यांत मशिदीच्या दारावर मोठमोठ्यानें थाप मारून कोणीं गंभीर

वाणीने म्हटले "आत कोण आहे? लवकर दार उघडा, नाहीं तर लाथ मारून दार फोडावे लागेल व मशिदीचा अपमान होईल!"

काजीसाहेबाच्या हातातले कुराण पटकन् खालीं पडले! सेलीमच्या तोंडचे पाणी पळाले! सखायतअल्लीस तर दरदरून घाम सुटला! तो हिरण्मयीचा हात सोडून जमिनीवर मटकन् बसला. उन्मादिनीचा पदर स्थानच्युत होऊन भुईवर लोळू लागला हिरण्मयी शुद्धीवर येऊन बाहुलीप्रमाणे उभी राहिली. त्या बाहेरच्या स्वरात काय जादू भरली होती नकळे! आतून उत्तर मिळत नाही हे पाहून बाहेरील गृहस्थानें दारावर लाथ मारली ताडकन् दाराचे तुकडे तुकडे होऊन धाडकन् ते खालीं पडले व चटकन् एक गृहस्थ आत शिरला हिरण्मयीने पाहिले, तो प्रत्यक्ष भारतसम्राट् अकबरशहा!

---

## प्रकरण नववे

## प्रेमी मनुष्याचा पुरस्कार

दिल्लीश्वराने आत शिरल्याबरोबर क्रोधारक्त दृष्टीने सेलीमाकडे पाहिले. बादशहाच्या या क्रोधदृष्टीने भारताच्या भावी सम्राटाच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. हातातील तरवारीच्या मुठीवर आपला भार टाकून व भुईकडे दृष्टि रोखून तो स्तब्ध उभा राहिला. अकबराने काजी व सखायत याच्याकडेहि पण तशाच दृष्टीने पाहिले. लगेच अश्रुपूर्ण नेत्रानी हिरण्मयीकडे पाहिले इतक्यात त्याची दृष्टि वेडीकडे वळली. तिला "तू कोण?" ह्मणून त्याने प्रश्न केला. वेडीने आपले विशाल नेत्र आकुंचित केले व दोन्हीं हातानी केश ओढून धरले ती ओठ चावू लागली व ऊर बडवून घेऊ लागली पण ह्यानतर मात्र तिचे नेहमीचे अक्राळविक्राळ हास्य. अकबरशहा आश्चर्यचकित होऊन म्हणाला "तू तर वेडगळ दिसतेस!"

उन्मादिनी ह्मणाली "मी हो दिलीश्वर! मी आपणास लवकरच ओळख देणार आहे. माझी ओळख देण्यास हे स्थान योग्य नाहीं!

पण इतक खरं की, माझी पुष्कळ दिवसाची इच्छा आज पूर्ण झाली. ही पहा राक्षसी ताराबाईची कारटी! हिच लग्न आज एका नीच कुलात उत्पन्न झालेल्या मुसलमानाशीं लागल. याबद्दल साक्षी दिल्लीश्वराचे युवराज, हे काजी व मी!"

बोलता बोलता वेडी आनदयुक्त मुद्रेने हिरण्मयीकडे पहात पहात बाहेर पडली. हिरण्मयी देहभानावर नसल्यामुळे आतांपर्यंत काय झाले याची त्या बिचारीला काहींच वार्ता नव्हती. तिला ते सर्व आतांच समजले. ब्रह्मचर्यवेषधारी उन्मादिनीची प्रतारणा, काजीचें कुराण व सखायतचे लग्न, हीं सर्व तिच्या मनावर आता पूर्णपणे बिंबलीं व ती पुन: बेशुद्ध होऊन धाड्दिशीं खालीं पडली. सखायत हिरण्मयीला सावरण्यास पुढें झाला, तोच अकबरानें क्रुद्ध स्वरानें ओरडून ह्मटले "खबरदार! तिला स्पर्श करू नकोस!"

हे शब्द ऐकताच सखायत एकदम मागे सरला, पण पुन. लोचट-पणानें ह्मणाला "जहापनाह! मी आताच हिच्याशीं निका पढला. खोटे असेल तर युवराजाना विचारा."

सखायतचे बोलणे बादशहाच्या कानीच पोंचले नाहीं. तो सेलीमाला म्हणाला "सेलीम! मीं तुला पुष्कळदा क्षमा केली आहे, पण आजच्या या घोर अपराधाबद्दल तुला कोणती भयकर शिक्षा करावी, हे मला समजत नाहीं!"

सेलीम आवेशानें ह्मणाला "जो अपराधी त्यालाच दड करणे योग्य आहे. आजच्या या कृत्यात् अपराधी सखायत—मी केवळ साक्षी मात्र. तेव्हा मी त्याला आपल्या अनुमतीशिवायच दड करितो!"

सेलिमाचें हे बोलणे सपण्यापूर्वींच त्याच्या म्यानातून तरवार बाहेर निघून ती सखायतच्या छातीमधून आरपार निघून गेली! सखायतनें जोरानें एक किंकाळी फोडून तत्क्षणीं प्राण सोडले.

अकबराचे मुखमडल क्रोधाने लालभडक झाले. त्याने तरवार उपसली व तो सेलीमावर धावून गेला. पण लगेच राग आवरून तरवार परत म्यानात ठेवून म्हणाला "सेलीम! पापावर पाप? मूर्ख-पणाची तू अगदी कमाल केलीस! तुझे पाप माझ्यापासून लपून राहिले असे तुला वाटत असेल, पण मी काय म्हणतो हे नीट लक्ष्य देऊन ऐक जर मी म्हणतो हे ऐकलेस व त्याप्रमाणे वागलास तर मी तुला इतर सर्व अपराधाबरोबर या अपराधाबद्दलहि क्षमा करीन. ऐक तर या हतभागी स्त्रीचे कन्येप्रमाणे रक्षण करण्याचा माझा मानस आहे. ही नावाला मुसलमानाची धर्मपत्नी झाली आहे हिच्याकडे तू केव्हाहि वाईट नजरेने पहाशील, तर तुला सर्व अपराधाचा दड एकदम भोगावा लागेल हे पक्के लक्ष्यात वागीव जा, नीघ, आत्ता इथून काळे कर."

सेलीम हिरण्मयीकडे चोरट्या नजरेने पहात पहात बाहेर पडला व आग्र्याकडे चालता झाला

---

## प्रकरण दहावे.

## मानवी की किन्नरी.

ज्या वेळेस बादशहा अकबर दिल्लीच्या तक्तास भूषवित होता, त्याचवेळेस दक्षिणेत राज्ञी चादबिबी राज्य करित होती. ही असामान्य राणी शौर्यवीर्यादि गुणानी अकबराशीं समान होती, हे निरपेक्ष दृष्टीने इतिहास लिहिणाऱ्या कोणाहि लेखकास कबूल करणे भाग आहे. सुमारे पन्नास वर्षे—व तोहि राष्ट्रविप्लवाचा काल—अधारात रत्नदीपाप्रमाणे, किंवा मरुभूमींत मदाकिनीप्रमाणे ह्याच सर्वगुणसपन्न राज्ञीच्या राज्य-कौशल्यामुळे दाक्षिणात्यास काहीं काळपर्यंत तरी सुख व शांति प्राप्त झालीं होती पण चादबिबीच्या नशिबीं हे सुख फार दिवस लिहिले नव्हते! अहमदनगरच्या गादीवर बसल्यानतर थोड्याच दिवसात अकबर बादशहाच्या करड्या नजरेचा मोर्चा अहमदनगरावर फिरल्याची

बातमी तिला समजली ही बातमी ऐकताच चादबिबीला चैन पडेना; आहारनिद्रेला अवसर मिळेना.अप्रतिम उत्साहाने व अलौकिक मनोनिग्रह करून फौजेची जमवाजमव करण्यास राणी लागली. स्वतः किल्ल्याच्या प्रत्येक भागाचे निरीक्षण करण्यात ती गुतून गेली व बादशहाशीं सर्वच प्रकारे सामना देण्याची तयारी करण्यास तिने सुरुवात केली.

दिवसभर श्रम केल्यामुळे श्रमपरिहारार्थ थोडा वेळ विश्राति घ्यावी ह्या हेतूने एक दिवस सखीगणास बरोबर घेऊन राज्ञी चादबिबी राजवाड्याच्या मागील बाजूस नदीतीरावर बसली होती. राणी एका सखीस ह्मणाली "जुलेका! आज फार उकडत आहे ग! सूर्य मावळला आहे तरी अझून अगाची आगआग होते आहे. मल्हारराग म्हटला म्हणजे वृष्टि होते, अस ह्मणतात. तर मग गा बर आज मल्हाररागाची एखादी चीज! मात्र, तुझ्या गाण्यान मेघास आनद होऊन ते वृष्टि करतील अशी चीज गा!"

जुलेका ह्मणाली "आपल्या सागण्याबाहेर ही दासी कधीं असत्ये बर राणीसाहेब? पण आज ही अशी थट्टा का आरभलीत?"

जुलेका तबोऱ्याशीं सूर मिळवून गाऊ लागली. चादबिबी प्रीतिपूर्ण हृदयाने आपल्या सखीचे गाणे ऐकण्यात गढून गेली गाणें संपल्यावर राणीने आकाशाकडे पाहून हसत हसत ह्मटले "हे बघ, तू इतकी सुरेख गात्येस कीं, स्वच्छ आकाशात मेघ दिसू लागले. आणखी एकदा गा, म्हणजे पाऊस पडलाच पाहिजे!"

"आणखी एकदाच काय पण शभरदा म्हणाल तर गाईन! पण गडे, अशी थट्टा मात्र करू नका!"

जुलेकानें पुनः तबोरा उचलला व ती पूर्वींप्रमाणेंच मधुर आलाप घेत गाऊ लागली. एकाएकीं सर्व रमणीगण चकित होऊन उभा राहिला. जुलेकाचें गाणे बद पडले व हातातील तबोरा हातातून गळून नदीच्या पात्रात पडला. नदीचा कलकल ध्वनि, वृक्षपर्णांचा

मर्मर शब्द, व वाऱ्याची क्रीडा सर्व शात झालीं. नदीतीरापलीकडे कोणी गात असलेल्या मल्हाररागाच्या आलापानीं सर्व वातावरण भरून गेले सृष्टि निःशब्द, स्तब्ध, केवळ चित्राप्रमाणे भासू लागली! पश्चिमेस दिसणाऱ्या ज्या लहानलहान ढगाच्या दर्शनावरून रात्री चाद-बिबीने आपल्या सखीशीं विनोद करण्यास सुरुवात केली होती, तेच आता मत्तकुजराप्रमाणे आकाशात सैरावैरा धावू लागले, व त्यानी सहस्रधारानी वृष्टि करण्यास सुरुवात केली. ते उच्च स्वरातील मधुर आलाप आता अधिकच उच्च स्वरात ऐकू येऊ लागले, त्याचा निनाद आतां मधुरतर होऊ लागला व त्याची भीषण लय आता भीषणतर भासू लागली. जलधाराचा कर्णमधुर शब्द या गाणाऱ्याच्या तबोऱ्याच्या सुराशीं मिळून गेला. मेघाच्या गडगडण्याऱ्या मृदगध्वनीत हे आलाप विलीन झाले, व सर्व स्थावरजगम विश्व त्याचा प्रतिध्वनि करण्यात गुग होऊन गेले. जणू काय, मोहमुग्धा सृष्टीस या गायनामुळे चैतन्य प्राप्त झाले, व जलधारापतनाच्या नूपुररवानें आणि टपटप गळणाऱ्या जलबिंदूचा ताल धरून सृष्टि या गायकाची साथ धरित होती! राणीच्या सख्या जणू काय मत्रबद्धच होऊन तशाच पावसात भिजत उभ्या राहिल्या. हळुहळू तो गीतध्वनि जवळून जवळून ऐकू येऊ लागला. बऱ्याच वेळाने एक स्त्री हातात वीणा घेऊन चादबिबी-जवळ येऊन उभी राहिली. अझूनहि सर्वजणी अगदीं पहिल्याप्रमाणेच तटस्थ उभ्या होत्या. गायिकेनें आपले गाणें बद केले व वीणेचे चुबन करून व तिला हृदयाशीं धरून ती उभी राहिली. सर्व सख्यास पुनरपि चेतना प्राप्त झाली. एकजण म्हणाली "राणीसाहेब! क्षमा असावी, आम्ही सर्व अगदीं सज्ञाशून्य झालो होतो. चला आता राजवाड्यात."

जुलेकाने गायिकेकडे पाहून विचारिले "बाई! आपण मानवी कीं किन्नरी?"

गायिका हळुहळू जुलेकाकडे वळली. आकाशात एकदम वीज चमकली व गाणारीण ही केवळ जीर्ण वस्त्रे परिधान केलेली एक भिकारीण आहे हे सर्वांच्या ध्यानात आले. एकजण म्हणाली "भिकारणी! तूं कुठ असत्येस ?"

गायिका म्हणाली "मी भिकारीण नाही, मी एक उन्मादिनी आहे!"

चादबिबीने भिकारणीस वाड्यात घेऊन जाण्यास सागितलें व तिची नीट व्यवस्था ठेवण्यास बजाविले. वाड्यात गेल्यावर राणीच्या सखींनीं आपले कपडे बदलून वेडीसहि नवे कपडे दिले, पण वेडीने ते सर्व फेकून दिले चादबिबी वेडीस म्हणाली "बाई, तुमच्याशीं मला काही बोलायच आहे."

वेडीस घेऊन राणी आपल्या महालात गेली व दारास अर्गळ लावून घेतला.

---

## प्रकरण अकरावे.

## वेडीचा पूर्ववृत्तांत.

दीपमालानी सुशोभित, सुगधी पुष्पहारानी सुसज्जित अशा त्या उज्वल राजमहालात अहमदनगरची राज्ञी चादबिबी व उन्मादिनी ह्या दोघी किती वेळ तरी एकमेकींशीं काहींएक न बोलता स्तब्ध बसल्या होत्या. थोड्या वेळाने उन्मादिनी ह्मणाली "आपल्यासारख्या राजराजेश्वरीस मजसारख्या भिकारणीशीं काय बोलायच आहे ? राणीसाहेब, काय तें बोलत का नाहीं ?"

चादबिबीने एक दीर्घ निःश्वास सोडून ह्मटले "मुमताज ! मीं तुला ओळखल नाही अस का तुला वाटत ? आज तुला पाहून विषाद आणि आनद, आश्चर्य आणि कौतुक अशा परस्परविरोधि विकारानीं माझ मन हेलकावे खात आहे. काय विचाराव हेच काहीं समजत नाहीं!"

"तू काहींच विचारू नकोस, मीच तुला सर्व सागत्यें तू इथ या पलगावर बैस आणखी मी इथ उभी राहून तुला सागत्ये ते सर्व ऐक. वीस वर्षांपूर्वी लहानपणीं एके दिवशीं अशाच सुसज्जित महालात, अशीच पलगावर बसून तू माझ्या तोडून ब्राह्मणीवशातील दुष्ट मुसलमान राजान रामराजाचा वध केल्याची गोष्ट ऐकिली होतीस, व त्या वेळेस अश्रूनी आपल्या वक्ष.स्थलास न्हाणिल होतस, हे तुला आठवत काय? आज तशीच बसून अभागिनी मुमताजची कर्मकहाणी ऐक व तशाच अश्रुपूर्ण सकरुण नेत्रानी माझ्याकडे पहा! मी या पृथ्वी-तलावर जिवत नाही अस तुला खात्रीपूर्वक वाटत असेल व नदीतीरावर गाण गाताना मला पाहून तू एखाद्या भूताला भ्यावस तशी भ्याली असशील, आणि ह्मणूनच तू माझ्याकडे पहात स्तब्ध बसली होतीस!"

"मी स्तब्ध बसल्ये होत्ये हे खर, पण मला भय वाटल नाहीं! उलट, विषाद मात्र वाटला तू मेलीस अस लोक म्हणत होते; पण इतक्यातच तुला पापिणीला मरता येणार नाहीं अशी माझी खात्री होती, व ते मरण तुला आल नाहीं हे पाहून मला वाईट वाटत होत अणि म्हणूनच मी स्तब्ध बसल्ये होत्ये."

"ऐक तर, मी तुला सगळ काहीं सागत्ये तुझ लग्न झाल्यावर तू अहमदनगराला निघून आलीस व बापाच्या मरणानतर तुझी चुलत बहीण मुमताज विपुल सपत्तीची मालकीण होऊन बापाचा राज्यशकट हाकू लागली. काहीं दिवसानी तुझ्या पापिणी भगिनीच्या दृष्टिपथात एक सुदर तरुण हिन्दू आला. हा पुरुष ग्वाल्हेरचा परलोक-वासी राजकुमार त्याची ती वीरत्वपूर्ण काति, चद्रासहि लाजविणार ते सुदर मुखकमल ही पाहून एका पधरा वर्षाच्या अल्लड कुमारिकेच मन त्याच्यावर बसल, व तिन गुप्तपण त्याच्याजवळ लग्नाची गोष्ट काढली. पण यवनद्वेषी हिन्दू राजा या गोष्टीला कबूल होईना! जरी राजकुमार विवाह करण्यास कबूल होईना, तरी त्याची या अभागिनीवर प्रीति जडली.

हिन्दू राजाच लग्न आधींच झाल होत. थोड्याच दिवसानी हिन्दू राझीला व या पापिणीला गर्भ राहिला व आम्हा दोघींसहि सुदर कन्या झाल्या. यावेळीं या हतभागिनीन अनन्यगतिक होऊन ग्वाल्हेराधिपतीचे पाय धरिले, आणि त्या वीर क्षत्रियाचहि मन द्रवल ! पण त्याच्या बायकोस हें असह्य होऊन तिन आम्हा मायलेकींविरुद्ध खटपट करण्यास सुरुवात केली. चदा ! तिच्याच बेतानी, व तिच्याच कौशल्यान ह्या हतभागिनीच दुसर हृदय हिच्याजवळून हिसकून घेऊन दूर नेऊन ठेविल ! हाय ! ते कुठ आहे हे मला कुणी सागेल काय ? त्यानतर ह्या तुझ्या हतभागिनी बहिणीचा उच्च वशातील एका मुसलमान तरुणाशी विवाह झाला, ते तुला माहीत आहेच कांहीं दिवस आह्मीं सुखान राहिल्यावर ह्या पापिणीचा भर्ता इहलोक—"

चादबिबी एकदम उभी राहिली व रागाने ह्मणाली "मुमताज! गप्प रहा पापिणी ! आपल्या पापाचा तो वृत्तात आपल्याच तोडान सागताना तुला मुळींच का ग लाज वाटत नाहीं ?"

वेडी पुनः स्वस्थ रीतीने सागू लागली. ती म्हणाली "चदा ! तुला भ्रम झाला आहे, अथवा लोक बोलतात त्याच्यावर तुझा पूर्ण विश्वास बसला आहे मीं माझ्या भर्त्याला विष दिल असं लोक बोलतात हे मला माहीत आहे,पण ते सर्व असत्य आहे माझ्या दोपामुळ—माझ्याच घोर पापामुळ त्याना मृत्यु आला हे खर, पण मी स्वत त्याना मारिल नाहीं. ज्या दिवशीं या अभागिनीचा दुसरा प्राण—माझी प्रिय कन्या माझ्यापासून हिरावून नेली त्या घटकेपासूनच माझ्या हृदयात प्रचड दुःखाग्नीन पेट घेतला. पण त्या सर्व आतल्या वेदना आतच लपवून मी स्वस्थ बसल्ये भगिनी चदा ! आपल्या तोडून मी ते कुणालाहि सागितल नाहीं रात्रदिवस खिन्न वदनान मी आपला काळ कठत्ये, याबद्दल ते मला वारवार खोदखोदून विचारित असत, पण त्याना काय उत्तर द्याव, मला काहींच समजेना ! त्यानी मला पुन पुनः कारण सांगण्यास सागाव आणि मीं ते टाळाव, परतु हे किती दिवस चालणार ?

अखेर एके दिवशीं मीं त्याना अथपासून इतिपर्यंत सर्व वृत्तांत सागितला व स्वस्थपण त्यानी तो सर्व ऐकून घेतला.पण त्याच दिवशीं माझ्या नकळत त्यानी विष खाल्ल! यामुळ माझ्या हृदयातला प्रचड हुताशन द्विगुणित झाला मनाचा निर्धार करून लगेच अगणित द्रव्य आणि जवाहिर गोळा करून व शभर युवती बरोबर घेऊन कधीं घोड्यावर तर कधीं पायीं अशी मी देशोदेशीं भटकायला लागल्ये. माझ्या प्रिय कन्येचा मीं सगळीकडे शोध केला,पण हाय! काहींच पत्ता नाहीं! उदयपुरच्या राज्यात असताना ग्वाल्हेरचे महाराज धारातीर्थी पडले व पिशाची ताराबाई सती गेली, अस मला प्रवासात समजल तेंव्हा ताराबाईचा सूड घेण्यास सधि सापडली नाहीं म्हणून फार वाईट वाटल, आणि म्हणूनच मीं अरण्यवास पत्करला. मनुष्याला परदु:खाबद्दल काहींच क्षिति वाटत नाहीं, परतु प्रेममयि सृष्टीचे प्राण परक्लेशानीं कासावीस होतात. मी जेंव्हा निर्जन अरण्यात जीवशून्य गिरिगुहेत व अनत प्रवाहिनी तटिनीतटावर बसून आपली दु खकहाणी वीणेशीं सूर लावून खुशाल गात बसत्ये, तेंव्हा समदु:खी वनराजी दीर्घनिश्वास सोडून करुणरवान माझ्या मर्मभेदी सुरास सूर मिळविते, गिरिगुहा व्याकुल हृदयान हा हा अशा शब्दानीं माझ्या गाण्यास उत्तर देत सहानुभूति दाखविते व विगलित अत:करणानं वाहणारी नदी माझ्या वीणेच्या स्वराशीं आपल्या कलकल ध्वनीचा सूर धरते. मला गाता साधारणच येत, पण मीं काढलेलीं चित्र पाहून तुला आश्चर्य वाटेल! आज सोळा वर्षापूर्वी मीं तिला पाहिल होत व माडीवर खेळविल होत ती आता तरुणी असेल, पण तिची प्रतिमा मला काढता आली! आता माझी तुला एकच विनति आहे. तू राजराजेश्वरी आहेस, तेंव्हा तुला तिचा शोध करून देण सहज सा य आहे. तू हें करशील काय? एकदा—निदान एक क्षणभर तरी माझ्या लाडकीला हृदयाशीं धरायला मला सापडेल काय?"

वेडीचे डोळे पाण्याने भरून आले. पदर ओला चिंब झाला. पण लगेच तिच्या मुद्रेवर आनदाची झाक मारू लागली. ती हसत हसत ह्मणाली "अग हो, पण तुला सागायला विसरल्ये! त्या पिशाची ताराबाईचा सूड मीं उगविला तिच्या मुलीच लग्न एका मुसलमानाशीं लावून दिल, परतु अझून एक सूड घ्यायचा आहे आणि ह्मणूनच मी तुला दिसल्ये! तो जर घ्यायचा नसता तर मी तुला जन्मभर दिसल्ये नसत्ये हिरण्मयीचा भावी पति अजयसिंह–प्रतापसिहाचा मुलगा याला अकबरान तुझ्याशीं लढण्याला धाडल आहे हे मला आभ्यास असताना समजल. तर एकदा त्याची माझी रणमैदानावर गाठ घालून दे!"

चादबिबीने वेडीचा हात धरून दयापूर्ण वचनाने तिला सबोधून ह्मटले "मुमताज! स्वस्थ रहा. या अमानुष कल्पनेचा त्याग कर. जर मानवीशक्तीन साध्य असेल तर तुझी कन्या तुला भेटेल हे पक्क समज. आता तू इथच रहा. तू व तुझ्या दासींन इथच आपल घर मानून रहाव, हेच माझ मागण आहे."

---

## प्रकरण बारावे.

## हिरण्मयी कोठे गेली ?

अहमदनगरच्या युद्धात अजयसिंहास जयप्राप्ति झाली. आमच्या कथानकातील उन्मादिनीने चादबिबीच्या सैन्याचे आधिपत्य स्वीकारून मोगल सैनिकास आपल्या गायनानें व शौर्याने चकित करून सोडिले. या युद्धात चादबिबी ही केवळ वीररमणी नसून तिला अमानुष शक्तीने असाध्य गोष्टी करता येतात, अशी मोगल सैनिकाची खात्री झाली चादबिबीला आपल्या बाजूकडील लोकात ऐक्य व दृढता नाहीं हे दिसून आलें. वाचकहो! तहाच्या अटी इतिहासज्ञास विचारा. आह्मी त्या सागू शकत नाहीं. पण ते सर्व नतर! आता चला आपण आपल्या अजयसिंहाची हालहवाल पाहूं.

ग्रीष्म ऋतूतील एके दिवशीं भर दोन प्रहरीं अजयसिंह उदयपुरच्या राजवाड्यासमोर येऊन आपल्या मानवदमनावरून खालीं उतरला. राजवाड्यात सर्वत्र सामसूम होते पहारेकऱ्यापैकीं काहीं गाढ झोपी गेले होते. काहींजण अफूच्या गुगींत भिंतीकडे तोंड करून डुकल्या घेत होते. घोड्याच्या टापाचा आवाज ऐकून ते दचकून खडबडून उठले व अजयसिंहास पहाताच त्यानीं त्याला त्रिवार प्रणाम केला अजयसिंहानें एका म्हाताऱ्या पहारेकऱ्याजवळ "राणाजी कुठे आहेत?" म्हणून चौकशी केली.

पहारेकरी म्हणाला "आज दोन दिवस झाले, राणाजी बादशहाची भेट घेण्यास आग्र्यास गेले आहेत. बादशहाशी पुन. लढाई होण्याचा सभव दिसतो आहे महाराज!"

"का?"

"कुवरजी! ते आपणास आत गेल्यावर समजेल. मी कसें सागू?"

म्हाताऱ्याचे डोळे भरून आले. अजयसिहाच्या धमन्यातील रक्त सणसणून वाहू लागले तो हळुहळू आत शिरला. पण काय? सर्वत्र सामसूम! परिचारिकागणापैकी काहींजणी हातातील पखे फेकून देऊन जमिनीवर गडबडा लोळत आहेत, तर काहींजणी हातावर मस्तक ठेवून म्लान वदनाने बसल्या आहेत. सर्वच विपरीत! मेवाडराजाच्या अत:पुरात सर्वत्र औदासिन्य पसरले आहे! पाळींव हरिणे घाणेरड्या जागेवर लोळत आहेत व आपले डोळे आकाशाकडे लावून अश्रु ढाळित आहेत. मोराची साखळी अस्ताव्यस्त पडली आहे पण मोर कुठें दिसत नाहीं, हे काय? हिरण्मयीचा मोर कुठे गेला? अथवा हिरण्मयी कुठे गेली? अजयसिंहाचे मन गोधळात पडले. सारिकेच्या पिंजऱ्यात सारिकाहि नाहीं, पिंजरा शून्य—सारिका उडून गेली! उदयपुरच्या राजवाड्यातील अत:पुर असे शून्य का? काहींच समजत नाहीं! अजयसिंह आपल्या मनाशीं हे प्रश्न करित होता. पण त्याला काहींच उत्तर मिळेना व शकासमाधानहि होईना. हे आज असें झालें

तरी काय ? अजयसिह हळुहळू पावले टाकित हिरण्मयीच्या खोलीपाशीं गेला व कापऱ्या आवाजाने ह्मणाला "हिरण ?"

निःस्तब्ध वाड्याच्या अगणात प्रतिध्वनि झाला 'हिरण !'

अजयसिह पुन्हा म्हणाला "हिरण कुठे आहेस ग ?"

वाडा पुन्हा म्हणाला 'हिरण कुठे आहेस ग ?'

अजयाने हळूच म्हटले "हिरण मदिरात तर दिसत नाही !"

वाडा काहींच म्हणाला नाही ! हिरण अजयसिहाच्या हृदयमदिरात होती. तो विषण्ण मनाने तेथून परतला. अजयसिंहास पहाताच कमलावती तेथे आली तिला अजयसिहाने विचारिले "कमल! हिरण्मयी कुठे आहे ? तू रडत्येस का ?"

कमलावतीचा कठ दाटून आला नेत्रानीं वक्षस्थलावर अभिषेकाची धार धरली. जणू ते अश्रु हृदयातला अग्नि विझवूंच पहात होते! तिचा हुदका आवरेना. रडत रडत ती म्हणाली "दादा–"

अजयसिहाने पुन्हा विचारिले "हिरण मेली वाटते ?"

"दादा, हिरण मेली नाहीं! पण ती मेली असती तरी आह्मांला इतक दुःख झाल नसत !"

अजयसिंह सतापून म्हणाला "साग तर लवकर कुठे गेली ती !"

"दिल्लीच्या बादशहाच्या अतःपुरात ! मुसलमानान तिच्याशी जबरदस्तीन लग्न लावून तिला पळविली ! अस लोक म्हणतात !"

अजयसिहाचा चेहरा निस्तेज झाला, पण लगेच एकदम तो क्रोधानें लालभडक झाला अजयसिह तेथून हळुहळू पण पाय आपटित परतला. कमलावतीनें त्याला पुष्कळ प्रकारें शात करण्याचा यत्न केला, विनवणी केल्या, पण तिच्या या प्रयत्नाला यश आलें नाहीं! अजयानें तिच्याशीं एकहि शब्द न बोलता हातानींच तिचा निषेध केला. बाहेर आल्यावरसुद्धां कोणाशीं काहींएक न बोलतां किंवा कोणाला कांहींएक न सागता तो घोड्यावर स्वार झाला. मानवदमनानें धन्याच्या

मुद्रेकडे पाहून त्याच्या मनातील भाव ओळखला व तो वाऱ्यासहि मागें टाकित भरधाव सुटला.

---

## प्रकरण तेरावे

## चमत्कारिक मागणे.

अकबर बादशहा आग्र्याच्या किल्ल्यात एका प्रशस्त दालनात एकटाच बसला होता. ह्या वेळेस हातातील पत्र वाचण्यात तो गर्क झाला होता. हे पत्र अहमदनगराहून एका दूतीने आणिले होते. पत्र उर्दूत होते त्याचे मराठी भाषातर आह्मी खालीं देतो.

"भारतेश्वर!

आपण मूर्तिमत औदार्यच आहा, असें लोक ह्मणतात तरी पण आज मी जें काहीं लिहिणार आहे, ते लज्जा आणि अभिमान यामुळे लिहू नयेसे वाटतें मी आपणास आज माझे एक रहस्य कळविणार आहे, त्याविषयी विचार केला ह्मणजे जीवच द्यावा असें वाटतें हे रहस्य–जे स्त्रीमुखातून व्यक्त होणें ह्मणजे एक शरमेची गोष्ट–मी स्त्री असून आज आपणास कळविण्याचा निश्चय केला आहे आपण शत्रूचा देखील अवमान करित नाहीं, हे बादसुलतानाच्या तोंडून मी अनेकदा ऐकिले आहे हे खरे कीं खोटे, मला प्रत्यक्ष काहींच माहीत नाहीं, तरी पण मी आपली वैरीण नाहीं! कशावरून ह्मणाल, तर आपला व सुलतानाचा आता तह झाला आहे तहाप्रमाणे आपल्याला वऱ्हाड प्रात मिळाला आहे पण हाय! काय तहाचे मागणे! आपणास वाटत असेल कीं, तिने हा तह प्राण वाचावा ह्मणून केला आहे तिचे या युद्धात फार लोक मेले हे खरें, तिचा खजिना रिकामा झाला, हे त्याहूनहि सत्य आहे, आणि तिने या युद्धात गोळ्याऐवजीं शत्रूवर सुवर्णमुद्रा व रत्ने याचा उपयोग केला, हे नि शक! तरी पण, तिच्याजवळ अझून पुष्कळ रत्ने आहेत, पुष्कळ माणिके आहेत, पुष्कळ पैसा आहे, सर्वच काहीं सरला नाहीं तिचे पुष्कळ लोक मारले गेले खरे, तरी पण माझ्या सेनागणाची जरूरच पडली नाहीं भारतेश्वर! मजजवळ गायनकला, युद्धकला यात प्रवीण शभर स्त्रीसेनानी आहेत त्याच्यासमोर आपले हजार मोंगल शिपाई धूळ खातील! याशिवाय माझी स्वत ची सजीवनी वीणा व माझी स्वत ची

भयकर तरवार ही आहेतच, आणि याहिपेक्षा माझे शूर व वज्रकठिण हृदय आहे आपल्या सेनापतीस विचारा, म्हणजे ते मी खोटे लिहित नाहीं अशी आपली खात्री करून देतील मग बादसुलतानाने हा तह का केला म्हणाल, तर माझ्या सागण्यावरून ! अभागिनी मुमताजच्या मर्मवेदनानी दयार्द्र होऊन तिनें हा तह केला आता आपणाजवळ माझी एक विनति आहे ही विनति मी पत्रात कशी लिहू ? लिहायचा विचार मनात आला कीं माझी लेखणी लिहित नाहीं म्हणत्ये ! भारतसम्राट ! क्षमा असावी, सगळी कर्मकथा आपणास एकदमच कळवित नाही, तें लाबलचक चऱ्हाट समक्ष भेटून वळीन ज्यादिवशीं पिशाची ताराबाईच्या मुलीचे लग्न एका हलकट मुसलमानाबरोबर लागले ( काय तो आनदाचा दिवस ! ) त्या दिवशी आपणास एक वेडी भेटली होती आता ओळखा कोणती ती ! त्या दिवशीं आपणाला पुढे ओळख देईन म्हणून मी कबूल केले होतें एकदमच सर्व काहीं कळविता येत नाही आज या पत्रासोबत एक तसबीर धाडली आहे मी आपणास वऱ्हाड प्रात देवविला, युद्ध बद करवून तह करविला व आपल्या लाडक्या सेनापतींचे लढाईत प्राण वाचविले ( याबद्दल त्याना विचारून खात्री करून घ्या ) त्या सर्व कामगिरीबद्दल मी एकच भिक्षा मागत्यें ती काय म्हणाल, तर दिल्लीश्वर ! या तसबिरीत ज्या बालिकेची प्रतिमा आहे तिची माझी भेट करवा ! आपणास हे म्हणण्याची माझी योग्यता नाहीं, मी चूक करत्ये हें मला कळते, पण काय करू ? मन वळत नाहीं मला कोणी आतून सारखें सागत आहे कीं 'तू आपलें गाऱ्हाणे अकबरास साग म्हणजे तुझी आशा पूर्ण होईल ' भारत-सम्राट ! सर्व हिंदुस्थान आपल्या नखदर्पणावर बिंबलें आहे हिमालयाच्या शिखरापासून तो कन्याकुमारीपर्यंत—प्रत्येक राजवाड्यापासून तो प्रत्येक पर्णकुटीपर्यंत आपल्या नावाचा दरारा आहे आज दिल्लीसम्राट् यमुनेच्या काठी आपल्या हैमसिंहासनावर बसलेले आहेत तर उद्या अकबरशहा गोदावरीकांठी सन्याशाच्या आश्रमात गुप्त वेषानें उभा आहे ! ही बालिका आपल्या दृष्टीस पडावी यात काहीं असभवनीय नाहीं मी आज बारा वर्षे तिचा शोध करित आहें खरी, पण माझी आशा सफल होत नाहीं भारतेश्वर ! आपण ती सफल कराल काय ? कातरप्राणा अभागिनी उन्मादिनीच्या या लिहण्यानें क्षुब्ध व्हाल, कीं थट्टा कराल, की दयार्द्र व्हाल, हे आपणास माहीत !

मुमताज बेगम."

अकबरशहाने पत्र वाचून झाल्यावर एकवार सूक्ष्म दृष्टीने त्या तसबिरीचें निरीक्षण केले व आपल्याशींच म्हटले "खरोखर, चमत्कारिक मागणे!"

ह्याच वेळेस द्वारपाळाने मुजरा करून सागितले "जहापनाह! सेनापति अजयसिंह प्रभूच्या दर्शनास आले आहेत."

द्वारपाळाचे बोलणे पुरे झाले नाहीं तोच अजयसिंह आत आला.

अजयसिंहाचे मुख अगदीं निस्तेज दिसत होते सर्व शरीर घामाने डवडवले होते अकबरशहा म्हणाला "बाळ अजय! बरीच मजल मारल्याने सांप्रत तू अगदीं थकल्यासारखा दिसतोस तुझ्याशीं मला बरेंच बोलायचे आहे, पण आता विश्राति घे आपण मग बोलू. बेटा! तू या युद्धात जय मिळविलास त्याबद्दल–"

"त्याबद्दल बक्षीस–" अजयसिंह सतापातिरेकाने ह्मणाला "हेच कीं, हिरण्मयी एका मोगल भूताच्या अंकास शोभा देत आहे तरी क्षत्रिय-कुलागार अजयसिंह या स्वर्गीय तरवारीची तृप्ति तिला यवनशोणित पाजून करू शकत नाही!"

अजयसिंहास एकदम मूर्च्छा आली. धाडकन् तो अकबराच्या अंकावर निश्चेष्ट पडला

---

## प्रकरण चवदावे.

## अम्बरकुमारी.

हिरण्मयी साप्रत आग्रा येथे अकबरशहाच्या अंत पुरात होती. हिरण्मयीला अकबरशहा मुलीप्रमाणे पाळणार आहे, ही गोष्ट अंत:पुरातील सर्वांस ठाऊक झाली होती. अकबराने हिरण्मयीला रहाण्याकरिता स्वतंत्र महाल दिला होता व तिच्या शुश्रूषेकरिता हिंदू दासी ठेविल्या होत्या. तिच्या दासींखेरीज हिरण्मयीच्या महालात जाण्यास कोणासहि परवानगी नव्हती.

एके दिवशीं सध्याकाळीं हिरण्मयी एकटीच आपल्याशीं चिंता करित बसली होती. अकस्मात तिला समोरच्या खिडकीकडे कोणाच्या

नूपुराचा शब्द ऐकू आला लगेच बाहेरून कोणी तरी मधुर व कोमल स्वरात 'हिरण्मयी' अशी हाक मारित आहे असे तिने ऐकिले. हिरण्मयीनें आश्चर्यचकित होऊन तिकडे पाहिले आग्र्याच्या राजप्रासादात आल्यापासून तिला 'हिरण्मयी' या नावाने कोणीच हाक मारित नसे. बाहेरच्या रमणीने पुनः रजपूत भाषेत 'हिरण्मयी! भगिनी! ताई' अशा हाका मारिल्या ती काकुळतीस येऊन ह्मणू लागली "हिरण्मयी, तुमच्या मी पाया पडत्ये, एकदा आपल्या महालात येण्याची परवानगी द्या. आज एक महिना झाला, तुम्ही इथ आहा, पण माझ फुटक नशीब, कीं, एक दिवससुद्धा तुमची भेट झाली नाही! रोज येईन ह्मणत्ये, पण सवीच सापडत नाहीं बादशहाची परवानगी नाहीं ह्मणतात. तुमची परवानगी असल्यावर मग काय करायची बादशहाची परवानगी? मग येऊ का आत?"

हिरण्मयी विस्मित मुद्रेने ह्मणाली "कोणबाई तुह्मी? या."

बाहेरील तरुणीने आत प्रवेश केला रमणी सुदरी होती हे हिरण्मयीच्या दृष्टीस पडले पूर्णसलिला तटिनीच्या वक्षःस्थलावर ज्याप्रमाणे जल-लहरी केलि करतात, त्याप्रमाणें या पूर्ण सौदयमयीतरुणीच्या देहावर सौंद-र्यलहरी उचबळत होत्या रमणीच्या मुखाकडे पाहताच ही बालिकाच असावी, असा भास होत होता. बालिकेसारखी तिची सरल व चचल मुखमुद्रा पाहून ही कोणाहि पुरुषाच्या कुटिलकटाक्षाने आरक्त सलज्ज होणार नाहीं, असे भासत होते. बालिकेसारिखेच तिचे हास्यमुख, बालिकेला शोभण्यासारखेच गुलाबकळीप्रमाणे अधर, बालिकेसच योग्य असा मधुर कठस्वर! तरुणीने मुसलमानी पोषाख केला होता. कठहार, कनकवलयें व चरणनूपुर यावर रत्नजडित काम केले होते. तिच्या दाही बोटांनां आंगठया शोभा देत होत्या. रमणीनें आपले अवगुठन दूर करून म्हटलें "ताई! माझा हा पोषाख पाहून तुला नवल वाटत असेल नाहीं? पण मला हा फार आवडतो! एकेकाळीं मलाहि याचा फार तिटकारा

वाटत असे. पायजामा वगैरे पाहून तर मला हसू कोसळत असे पण मला आता हा राजपुतानी पोषाखापेक्षाहि फार आवडतो!"

हिरण्मयीने आश्चर्ययुक्त दृष्टीने तरुणीकडे पाहून म्हटलें "आपण रजपूत! तर मग आपण युवराज्ञी अम्बरकुमारी वाटत?"

अम्बरकुमारीने गालातल्यागालांत हसून म्हटले "भगिनी! बरोबर ताडलस, मी तीच अभागिनी! ताई, तू किती सुदर दिसत्येस! हृदयाशीं धरून तुला गाढ आलिंगाव अस मला झाल आहे! सर्व लोक ह्मणतात कीं, अकबरशहाच्या अत पुरातल्या नारींपेक्षा सुदर नारी जगतात नाहींत हे ऐकून मला फार गर्व वाटत असे पण भगिनी! तुला पाहिल्याबरोबर आता मला असं वाटू लागल आहे, कीं, तुला देवीप्रमाण एके ठिकाणीं बसवून तुझ्याकडे सदासर्वदा पहातच बसाव! ये, मला तुझी वेणी घालू दे!"

विरक्तभावानें हिरण्मयी ह्मणाली "माझी वेणी घालायचा समय अझून आला नाही! तू सुखात लोळत्येस ह्मणून तुला ह्या सर्व गोष्टी बऱ्या वाटतात!"

"तस नव्हे ग ताई! तुझे हे मेघासारखे केश किती मळले आहेत बर? त्याची ही दशा पाहून मला फार वाईट वाटत. बस जरा, माझ इतक ह्मणण कबूल कर!"

अम्बरकुमारी हसतहसत हिरण्मयीचे केश हातात धरून गोजारू लागली व तिने वेणी घालण्यास सुरुवात केली. वेणी घालून झाल्यावर अम्बरकुमारी हिरण्मयीच्या शेजारीं जाऊन बसली व आपल्या दोन्ही हातानी तिचे हात धरून ह्मणाली "मी तुला एक गोष्ट विचारत्ये, सागशील का? मी जर तुझी बहीण, तर मग माझ्याजवळ मन मोकळ करून बोलशील ना? त्याना तुझ्याकरिता वेड लागल आहे ह्मणून ऐकल्ये, परंतु तू त्याच्याबरोबर दिल्लीच्या तक्तावर बसण्याला कबूल नाहींस, हे खरच ना?"

अम्बरकुमारी आणखी ह्मणाली "मी तुला आणखी एक गोष्ट सागत्ये मलासुद्धा एके काळीं असच वाटत होत लग्न होण्यापूर्वी मी किती तरी रडल्ये आणि माझ्या मनात किती तरी नाहीं नाहीं ते विचार आले. अगाई! मुसलमानाबरोबर मी कशी रहाणार? यवनाच उच्छिष्ट भक्षण करताना माझे प्राण कसे रहातील? पायजामा घालण्यान्या आधींच हा देह प्रेत होवो! 'अल्ला', 'तोबा', हे शब्द ऐकून मी आपल हसू कस आवरीन? असे नाना तर्क माझ्या मनात येत असत पण ते दिवस गेले! आता मला महमदीधर्मच बरा वाटतो त्यान्यासारखा सुदर पुरुष त्रिभुवनात कुठच नाहीं त्याना आता राज्याभिषेक होणार. कारण, मामजीच ह्मातारपण झाल आहे भारतेश्वरी होण्याची कुणाला इच्छा होणार नाहीं?"

हिरण्मयी आपल्या कुदकळ्यासारख्या दातानी आपले पोवळ्यासारखे ओठ चावून ह्मणाली "धिक्कार असो तुला अम्बरकुमारी! तुझी सवत होण्याची जिची इच्छा असेल व तुझ्यासारखी नीच मनाची जी क्षत्रियकन्या असेल, तिच्याजवळच ही बोलणीं बोल!"

हिरण्मयीच्या रागाचे पर्यवसान अश्रूत झाले ती म्हणाली "तुझ्या पाया पडत्ये, माझ्या दु खावर आणखी अशा डागण्या नको देऊस!"

अम्बरकुमारी ह्मणाली "मी काय करत्ये? प्रत्येक क्षणीं तुला सकटाची भीति आहेच!"

"पण माझे प्राण माझ्या ताब्यात आहेतना?"

अम्बरकुमारी आता उठून उभी राहिली. तिच्या बालिकेसारख्या मुद्रेवर भारतेश्वरीस शोभणारे गाभीर्य चमकू लागले. हिरण्मयीकडे दयार्द्र व प्रेमळ दृष्टीने पाहून तिने ह्मटले "हिरण्मयी! तुला कशान सुख होईल, हे पहाण्याकरिताच मी इतक बोलल्ये. राजपुतान्याची पूर्व कीर्ति लोपण्यास अझून पुष्कळ अवकाश आहे, हे मला पक्केपणीं समजल. ज्या देशात तुझ्यासारख्या निग्रही स्त्रिया आहेत, तिथ यवनाचा जम जमण सहज नाहीं! तुला थट्टेथट्टेत मीं दिल्लीच्या तक्तावर नेऊन

बसविलं; पण तुला मी आणखी एक प्रकारं सहाय्य करू शकत्ये. भगिनी! मीं तुझ्याकरिता एक अलकार आणिला आहे!"

"अलकार!" हिरण्मयीने विस्मित नयनानी अम्बरकुमारीकडे पहात ह्मटले.

"हो ताई, अलकार! हा पहा! विपत्तीच्या वेळेस क्षत्रियकन्येस यापेक्षा दुसरा प्रिय अलकार कोणता आहे?"

अम्बरकुमारीने आपल्या वस्त्रातून एक लखलखीत कट्यार काढून ती हिरण्मयीच्या हातात देऊन ह्मटले "ह्म पहा अलकार! हा तुला आवडेल ना? ज्या वेळेस सर्व आशा मावळतात व सर्व भरवसा नाहींसा होतो, त्या वेळेस हा अलकार किती प्रिय वाटतो! पण एक विनति करित्ये, ह्याचा उपयोग माझ्या पचप्राणावर मात्र करू नकोस!"

हिरण्मयीच्या हातात कट्यार देऊन अम्बरकुमारी तेथून निघून गेली. हिरण्मयीने कट्यारीचे चुबन घेतले व ती आपल्या हृदयाशीं धरून ठेविली.

आणखी एक व्यक्ति भितीआड उभी राहून सर्व काहीं पहात होती. अम्बरकुमारी व हिरण्मयी या दोघीनीहि तिला पाहिले नाही. ही व्यक्ति युवराज सेलीम!

---

## प्रकरण पधरावे.

## चांदण्यांत.

पौर्णिमेची रात्र. हिरण्मयी एका दासीसह आपल्या महालाजवळील बगीच्यात बसली होती. पूर्ण शशीच्या पूर्ण प्रेमात दग होऊन वसुमति पूर्ण सुखात हसत होती निशेच्या मलिन मुखास उज्वलित करित, तारकागणास अमृतप्रवाहात न्हाणित, चकोराच्या चचल हृदयांत सुधाप्रवाह ओतित, कुसुमाच्या परिमलास वाढवित, कोकिलेच्या मधुर गायनास अमृतसिंचनाने मधुरतर करित व कुसुमोद्यानास प्रेमप्रवाहात शीतल करित करित पूर्ण शशीहि पूर्ण सुखात दंग होऊन गेला होता! याच कोकिलेच्या गायनाने मनोल्हादक झालेल्या, याच

कुसुमाच्या परिमलाने सुखशांति देणाऱ्या, व याच अमृतप्रवाहयुक्त गगनतलाखालीं उद्यानात बसलेल्या हिरण्मयीचे म्लान मुख अधिकच म्लान होऊं लागलें बाळपणींचीं सर्व सुखें तिच्या डोळ्यांसमोर उभीं राहिलीं. आपल्या बालसख्या अजयसिंहाचे प्रेममय मुखमंडल तिच्या हृत्पटावर स्पष्टपणानें चित्रित झाले. एक दीर्घ निश्वास सोडून हिरण्मयीनें आपल्या दासीला विचारले "कायग, अम्बरकुमारी कुठं आहे? ती मला इथं भेटायला येणार आहे ह्मणून तूंच सांगितलं होतस ना?"

दासीनें काहींच उत्तर दिलें नाहीं. खालीं मान घालून ती मुकाट्यानें निघून गेली तत्क्षणीं तिला 'हिरण' ह्मणून कोणीं हाक मारली.

हिरण्मयीने आश्चर्यचकित होऊन मागें पाहिले, तो अजयसिंह! अजयसिंह हिरण्मयीसमोर येऊन उभा राहिला. किती वेळ तरी दोघेहि एकमेकाच्या तोंडाकडे पहात तटस्थ उभीं होतीं. जणू काय, परस्पराच्या मुखपानानेंच तीं परस्पराचे विचारपान करित होतीं. अत्यंत मुखपानामुळेच कीं काय, हिरण्मयीचे नेत्रद्वय वारिमोचन करूं लागले. ती त्यास प्रतिबंध करित ह्मणाली "अजय! तूं इथं कां आलास?"

अजयसिंहास हिरण्मयीचा भाव समजल्यासारखा दिसला नाहीं. तो ह्मणाला "काय ह्मटलेस हिरण? मी येथें कसा आलो?"

"हे यवनसम्राटाचं अंतःपुर, इथं प्रत्येक क्षणीं तुझ्या जिवास धोका आहे."

"जिवास धोका! हाय! हिरण्मयी! अखेर तुझ्या तोंडून हेच ऐकायाला मिळाले? हिरण्मयी कारागृहात पडली असतां मीं अजयसिंहाने प्राणाच्या भयाने लपून रहावें, अं?"

"अदृष्टात लिहिलेलं कोण खोटं करूं शकेल! पण तू माझ्याकरितां आपल्या जिवावर संकट कां आणतोस? देवानं माझ्या कपाळीं जे लिहलं होतं, ते मी भोगित्ये आहे."

अजयसिंह घेरी येऊन धाडकन् पडला. तो शुद्धीवर येऊन पहातो, तों कौमुदीदीप्त हास्यमयी वसुधा अंधकारांत बुडाली आहे. दोन्हीं

हातानी तोंड झाकून विकृत कठानें अजयसिह ह्मणाला "जगदीश्वर! अकबरशहा असत्यवादी ! माझा प्राण हिरण्मयी, माझी लाडकी हिरण्मयी कोणातरी यवनाची पत्नी आहे, हेच खरे !"

हिरण्मयी आवेशाने ह्मणाली "अजय ! तुला वेड तर नाही लागल ? अशी गोष्ट घडण शक्य तरी आहे ?"

अजयसिहाचे नेत्र चटकन् उघडले तो आपल्या गुडध्यावर सावरून बसून ह्मणाला "हिरण ! तर साग लवकर, या कनकपारिजाताला यवनस्पर्श नाहींच झालाना ? माझ्या हृदयात वणवा पेटला आहे "

"अजय ! तुला वाटत का, कीं, हिरण्मयी यवनस्पर्शान कलकित झाल्यावर कुडींत प्राण ठेवण्याइतकी नीच आहे ह्मणून ?"

अजयसिह ताटकन् उभा राहिला त्याचे मुखमडल एकदम आशा व उत्साह यानी प्रफुल्ल झाले. आवेशाने तो ह्मणाला "मग माझी सुरसुदरी या मानवभवनात का ? चल हिरण ! मी तुला आपल्या हृदयाशीं धरून हजारो यवनाचीं प्रेते पाडित उदयपुरास घेऊन जातो !"

हिरण्मयीने मागे सरून उत्तर दिले "अजय ! तुला एक विनति करत्ये—आजपासून तू मला स्पर्श करू नकोस, व या अभागिनीच नाव घेऊन आपली जीभ विटाळू नकोस. अरे हे काय ? तू तर रडायला लागलास ?"

हिरण्मयीला चादण्यामुळे अजयसिहाच्या नेत्रातून वाहणाऱ्या अश्रुधारा दिसल्या तत्क्षणीं हिरण्मयीचे धैर्य खचले ती चटकन् पुढें सरली व दोन्ही हातानी अजयाचे अश्रु पुशितपुशित म्हणाली "अजय ! तू कुणासाठीं रडतोस ? माझ्यासाठीं ? ,अरे, मी तर तुझ्यापुढ कःपदार्थ आहे ! तुझ्या डोळ्यात अश्रु पाहून माझ्या हृदयाच पाणी होत !"

अजयसिंह ह्मणाला "तू काय ह्मणत्येस हे मला काहींच समजत नाहीं, हिरण !"

हिरण्मयी पुनः मागे सरून ह्मणाली "ऐक अजय, तू क्षत्रियवीर धीरोदात्त प्रतापसिंहाचा पुत्र ! केवळ एका अभागिनीकरिता तू मेवाडच्या

पवित्र नावाला कलक लावू बघतोस व वृद्धपणीं पित्याच्या आज्ञेचा भग करू पहातोस, हे काय? जिवात जीव आहे तोपर्यंत हिरण्मयीला यवनस्पर्श होऊ शकत नाहीं, हे खरें, पण मी आता बादशहाच्या अत.पुरात राहल्ये, आणखी लौकिक रीतीन माझा विवाह यवनाशीं झाला असल्यामुळ तुझ्याशीं माझा विवाह होण केवळ अशक्य आहे! म्हणून म्हणल्ये, मला विसर तुझी हिरण या पृथ्वीतलावर नाहीं, अस समज!"

हिरण्मयीने या वेळीं आपल्या वस्त्रातून कट्यार बाहेर काढून म्हटले "सुदैवान देवान या आपत्तींतहि ही एक सखी दिली आहे!"

अजयसिंह म्हणाला "हिरण्मयी! तुला विसरल्यावर या अजयसिहाचे प्राण राहतील, असे का तुला वाटते? प्राण चूर्ण होतील, हृदय शतधा विदीर्ण होईल, पण प्राणज्योति हिरण्मयीची स्मृति त्या प्राणाच्या व हृदयाच्या प्रत्येक रोमरोमात भरून राहील! हिरण! तुला काय वाटते? ज्या दिवशीं माझा प्राण अकबराच्या अत.पुरात गेला म्हणून ऐकिले, त्या दिवसापासून माझ्या मनाला काय यातना होत आहेत, हे मी तुला काय सागू? हे दुःख माझ्या हृदयाचे कसे पाणी पाणी करित आहे! हृदयाला हजारो क्षते पडलीं आहेत! हृदय जर दाखवता आलें असते तर या हृदयाच्या क्षतातून कसा रक्ताचा पाट वहात आहे हे तुला दिसले असते हिरण!"

हिरण्मयीचा कठ दाटून आला. स्फुदत स्फुदत ती म्हणाली "अजय! तू मेवाडचा भरवसा, राजपुतान्याच्या अधिधात्री देवीचा प्रियतम वीर पुत्र आहेस. तिच्या प्रिय अजयसिंहास या अभागिनीचा स्पर्श होऊ नये, अशी सिंहवाहिनीचीहि पण इच्छा आहे. तिन मला एकदा स्वप्नात येऊन असच बजाविल होत. मीं तुला स्पर्श केल्यास तो तुला अमगलकारक होईल! हेच भगवतीच सागण होत व ते आता खर ठरल!"

"हिरण! जर तुला यवनस्पर्श झाला नाहीं, तर तुझ्याशीं लग्न करण्यात मी क्षात्रधर्म कसा मोडतो? चल हिरण! मी तुला पिताजींकडे नेऊन त्यानां हें विचारतो."

अजयसिंह पुनः हिरण्मयीचा हात धरण्यास पुढें झाला. इतक्यात कोणी मागून बोललें "जो चोर भारतेश्वराच्या अंत:पुरात शिरण्याचे साहस करील, त्याचे शिर सेलीमची तरवार याप्रमाणेच धडापासून वेगळे करील!"

याच वेळेस अजयसिंहाच्या मस्तकावर चांदण्यात तरवार चमकतांना दिसली, परंतु ती अजयसिंहाच्या मस्तकास स्पर्श करू शकली नाहीं! कारण, मागून कोणीं एकाने विद्युद्वेगाने सेलीमच्या तरवारीवर आपल्या तरवारीचा घाव मारला—सेलीमची तरवार खालीं पडली! आपला यत्न व्यर्थ झाला, हे पाहून "ज्या राज्यात खास राजाच काफराचा पक्ष घेतो ते नाश पावलेच पाहिजे!" असें पुटपुटत सेलीम जळफळत बाहेर पडला.

अजयसिंहाची दृष्टि चटकन् मागें उभा असलेल्या अकबरशहावर पडली. सम्राट् ह्मणाला "अजय! चल मजबरोबर!"

अजयसिंह मंत्रबद्धाप्रमाणे बादशहाच्या मागोमाग गेला. बाहेर आल्यावर अकबर ह्मणाला "माझ्याच सांगण्यावरून दासीनें तुला हिरण्मयीकडे नेले होते. हिरण्मयीला मुसलमानाचा स्पर्श झाला नाहीं हें मीं तुला सांगितले होते. आतां तुझी खात्री झालीना?"

अजयसिंहानें कांहींच उत्तर दिले नाहीं. सम्राट् ह्मणाला "प्रतापसिंहाचा विचार घेऊन तुझ्या लग्नाचे ठरवून टाकू."

अजयसिंहाने आकाशाकडे पाहून आपल्या कपाळावरचा घाम पुसला व आपल्याशींच ह्मटले "आज चांदण्यांतसुद्धां इतका प्रचंड उष्मा कां बरें असावा!"

## प्रकरण सोळावे.

## सम्राट् व राणा.

अकबरशहा आपल्या विश्राममदिरात बसला होता. जवळच एका रत्नजडित सिंहासनावर राणा प्रतापसिह विराजमान झाला होता. दोघेहि बराच वेळ अगदीं स्तब्ध होते. दोघाच्याहि मुखमडलावर गभीरतेच्या रेषा स्पष्ट दिसत होत्या. काहीं वेळाने अकबरशहा राणाजीस ह्मणाला "राणाजी! आज काहीं महत्त्वाच्या कामाकरिता आपल्याला मुद्दाम बोलावले होते. आज मी आपणाजवळ जी गोष्ट काढणार आहें तिला आपण सामान्य समजून फेटाळून लावणार नाहीं, अशी मला आशा आहे."

प्रतापसिंहानें औत्सुक्याने ह्मटले "बोला काय ते?"

बोलण्यास कशी सुरुवात करावी, हे अकबरास समजेना. तो गभीर मुद्रेने काहीं वेळ प्रतापसिंहाकडे पहात राहिला शेवटीं धीर करून ह्मणाला "राणाजी! दैववशाने ग्वाल्हेरची राजकन्या माझ्या अत:पुरात आली आहे, हें आपणास माहीतच आहे."

प्रतापसिंहाचे डोळे खदिरागाराप्रमाणे लाल झाले. तो ह्मणाला "हो माहीत आहे! सिह निजला असता जबुकाने त्याच्या शावकास उचलून नेले व मुमूर्षु प्रतापसिंह ते अझून सहन करून राहिला आहे! बोला, आणखी काय ह्मणणे आहे?"

अकबरशहा पुन: शातपणानें ह्मणाला "आणि तिचे अकबरशहानें स्वत:च्या कन्येप्रमाणे रक्षण केले आहे हिरण्मयी अझून कलकहीन आहे."

"असहाय रजपूत अबलावर आपली कृपादृष्टि आहे, याबद्दल मी आपला फार आभारी आहे! आणखी काय बोलायाचें आहे?"

"तिचें कोणातरी कुलीन रजपुत तरुण सरदाराशीं लग्न करून देण्याचा माझा मानस आहे."

प्रतापसिंह तिरस्कारयुक्त मुद्रेनें म्हणाला "आपल्या दरबारात रजपूतांना काय कमी आहे? आपले प्रियदोस्त मानसिंह, सचिव भगवान

सिंह व बिरबलादि रजपूत वीरानी आपला दरबार गजबजला आहे ! त्यांपैकीं वाटेल त्याशीं आपण हिरण्मयीचे लग्न लावून देऊ शकाल !"

अकबर ह्मणाला "हिरण्मयीच्या शीलाविषयीं आपण सशय घेंऊ नका जरी मेवाडवशात तिला दिली तरी त्यापासून मेवाडवशाची अपकीर्ति होईल, असे नाहीं !"

प्रतापसिंह आरक्त लोचन करून ह्मणाला "नीच यवनाने माझ्या अत पुरातून माझ्या स्वर्गवासी प्रिय मित्राची कन्या पळवून नेली— नदनवनातील पवित्र पारिजातक नरकात फेकून देवपूजेस अयोग्य केला ! तरी पण प्रतापसिंहाचे पाषाणहृदय हे अझून सहन करून घेत आहे ! तरवारीच्या वारासरशीं त्याने या अपमानाबद्दल आपले किंवा शत्रूचे शिर धडापासून वेगळे केले नाहीं !"

अकबर शात भावाने ह्मणाला "राणाजी ! असे उतावीळ होऊ नका. स्थिर चित्ताने आपण विचार करून पहा अगदींच आवश्यकता नसती, तर मीं आपणाजवळ ही गोष्ट कधींच काढली नसती ! जर विवाह झाला नाहीं तर त्याच्या भावी सुखाची आशाच नको, असें मेवाडवशातील एका तरुणाचे हिरण्मयीवर मन बसले आहे. तेंव्हा मग हा विवाह करणे जरूर आहे कीं नाहीं ?"

"मेवाडवशात असा भाग्यशाली पुरुष कोण आहे ? सागा बरें!"

"हा तरुण राजस्थानातील अद्वितीय वीर अजयसिंह! दुर्भाग्य अजयसिंह हिरण्मयीसाठीं अगदीं वेडा झाला आहे."

अकस्मात् राणा प्रतापसिंहाच्या मुखमडलावर युद्धाच्या वेळची कालांतक छाया पसरली ! विशाल डोळे जासवतीच्या फुलाप्रमाणे लाल झाले ! आरक्त कपाळावर हिरव्या शिरा स्पष्ट दिसू लागल्या ! डोक्यावरचा मुकुट खालीं पडला ! ताडकन् उठून उभे राहून म्यानातली तरवार बाहेर काढून प्रलयकालच्या मेघध्वनीच्या आवाजासारख्या वाणीनें तो ह्मणाला "यवनराज ! निद्रिस्त सिंहाला असे वारवार कां डवचतां ? आतां एकदा त्याच्या पराक्रमाची परीक्षा पहा !"

इतिहासात अकबरशहा अमानुष सहिष्णुतेबद्दल व अपरिमेय मानसिक शक्तीबद्दल प्रसिद्ध आहे. या गुणाचा त्याने आज पुरा प्रत्यय दाखविला! प्रतापसिंहाचा कोप शांत होण्याची त्याने वाट पाहिली. प्रतापसिंह अकबराच्या अविचलित मुखमंडलाकडे पहात पहात पुन: आपल्या जागीं जाऊन बसला. बराच वेळ तो अकबराकडे एकाग्र दृष्टीनें पहात होता. शेवटीं ह्मणाला "काय ह्मणालात दिल्लीश्वर? माझा लाडका अजयसिंह—मेवाडचा एकमात्र भरवसा, मुमूर्षु प्रतापसिंहाचा कलिजा व आर्यावर्ताचा शिल्लक असलेला एकटा वीर—मोगल राजाच्या अंत:पुरात राहणाऱ्या व यवनाच्या स्पर्शाने कलंकित झालेल्या हिरण्मयीसाठीं वेडा झाला आहे? झूट! माझा या बाबतींत तरी आपणावर विश्वास बसत नाहीं! माझी खात्री करून द्या, नाहीं तर अकबरशहा मिथ्यावादी आहे असे मी ह्मणेन!"

अकबरशहा पूर्वीप्रमाणेच गंभीर मुद्रेने ह्मणाला "माझ्यावर विश्वास नसेल तर अजयसिंहाला विचारा!"

अकबराने लगेच अजयसिंहाला बोलाविण्यासाठीं दूत पाठविला.

---

## प्रकरण सतरावें.

## पितापुत्र.

अजयसिंहास बोलाविण्याकरिता दूत रवाना झाल्यावर प्रतापसिंह आपल्याशींच ह्मणाला "असंभवनीय! छे! आता अभागी प्रतापसिंहाच्या दुर्भाग्यानें काय असंभवनीय आहे? हे जग प्रतारणा व विश्वासघात यानी परिपूर्ण आहे. अकबरशहा! मी आपणास उदार अंत:करणाचे समजत होतो. आपण जातीनें यवन, तथापि याच भरवशावर मीं आपल्या पुत्रास तुंमच्या स्वाधीन केले. प्रतापसिंहा! भोग आतां आपल्या अविचाराचे फळ!"

इतक्यात अजयसिंह आत आला. प्रतापसिंहानें विषादपूर्ण, अश्रुपूर्ण नेत्रानी त्याच्याकडे पाहून ह्मटलें "बाळ! हे दिल्लीश्वर आज तुझ्यावर आरोप करित आहेत? काय ते लवकर साग!"

अजयसिंहाला या विचारण्याचा अर्थच कळेना. तो म्हणाला "कसला आरोप पिताजी?"

प्रतापसिंह ह्मणाला "बाळ! समजले मला. तुझ्यावरचा आरोप खोटा. तू हिरण्मयीकरिता वेडा झाला आहेस असा तुझ्यावर अकबरशहा आरोप करतात."

बिचारा अजय स्तब्ध उभा राहिला त्याच्या तोंडून कापऱ्या आवाजात "पिताजी—" इतकींच अक्षरें बाहेर पडलीं. त्याने आपली दृष्टि खालीं करून अश्रूनी भूमातेस अभिषेकाची धार धरली. आपले दोन्ही हात हृदयाशीं धरून मस्तक भिंतीस टेकून तो उभा राहिला.

वृद्ध प्रतापसिंहाचा चेहरा निस्तेज झाला. त्यानें आपले दोन्ही डोळे मिटून घेतले. थोड्याच वेळात त्याला घेरी येऊन तो पडला. अजयसिंहाने पित्याचे मस्तक माडीवर ठेवून हळुहळू पाणी शिंपडण्यास सुरुवात केली. अकबरशहा स्वतः वारा घालू लागला. प्रतापसिंह झोपेंतल्यासारखा बरळू लागला. "कोण, कोण देवी! अंबिके! हाय जननी! आज किती दिवसानी तरी या गरिबावर दया केलीस ही? पण हे काय, आज ही कोणत्या रूपानें मला दर्शन देत आहे? जननीच का तू माते? तुझी ती भुवनमोहिनी मूर्ति कोठे आहे? ज्या मूर्तीच्या दर्शनासाठीं ह्मणून हा काळपावेतो प्रताप जगला—ती मूर्ति कोठे आहे? माते! कोठें आहे ती मूर्ति? तुझ्या गळ्यातील ती नररुडमाला कोठे आहे? जननी! ती तुझी रक्तरसना कोठे आहे? तुझा तो असुरकुलविध्वंसी मानवलोहितकराल कृपाण या दुर्दिनात कोठे ठेविलास? या विपत्तिकालात माते! एकदा त्या रूपानें दर्शन दे! एकदा ते रूप धारण करून तुझ्या दासाला मार्ग दाखीव. दाखवशील का? वृद्ध प्रतापाच्या बाहूत

बल ओतशील का? नाहीं तर जा देवी! मला असेच प्राण सोडूदे! मी तुझ्या या रूपाचा उपासक नाहीं!"

काहीं वेळाने प्रतापसिंह पुनः शुद्धीवर आला, व अजयसिंहाकडे पहात पहात विकृत स्वराने ह्मणाला "कुलकलंक अजय! हे काय केलेस रे? तू मला का स्पर्श केलास? या तुझ्या स्पर्शाने मला जें पाप लागले, त्यातून मी कधींहि मुक्त होणार नाहीं! मग ते खरेंच ना? दिल्लीश्वर! मीं आपणास मिथ्यावादी ह्मटले, याबद्दल क्षमा करा! बेटा अजय! काय ह्मटलेस? यवनगृहीं रहाणाऱ्या हिरण्मयीवर तुझें प्रेम आहे. हाय बाळा! मेवाडच्या सर्वस्वा! प्रतापसिंहाच्या पंचप्राणा! एकदा मजजवळ ये, ह्मणजे या तरवारीनें तुझ्या त्या पापी मनाचे तुकडे तुकडे करतो!"

अजयसिंहाने पुढें होऊन पित्यासमोर आपली विस्तीर्ण छाती उघडी केली. प्रतापसिंहानें कापऱ्या हाताने आपली तरवार म्यानातून काढली व आता ती तो अजयाच्या वक्षःस्थलावर हाणणार, तोच अकबरानें प्रतापसिंहाचा हात धरून ह्मटले "राणाजी! मी आपणास वीरपुरुष मानित होतो! आपले आजचे हें कर्म पैशाचिक निष्ठुरता होय!"

प्रतापसिंह दातओठ चावित आपल्या आसनावर जाऊन बसला व ह्मणाला "हाय! अकबरशहा! तूच प्रतापसिंहाच्या अदृष्टाचे अभद्र नक्षत्र आहेस! पदोपदीं तुझी प्रतिकूलता, प्रत्येक कार्यांत तुझा अवरोध मला नडतो आहे!"

नंतर अजयसिंहाकडे वळून तो ह्मणाला "अजय! आज माझ्या तरवारीनें तुझ्या हृदयाचे दोन तुकडे करून तुझें पापक्षालन करणार होतो व मेवाडच्या गौरवाचें रक्षण करणार होतो, पण विधात्याची तशी इच्छा नाहीं! आता मी काय सांगतो हे लक्ष्य देऊन ऐक. तू हिरण्मयीला विसर! तुझ्या अंगात संग्रामसिंहादिकांचे रक्त खेळत आहे, यासाठीं कुलांगार निपजू नकोस! आजपासून दोन वर्षांत आपल्या मनाचा पराभव करून हिरण्मयीला आपल्या हृदयातून हांकून दे!

जर दोन वर्षांनतर हिरण्मयीच्या प्रेमपिपासेने तुझे हृदय व्याकुल होईल, तर तुझा तो पापी पिंड शरीरातून काढून टाक, व पवित्र जलात फेकून दे! प्रतिज्ञा पूर्ण न केलीस तर मला पुन. तोंड दाखवू नकोस! माझें वचन पाळशील याबद्दल शपथ वहा!"

अजयसिंह आवेशाने ह्मणाला "पितृदेव! याच पवित्र भवानीवर हात ठेवून शपथ वाहतो, कीं, हिरण्मयीला विसरण्याचा ह्मणून दोन वर्षे हरतऱ्हेने यत्न करीन व प्रतिज्ञा पूर्ण न झाली तर याच तरवारीनें आपला हृत्पिंड पवित्र जलात फेकून देईन! आता हा कुलागार अजयसिंह जातो, याचा शेवटचा प्रणाम स्वीकारा!"

"कुलागाराचा कुलदीपक झाल्याशिवाय मला पिता ह्या नावाने हाक मारू नकोस! जा, प्रतिज्ञा पूर्ण कर व यश घेऊन ये!"

---

## प्रकरण अठरावे

## यमुनेच्या वक्ष स्थलावर.

मध्यरात्रीचा सुमार. एक क्षुद्र नौका यमुनानदींतून अतिवेगानें चालली होती. नावेंत अजयसिंह एकटाच डोळे मिटून बसला होता. नदीच्या सलिलांत तारकामालानी सुशोभित नीलाकाश प्रतिबिंबित झाले होते. तटिनीच्या चचल वक्षाशीं सुधाशु क्रीडा करित होता. नीलवसना, चचलप्राणा, हीरकहारशोभिता, सौंदर्यमयी यमुनेच्या प्रेमलहरी तरगामुळे उचबळत होत्या. अजयसिंह नावाड्याला ह्मणाला "खूप वेगाने नाव चालव. तुला हा हार बक्षिस देईन!"

नावाड्याने विचारिले "महाराज! नाव कुठे नेऊ?"

"दूर—दूर—खूप दूर! अधकारात—घोर निबिड अधकारात घेऊन जा. जेथे ही तरगिणी तारामाला धारण करून नृत्य करित नसेल, जेथें चद्र नसेल, वायु नसेल तेथें चल. नाव जलदी चालव, उशीर करू नकोस!"

हाय! बालक अजयसिंह! या सग्रामपूर्ण नरजीवनात जोपर्यंत धमन्यांतून रक्त वाहत आहे तोपर्यंत कोणीं बरें मनाला जिंकिलें आहे?

नाविक हू कीं चू न करता वेगाने नाव चालवू लागला. अजयसिंहहि पूर्वीप्रमाणेच स्तब्ध बसला. याच वेळीं नदीतीरावर कोणी गात होतें:—

**बिनती करू सावलिया तोरी**
**मोसे ना बोल, बाय छोड मोरी ॥ ध्रु० ॥**
**रोषकरि है यदि सुन पाये । पिया तोरी ये मतबारी ॥**
**बिनती करू सावलिया तोरी ॥**
**प्राण परतोरे जागत प्यारी । मोसे बनमाली चातुरी सारी ॥**
**बिनती करू सावलिया तोरी ॥**

हे काय! अजयसिंह स्वप्न का पहात आहे? अनेक दिवसापूर्वी बाळपणीं हेच गाणे, हाच सुधामय कंठस्वर, हेच मनमोहन आलाप त्याने किती वेळ तरी ऐकिले होते! त्याची बालसखी हिरण्मयी हे गाणे फार सुरेख ह्मणत असे वसन्तात सकाळीं वसन्ती रंगाचे कपडे घालून, कंठात जुईच्या फुलाचा हार घालून, एका हातात अबीर व एका हातात अशोकाचीं फुले घेऊन हेच गाणे, हेच स्वर व हेच आलाप घेत घेत हिरण्मयी त्याच्या बरोबर क्रीडा करित असे! अजयाने हिरणला धरायास जावे व हिरणने अजयाच्या अंगावर फुले व अबीर उधळून पळून जावे! पण आज तेच गाणे गात आहे—ही हिरण्मयीच काय? पण हिरण्मयी येथे कोठून आली? अजयसिंह जागा आहे कीं झोपेत आहे? त्याला हीहि शंका आली व तिची निवृत्ति करण्याकरिता त्यानें डोळे उघडून चोहींकडे पाहिले यमुनेच्या चंचल वक्षावर सुधांशु क्रीडत होता. तिच्या कंठात हीरकमाला चमकत होत्या. नदीच्या वाळवटावर पुन. गीतध्वनि झाला —

**"प्राण परोरें जागत प्यारी ।**
**मोसे बनमाली चातुरी सारी ॥"**

अजयसिंहानें एकदम नावेत उभें राहून हाक मारिली "हिरण्मयी!"

चारी बाजूस त्याचाच प्रतिध्वनि झाला. यमुनातरंगावर, आकाशात चंद्रावर—एकच प्रतिध्वनि 'हिरण्मयी!'

अजयसिंहाने एक हात हृदयावर ठेवून दुसऱ्या हातानें तोंड झाकलें व तो नावेत पडून राहिला. यमुना आपली नाचत होती व तरगाबरोबर खेळत खेळत नाव पुढें चालली होती.

---

## प्रकरण एकोणिसावें.
## अधारांत.

अजयसिंह पित्याच्या आज्ञेनुरूप उदयपुरापासून किंवा आग्र्यापासून दूर जाण्यास निघाला. प्रशातशालिने! नृत्यगीतशीले यमुने! तुझ्या वेदपाठानी दुमदुमणाऱ्या, होमगधानी सुगंधित व जितेद्रिय महर्षीचे वास्तव्य असलेल्या जयमालानी पवित्र तीरावर, किंवा पल्लवहारानी सुशोभित व हजारो लहानलहान नद्यानी वृद्धि पावलेल्या भागीरथीच्या तीरावर—तुह्मा दोघींच्याहि तीरावर—अजयसिंहाने आश्रय घेतला नाहीं! जनशून्य व कठीण विंध्याद्रीच्या पाषाणमय वक्षावर राहून आपले हृदय पाषाणमय करण्याचा त्याने निश्चय केला होता. अजयसिंह दुर्गम विंध्य पर्वतावर आरोहण करू लागला. परतु प्रस्तरमय विंध्य पर्वतावरसुद्धा श्यामलवर्ण तरुराजि हास्य करित होती. वृक्षपर्णाच्या आडून पक्ष्याचीं सुस्वर गाणीं ऐकू येत होतीं एक लहानशी नदी पाषाण भेदून प्रेमानें गिरीचे पाषाणहृदय आर्द्र करित होती. गिरिचरणाशीं चिरयौवना, रजतसलिला नर्मदा प्रेमाने हसत नृत्य करित होती. हे सर्व पाहून अजय निराश झाला! येथेसुद्धा प्रलोभनशीला व मोहमयी सृष्टि हास्यमुखाने क्रीडा करित होती. कोणीकडेहि अजयाने पहावे, तो प्रत्येक स्थल हिरण्मयीची आठवण करून देत होते! डोळे मिटून घेतले तरी शब्दमयी सृष्टि मधुररवानें त्याला हिरण्मयीच्या सुधामय कठाची आठवण करून देत होती कोठे जावें? कोठे गेले ह्मणजे या सृष्टीच्या मोहजालातून आपण निसटू? विंध्याद्रीवर असे कोणतेच स्थान नाहीं काय, कीं, जेथें गेले ह्मणजे हृदय शात होऊन सृष्टीच्या मोहमय रूपानें त्याची चलबिचल होणार नाहीं? बिचारा

अजयसिंह अतिशय संकटांत पडला. निराश अंतःकरणानें तो एखाद्या अंधाऱ्या गुहेचा शोध करूं लागला. पुष्कळ शोधानंतर, पुष्कळ भटकल्यावर, त्याला एक वृक्षराजिविहीन व शब्दहीन स्थान सापडलें. त्याच्या चारी बाजूस दगडच दगड होते. नदीचा कलकल ध्वनि किंवा विहगाचे मधुर आलाप कांहींच ऐकूं येत नव्हते. अजयसिंहानें येथेंच एकटें बसून हिरण्मयीच्या स्मृतीस आपल्या हृदयांतून काढून टाकण्याकरितां कठोर व्रत स्वीकारण्याचें निश्चित केलें.

दिवस गेला रात्र आली आधींच निरव असलेल्या जनशून्य स्थानीं अगदींच शुक्र झालें. दाही दिशा अंधारांत बुडून गेल्या. चारी बाजूस असीम अंधार व त्यावर असीम आकाश. हाहां ह्मणतां मस्तकावरील कृष्ण आकाशांत घनघोर काळेकुट्ट मेघ गर्जना करूं लागले.

थोड्याच वेळांत मुसळधार पाऊस पडूं लागला. याच निर्जन प्रदेशांत, अशा घनघोर पावसांत व अशाच भयंकर अंधारांत अजयसिंह चिंब भिजून गेला असतां रक्त गोठण्यापर्यंत पाळी आली, तरी त्याच्या मनांत हें काय चाललें आहे? घोर अंधकारांत व गंभीर प्रलयकालाच्या वेळीं सुद्धां हिरण्मयीची मूर्ति त्याच्या हृदयांतून नाहींशी होणें दूरच राहिलें, पण अधिकच स्पष्टपणें त्याच्या डोळ्यांसमोर ती उभी राहिली! कंपित आवाजानें अजयसिंह ह्मणाला "हाय! अजयाच्या देहांत प्राण असेपर्यंत हिरण्मयीची त्याला विस्मृति होणार नाहीं!"

बाजूस कोणींसें ह्मटलें "इथून चला आतां, इथें फारच पाऊस पडतो आहे व भयंकर अंधार पसरला आहे!"

अः! हा काय मनुष्याचा आवाज? या निर्जन स्थलीं, एवढ्या घोर रात्रीं, मनुष्य कोठून आला? कीं हे अजयाच्या भ्रमिष्ट मस्तकाचे खेळ? का ही शैलविहारी देवता अजयाचें दुःख पाहून त्याला सहाय्य करावयाला आली?

अजयसिंहानें विचारिलें "कोण! मनुष्य कीं देव?"

"आपल्यासारखाच मीहि एक भग्नहृदय बैरागी आहे मीहि आपल्यासारखाच मर्मवेदना चुकविण्याकरिता ह्मणून अधाराचा आश्रय धरून बसलो होतो"

अजयसिंहाला हे ऐकून एक प्रकारें आनदच झाला. तो ह्मणाला "काय! या जगात माझ्यासारखा हतभागी आणखीहि एक प्राणी आहे? ये गड्या! आपण दोघे समदु खी एकमेकास कडकडून भेटू!"

अजयसिहाने बैराग्याला आलिंगन देण्याकरिता ह्मणून हात पसरले, पण बैरागी लाब सरून ह्मणाला "आजची रात्र फारच भयकर बोवा!"

अजय ह्मणाला "खरेच, फारच भयकर रात्र!"

"चला तर मग इथून आपण जाऊ."

"कोठे जायचे?"

"गावात अधारात प्राण फार व्याकुल होतात व आठवण फारच बळावते!"

निराश हृदयाला सहानुभूति मिळाली, ह्मणजे तेवढा वेळ तरी नैराश्ययातना नाहींशा होतात कारण, आकस्मिक उत्साहामुळे निराशेची आठवण बुजून जाते! अजयसिहाने टाळी वाजवून ह्मटले "खरेच गड्या! एकातात बसले ह्मणजे हृदयातला अग्नि अधिक चेततो. चल तर मग, आपण भग्नहृदय बैरागी गावात जाऊ"

अजयसिह हळुहळू चालू लागला बैरागीहि मागोमाग चालला. अधारात वाट दिसत नसे, पण थोड्याच वेळाने आकाश स्वच्छ झाले. गगनपटावर उषःकालसमयींची मुकुटज्योति विकीर्ण झाली. अजयसिंहाला वाटले, आता पहाडावरून उतरण्यास बरें पडेल. पण जावयाचे कोठे? त्याने बैराग्यास विचारिले "आता कोठे चलायाचे?"

पण अजयाच्या या प्रश्नाला उत्तर मिळाले नाहीं. बैरागीहि तेथें नव्हता मागून येत असेल ह्मणून अजयानें वाट पाहिली, हाका मारल्या, पण बैरागीहि नाहीं अथवा उत्तरहि नाहीं!

---

## प्रकरण विसावे

## गिरिराणी

पुष्कळ दिवसानी आज वर्षाकालाचे मेघजाल नाहीसे होऊन नील नभोमडलात सूर्यकिरणात लहानलहान शुभ्र मेघमाला चमकत होत्या. या मेघखडाचे प्रतिबिंब तुडुब भरलेल्या नर्मदा नदींत पडले होते. नदीच्या काठची सर्व तरुराजि सुवर्ण रगाने रजित झालेली दिसत होती. जवळच एका लहानशा टेकडीवर एक लहानसा प्रासाद दिसत होता. अजयसिहाला थकवा येऊन नदीतीरावर एका झाडाखाली झोप लागली काहीं वेळाने एकाएकी बासरीचा मधुररव कर्णपुटात घुमून त्याची झोप उघडली अजयाने उठून आश्चर्यचकित मुद्रेने पाहिले —अजयाला सर्वत्र आश्चर्य दिसावे असे त्याच्या दैवींच लिहिले होते!— तो एक अप्रतिम सौंदर्यराशि किशोरी आपल्या सख्यासहवर्तमान मधुर, उच्च व तीव्र बासरीरवाने काननप्रदेशात प्रेमप्रवाह ओतित आहे! तरुणी प्रासादाकडून पर्वताखालीं उतरत होत्या उतरता उतरता त्या सर्व अजयसिहाजवळच आल्या. किशोरीची माधुरीमय मूर्ति पुष्पालकारानी सुशोभित होती गळ्यात मोगऱ्याचे हार, हातामध्ये शेवतीचीं ककणे व चपकाचे गुच्छ, अशाच तऱ्हेने सर्व देहावर पुष्पनिर्मितच अलकार विराजत होते. जणू वनदेवीने आपल्या या लाडक्या दुहितेस मढविण्याकरिता सर्व पुष्पास आज्ञाच केली होती! किशोरीची बासरी एकाएकीं वाजेनाशीच झाली! वनसुदरीचे सर्व लक्ष्य अजयसिहाची शरीरकाति निरीक्षणं करण्यात वेधून गेले. तिच्या मुखचद्रावर आश्चर्य स्पष्ट झळकू लागले नितबभागावर लोबणारी दीर्घ वेणी कपित होऊ लागली. लाल गुलाबाच्या फुलास लाजविणाऱ्या तिच्या अधरात चैतन्य उत्पन्न झाले—ते आता फुरफुरू लागले. तिचे डोळे प्रभातकाळींच्या कमलाप्रमाणे आरक्त झाले. तिचे बाहू वसतात डोलविलेल्या

मोगऱ्याच्या कळीप्रमाणे फुरफुरू लागले. किशोरी एका तरुणीस ह्मणाली "सखे! हा कोण असावा बर?"

"कुणी तरी वाटसरू वाट चुकून आला असेल!"

"विचार बर त्याला."

"तुह्मीच विचारा बाईसाहेब!" समवयस्क सखी हसून ह्मणाली

"मला लाज वाटते, सखे! तूच विचार"

सखी किंचित् हसत हसत पुढे सरून अजयसिंहास ह्मणाली "महाराज! आमच्या गिरिराणी आपण कोण आहा हे जाणू इच्छितात."

अजयसिंहाने उत्तर दिले "मी एक पाथस्थ आहें. चालून चालून थकलो ह्मणून येथे विश्रातिस्तव पडलो होतो."

गिरिराणी ह्मणाली "सखे! हे तर फार थकलेले दिसतात, त्याना माझ्या अतिथिशाळेत विश्राति घ्यायला साग!"

अजयसिंहास पहिल्याने गिरिराणीच्या ह्मणण्यास रुकार द्यावासा वाटेना त्याने ते एकदोनदा नाकारिले. पण किशोरीच्या व सखीच्या अत्याग्रहावरून शेवटीं तो कबूल झाला. कबूल होण्यापूर्वी अजयसिंहाने गिरिराणीकडे पाहिले व मग तेथून दुसरीकडे दृष्टि फिरविली. एका बाजूस विशालकाया नदी वहात होती व दुसऱ्या बाजूस पल्लवभाराने नम्र व पुष्पगुच्छानी सुशोभित झालेली तरुराजि वाऱ्यात डुलत होती. वर नील आकाश भगवान् सूर्यनारायणाच्या प्रकाशात चकाकत होतें.

गिरिराणी सख्याच्या मागें राहून अज्यसिंहाच्या जवळून जवळून चालू लागली सखी ह्मणाली "बाईसाहेब! या वेळीं बासरी वाजवाना?"

गिरिराणीनें बासरी ओठाशीं धरली व वसंतराग गाण्यास आरभ केला, पण आज बासरी रोजच्यासारखी वाजेचना! वसन्त वाजवावा तर बिहागाचे सूर निघत, बिहाग वाजवू लागावे तो भैरवीची नाहीं तर बागेसरीची चाल वाजू लागे. आज गिरिराणीची बासरी वाजेचना!

## प्रकरण एकविसावें.

## गोकुलदास.

अजयसिंह गिरिराणीबरोबर राजप्रासादात शिरला. हा प्रासाद ह्मणजे एक दगडानी बाधलेले लहानसे दोन मजली घर होतें. राजप्रासादाचे चिन्ह इतकेच कीं, ह्या घराभोवतीं एक मातीचा कोट होता. कोटात एका बाजूस गिरिराणी व तिच्या सख्याचे राहण्याचे ठिकाण होते. त्यापुढें विस्तीर्ण अगण होते. या अगणाच्या एका बाजूस एक लहानसाच पण सुरेख बगीचा होता. बगीच्यासमोरच सैनिकाचीं राहण्याचीं घरे होती. बाजूस पागा होती. सगळ्या राजप्रासादास एक लहानसा किल्ला असे ह्मटले तरी चालेल. ह्याला गिरिदुर्ग असे ह्मणत.

अजयसिहाला विश्रातीकरिता एक लहानशी खोली दिली होती. रात्रीच्या वेळेस तो खिडकीतून नदीतरगाशीं चाललेली चद्राची क्रीडा पहात बसला होता. गिरिराणी सख्यासहवर्तमान तेथे आली व तिने विचारले "महाराज! इथ आपणाला त्रास तर होत नाहींना?"

अजयसिंहानें गिरिराणीचे ते कोमल व मधुर शब्द ऐकले, पण उत्तर काय द्यावे हे त्याला काहींच समजेना. गिरिराणी पुनः ह्मणाली "आज माझे बाबा इथ असते तर आपल्याशीं गोष्टी करण्यात त्यानां मोठा आनद झाला असता."

अजयसिंहाने विचारिले "ते कुठें आहेत?"

गिरिराणीच्या डोळ्यात अश्रु आले ती ह्मणाली "आज दोन महिने झाले, बाबा पुष्करतीर्थाकडे तप करण्यास गेले आहेत. जाताना 'दोन महिन्यात आलो नाहीं तर गोकुलदास माझी हकीगत सागेल' अस सागून गेले आहेत. त्याना जाऊन दोन महिने झाले!"

"गोकुलदास कोण?".

"गोकुलदास माझा प्रधान आहे माझ्या बाबाचा बालमित्र आहे. चपले! जाग गोकुलदासाला बोलावून आण."

सखी चपला गोकुळदासास बोलाविण्याकरिता गेली. गिरिराणी एकदम भयभीत होऊन ह्मणाली "ते पहा काय आहे ते!"

अजयसिहाने खिडकीतून पाहिले, तो एक लांब दाढीने युक्त मुसलमानाचे डोके महालाकडे पहात होते क्षणार्धात ते दिसेनासे झाले. अजयसिह उठून उभा राहिला त्याने म्यानातून तरवार उपसली, व त्याचा तो शोध करू लागला, पण त्याचा काही शोध लागला नाहीं!

थोड्याच वेळाने घोड्याच्या टापाचा आवाज ऐकू आला व्याकुल चित्ताने अजयसिह खोलींत हेलपाटे घालू लागला गिरिराणी व तिची दासी ह्यापैकी आता तेथे कोणीच नव्हते मात्र एक वृद्ध गृहस्थ त्याच्याकडे पहात होता बराच वेळ आश्चर्यचकित मुद्रेने अजयसिहाकडे पाहिल्यावर वृद्धाने त्याला लवून प्रणाम केला अजयसिहास ह्यातला काहीच अर्थ समजेना तो ह्मणाला "हे काय! मला गरीब पांथस्थाला आपण इतका लवून प्रणाम का करिता?"

वृद्ध ह्मणाला "कुवरजी! मी आपणास ओळखले आपण माझ्या प्रभूचे—प्रतापसिहाचे—धाकटे चिरंजीव अजयसिंह!"

अजयसिह आश्चर्यचकित होऊन ह्मणाला "आणि आपण कोण?"

"या दासाचे नाव गोकुळदास"

---

## प्रकरण बेविसावे.

## गिरिराणीवरचे संकट.

गोकुळदास ह्मणाला "महाराज" आपण येथे अगदीं योग्य प्रसगीं आला! आमची बालराज्ञी गिरिराणी हिचे राज्य फारच धोक्यात आहे ह्या सकटकालीं ईश्वरानेच दयाळू अत करणाने गिरिराणीचे रक्षण करण्यास व माझ्यासारख्या ह्मातार्‍याचा मान राखण्यास प्रतापसिहाच्या शूर पुत्रास धाडून दिले आहे!"

अजयसिह ह्मणाला "आपल्या या राणीचे वडील कुठे गेले?"

गोकुळदास ह्मणाला "हिचा पिता अनेक वर्षांपूर्वी वीरक्षत्रियाच्या पुण्यभूमिवर यवनसैन्याशीं लढत असता हा लोक सोडून गेला, परतु ती गोष्ट आपणास मागाहून सांगेन. या दुर्गाचा मालक एक संसारत्यागी तापसी आहे त्याचा जन्म एका प्रसिद्ध क्षत्रियकुलात झाला आहे, परतु आज पधरावीस वर्षांपूर्वी त्याने क्षत्रियधर्मास अनुसरून संन्यासदड धारण केला याच वेळेस या राणीच्या पित्याने काही विशिष्ट कारणाकरिता हिला त्याच्या स्वाधीन केले व उभयताकरिता हा गिरिदुर्ग बाधून दिला. रजपूत योग्याने येथेच तपश्चरण सुरू केले व या राणीस कन्येप्रमाणे वाढविले आज दोन महिने झाले, मला एकातात बोलावून ते ह्मणाले 'गोकुलदास! या गिरिदुर्गावर सकट येणार आहे हे मला समजले आहे. थोड्याच दिवसात या किल्ल्यावर नररक्ताचा सडा शिपला जाणार आहे, व माझी लाडकी गिरिराणी सकटात सापडणार आहे. मी आता ह्यातारा झालो आहे, व मला या आश्रमात हाती तरवार धरावयाची नसल्यामुळे तिचे सकट दूर करण्यास मी अगदींच असमर्थ आहे मी आता तीर्थयात्रेस जातो, व तेथे या सकटाचे निवारण करण्याकरिता देवापाशी तप करीन माझे हेतु सफल झाले तर मी परत येईन, न झाले तर मात्र माझ्या भेटीची आशा धरू नको! तू मात्र जिवात जीव आहे तोपर्यंत हे मकट टाळण्यासाठीं यत्न कर पुढे देवाची मर्जी!' इतके बोलून योगिराज निघून गेले. तेव्हापासून सारखे अपशकुन होत आहेत, आपण त्यापैकीं काहीं आताच पाहिले, असे गिरिराणी सागत होती ह्मणूनच ह्मणतो, ईश्वराने आपणास अगदी योग्य वेळीं धाडले आहे आता आपण थकला आहा तर थोडीशी विश्राति ध्या. उद्या सेवक सेवेला हजर होईलच." असे ह्मणून अजयसिंहास प्रणाम करून गोकुलदास निघून गेला.

अजयसिंह एकटाच स्वतःशीं विचार करित बसला. गिरिराणीवरील सकटाच्या विचाराने त्याचे मन फारच उदास झाले, पण गिरि-

राणीवर काय संकट येणार? किती दिवसानी येणार? तोपर्यंत आपण येथेच रहावें का? सखीगणानी वेष्टिलेल्या गिरिराणीच्या बासरीचा शब्द ऐकून आपले चित्तस्थैर्य डगमगणार नाहींना? छे, येथे राहूच नये!

हिरण्मयीची मूर्ति हृदयातून काढून टाकण्यासाठीं त्याने वैराग्याचा वेष धारण केला होता मग हेच का त्याचे वैराग्य! हाच का त्याचा कठोर व्रतास उपयुक्त वैराग्यधर्म! लगेच गिरिराणीचा सुकुमार देह, नुकत्याच विकास पावलेल्या गुलाबकलिकेसारखे तिचे आरक्त अधर, नितबभागावर लोंबणारा भ्रमरकृष्ण केशकलाप त्याच्या दृष्टिसमोर दिसू लागला गिरिराणीच्या मधुर नि स्यदिनी बासरीचा गगनभेदी स्वर त्याच्या कर्णपुटात घुमू लागला क्षत्रियकुमार होऊन या सरळ व असहाय बालिकेचे सकट त्याने निवारू नये काय? काय करावे? व्रताचरण कीं वर्णाचरण? अजयसिहाच्या मनात गिरिराणीविषयीं भगिनीप्रेम वास करू लागले भगिनीवात्सल्यानें त्याच्या मनास हालवून सोडले. बऱ्याच वेळाने अजयसिहाला झोप लागली.

सकाळीं उठताच अजयसिंह गोकुलदासाच्या शोधास निघाला गोकुलदास बागेत पूजेकरिता फुले तोडित होता अजयसिह ह्मणाला "मी काहीं विशिष्ट कारणाकरिता येथून जाण्यास आपली परवानगी मागण्यासाठीं आलो आहे"

"काय ह्मटलेत? आपण जाणार? मेवाडाधिपतीचा वीर पुत्र क्षत्रियधर्मावर पाणी सोडण्यास तयार झाला आहे? एका अनाथ बालिकेस विपत्समयीं सहाय्य करणे हे त्याला आपले कर्तव्य वाटत नाहीं?" गोकुलदास आश्चर्याने ह्मणाला.

"गोकुलदास! जिवात जीव आहे तोपर्यंत आपल्या बालराज्ञीस सहाय्य करण्यास मी तयार आहे! पण काहीं विशिष्ट कारणाकरिता अगदीं एकातात दोन वर्षे तप करण्याचा मीं निश्चय केला आहे. येथे राहिल्यास माझ्या तपात व्यत्यय येण्याचा सभव आहे. मी येथे जवळच रहाण्याचा बेत केला आहे. सकटकालीं आपण किल्ल्यावर चढून भेरी

वाजवा, ह्मणजे मी तत्क्षणीं येऊन गिरिराणीसाठीं हातात शीर घेऊन शत्रूशीं लढेन."

गोकुलदास ह्मणाला "आपली इच्छा असेल तसे करा. आज्ञा पाळण्यास सेवक तयार आहे."

थोड्याच वेळाने गिरिराणी त्याच्याकडे येत आहे हे गोकुलदासास दिसून आले बालराज्ञीचे मुख आज फारच म्लान दिसत होते. गोकुलदास गिरिराणीला मुलीप्रमाणे मानित असे त्याचे चित्त राणीवर येणाऱ्या सकटाच्या विचाराने फारच व्याकुल होऊन गेले होते काय केले ह्मणजे हे सकट दूर होईल, हाच विचार त्याच्या मनात रात्रदिवस घोळत होता या सकटाविषयीं गोकुलदासाने गिरिराणीजवळ आतापर्यंत एक अवाक्षरहि उच्चारले नव्हते. यावेळीं राणी दृष्टीस पडताच गोकुलदासाच्या मनास चरका बसला. तो ह्मणाला "गिरिराणी! वाईट वाटू देऊ नका. आपले वडील लवकरच परत येतील!"

"गोकुलदास, हे तर कालच तुह्मीं मला सागितलंत"

"मग आज तुह्मी अशा खिन्न का?"

"छे', उगीच काहीं तरी ह्मणता झाल," गिरिराणी बळेच हसून ह्मणाली "मी तुह्माला एक गोष्ट विचारायाला आल्ये आहे काल आलेला पाथस्थ आपल्या जागेवर नाहीं. मला वाटल तो इथ असेल, पण इथहि नाहीं, मग तो गेला कुठ?"

"त्याच्या व्रतास येथे व्यत्यय येण्याचा सभव असल्यामुळे तो जवळच अरण्यात रहाण्यास गेला आहे. येथून जाण्यापूर्वी मला भेटून जाईन ह्मणून त्याने कबूल केले आहे."

"एकटाच जगलात रहाणार?"

"एकटाच. त्याला कसले आले आहे भय! त्याच्याजवळ तरवार आहे व तो स्वत. क्षत्रिय आहे."

गोकुलदास! अजयसिंहावरचे सकट तरवारीनें दूर होणे शक्य आहे काय!

गिरिराणी किती वेळ तरी गोकुळदास फुले तोडित होता, तिकडे पहात राहिली. काही वेळाने ती ह्मणाली "तो पुनः इथ केव्हा येईल?"

गिरिराणीच्या उज्ज्वल नेत्रातून वक्ष स्थलावर टपटप अश्रु पडले गोकुळदासाने ते पाहिले नाहीत

---

## प्रकरण तेविसावे.

## तापसकुमार

सध्याकाळीं गिरिराणी नर्मदा नदीच्या काठी बराच वेळ हिडत होती तिची बासरी अनेक रागरागिण्या नाना आलाप घेऊन गात होती. आज पुन पाथस्थ बैराग्याचे दर्शन होईल, अशी तिला आशा होती. नदीतीरावर अधार पडला तेव्हा गिरीराणी हताश अत करणाने घरीं परतली पाथस्थाचे पुनर्दर्शन झाले नाहीं.

सकाळीं गिरिराणीने आपल्या सखीस उठवून ह्मटले "चपले! ह्या दिवसात सर्व रान फुलानी सजल असल्यामुळ सुरेख दिसत, हे तूच मला सागितलसना? चल तर मग, आपण एकदा रानात जाऊ"

"बाईसाहेब, आपण बायका माणस, एकटच रानात कस जाव बर?"

"सखे! तो बैरागी इथ जवळच राहतो व तो क्षत्रिय असून त्याच्या जवळ तरवार आहे अस गोकुळदास सागत होते, मग आपल्याला कसल भय?"

चपला गिरिराणीच्या ह्मणण्यास कबूल झाली व सख्यास बोलाविण्या-साठीं निघून गेली. जाता जाता ती आपल्याशींच ह्मणाली "हा एक दिवस दृष्टादृष्ट झाली त्याचा परिणाम!"

थोड्याच वेळाने अरण्यात गिरिराणीच्या बांसरीचे अति उच्च, सुललित व करुणतम आलाप ऐकू येऊ लागले पुष्कळ वेळपर्यत एका रागिणी-मागून दुसरी रागिणी, नूतन आलापावर नूतन आलाप, एक लय सपल्या-बरोबर दुसरी लय व करुणरसामागून करुणतर रस वातावरणात

पसरू लागले आज बासरीला विराम नव्हता, गिरिराणीलाहि विश्राति नको होती बऱ्याच वेळाने चपला गिरिराणीस ह्मणाली "बाईसाहेब! आज आपल्या बासरीस मद झाला आहे, तेव्हा या बासरीला विश्राति द्या "

उन्मत्त बासरी, की वाजविणारी ?

चपला पुन: ह्मणाली "चला आता, ऊन्ह लागू लागल "

गिरिराणीने बासरी ओठापासून दूर केली व दीर्घ नि श्वास सोडून ह्मटले "चल."

गिरिराणी दुर्गाकडे चालू लागली इतक्यात एका तापसकुमाराने तिच्यासमोर येऊन तिला प्रणाम केला जटाजूटाने तापसकुमाराचे मुखमडल झाकून गेले होते, त्यामुळे ते पर्णावृत कमलाप्रमाणे सुदर व सुकुमार दिसत होते तापसी गिरिराणीला ह्मणाला "देवि! अजयसिंहाला तुह्मी या अरण्यात पाहिलत का ?"

तापसाचा हा प्रश्न ऐकून गिरिराणीला आश्चर्य वाटले ती ह्मणाली "अजयसिह कोण ? तुह्मी त्या क्षत्रिय बैराग्याविषयीं तर विचारित नसाल? त्याच नाव का अजयसिंह ?"

"दोन दिवसापूर्वी इकडे आलेला बैरागी अजयसिंहच होय माझी त्याची चागली ओळख आहे "

"ते कुठ आहेत ?" गिरिराणी अगदीं सहजपणे बोलली.

तापसी ह्मणाला "हो, ते याच अरण्यात आहेत त्याना तुमच्या वाड्यात रहाण प्रशस्त वाटल नाहीं. पण मी त्याना पुन· वाड्यात रहाण्याविषयी आग्रह करितो. देवि! जर आपण रागावणार नाही, तर मी आणखी एक गोष्ट आपणाजवळ विचारितो!"

"खुशाल विचारा."

"त्याचा व माझा चागला परिचय आहे. राणीसाहेब, ते जगन्मान्य राजवशातले पुरुष आहेत. त्याच वीरहृदय सर्वगुणपरिपूर्ण आहे आणि आपण साक्षात् सरस्वतीच भूवर अवतरला आहा! तेव्हा हा मणिकाचनयोगच होय, अस मला वाटत. आपली व त्याची त्या दिवशीं सध्याकाळीं

भेट झाली तेव्हा मी जवळच होतो, ह्मणून मला अधिकच भरवसा वाटतो."

तापसाचे बोलणे पुरें झाले नाहीं तोच गिरिराणीच्या मुखमडलावर प्रभातरवीच्या तेजाची झाक मारू लागली. तापसी पुढें बोलू लागला "असला मणिकाचनयोग कोणाला आवडणार नाहीं? पण आपल्या-जवळ मला एक भिक्षा मागावयाची आहे. मी फार थकलो आहे, तेव्हा हा देश सोडून आणखी कुठ जाव अस मला वाटत नाहीं, ह्मणून आपल्याजवळ इतकीच विनति आहे कीं, आपल व अजयसिंहाच लग्न झाल्यावर मला या आपल्या राज्यात आपल्या वाड्यासमोर किंवा या अरण्यात रहाण्यास परवानगी द्या. मी लाबूनच तुह्मा दोघाचे प्रीति-ज्योतीन चमकणारे डोळे पाहीन, दुरूनच आपल्या बासरींतून निघणारे आलाप ऐकून हृदय शात करीन, व दुरूनच या प्रेमपूर्ण निकेतनात वाहणारा प्रेमौघ पाहून पार्वतीपतीच्या चरणावर प्रेमाश्रूची धार धरीन!"

तापसकुमार गिरिराणीसमोर हात जोडून व गुडघे टेकून उभा राहून आणखी ह्मणाला "गिरिराणी! घालालना मला ही भिक्षा? करालना माझी आशा पूर्ण?"

तापसाचा कठ दाटून आला डोळ्यातून अविरल अश्रुधारा वाहू लागल्या तो पुन उठून उभा राहिला व "पुन्हा आपल्यास भेटेन," इतकेच बोलून झपझप पावले टाकित निघून गेला.

तापसकुमार निघून गेल्यावर हा कोण असावा, ह्याबद्दल गिरिराणीच्या सख्यात बरीच भवतिनभवति झाली. कोणीं त्याला वेडा ठरविले, तर कोणीं उलट ह्मटले, त्याचा अजयासिंहाशीं काय सबध असावा याविषयींच्या तर्कशास्त्रात कोणी निमग्न झाल्या मात्र चपलेचा तृतीय पथच! तिने हा तापसी पुरुष नाहीं ह्मणून ठरविले!

गिरिराणी काहींच बोलली नाहीं. ती अगदीं निःशब्द. नतर सख्याबरोबर ती दुर्गात गेली.

## प्रकरण चोविसावे.
## बैराग्याचा उपदेश.

मागील प्रकरणात सागितलेल्या गोष्टीला आज चारपाच महिने लोटले होते. अजयसिंह अधकारपूर्ण रात्रीं अध:कारमय आकाशाकडे टक लावून आपल्याशींच विचार करित बसला होता. या पाचसहा महिन्यात तो कितीदा तरी गिरिदुर्गात गेला असेल व गिरिराणी-वरच्या सकटाविषयीं त्याचे व स्वामिभक्त गोकुलदासाचे कितीदा तरी सभाषण झाले असेल. गिरिराणी त्याला पाहताच आनदयुक्त मनानें त्याच्याजवळ येत असे तो जोपर्यत तेथे असे तोपर्यत किशोरी त्याच्याकडे पहात असे, व अनन्यभावानें त्याच्या गोष्टी ऐकत असे. पण तो जाऊ लागला, कीं, तिचे नेत्र अश्रूनी भरून येत हें प्रेम का? गिरिराणीचे अजयसिंहावर प्रेम जडले होते का? ठरलेल्या वेळीं अजय-सिंह न आला तर गिरिराणी त्याला शोधण्यास लोक पाठवित असे. स्वत सख्याबरोबर जाऊन ती त्याच्या आश्रमाजवळ बासरी वाजवित बसे बैरागी दृष्टीस पडला नाहीं तर तिचे मन इतके व्याकुल का होत असेल बरे? छे, प्रेम कसले! ही अपरिपक्व वयातील चचलता असेल. अजयसिंह तिच्यापाशी असला ह्मणजे गिरिराणीच्या बासरींतून फारच मधुर आलाप निघत असत, पण तो जवळ नसला ह्मणजे मात्र हृदयास घरे पाडणारे करुण आलाप बाहेर पडत हे तर प्रेमाचे स्पष्ट लक्षण! यावरून तर किशोरीच्या अत.करणात प्रेमाचे बीज रोवले जाऊन त्याला अकुर फुटू लागले होते, हे स्पष्ट दिसते. आणखी, हे अकुर उपटून न काढले तर कालान्तराने ते दृढमूल होण्याचा सभव. गिरिराणीशीं गोडगोड बोलून तिचा भ्रम दूर करावा असे अजयसिंहास पुष्कळदा वाटे, परतु बालिकेच्या सरल, सुकुमार मुखाकडे पाहिले, व तिचे सरलतामय मधुर भाषण ऐकिलें, कीं, तसे करण्याचे त्याला धैर्यच होत नसे! तिच्या कोमल हृदयास कसें दुखवावें, हाच विचार सर्वदा त्याच्या मनात येई. मग काय, आज भेट होईल, उद्या

भेट होईल या आशेवर तिला ठेवून त्याने येथून निघून जावे ? पितृहीना सहलहृदया बालिकेला जन्मभर अश्रु ढाळावयास लावून दु खात लोटून जाणे हे नीचाचे काम ! तर मग, बालिकेला आपल्या हृदयात स्थान द्यावे ? विद्युत्स्फुरणाप्रमाणे अजयसिंहाच्या मनात एकदम हा विचार उद्भवला त्याने आपले हृदय रिकामे आहे कीं काय हे पाहण्यास डोळे मिटले. पण रिकामें कसले ? अधकारपूर्ण हृदयात एकच उज्वल आलोकमयी व चिरप्रेममयी मूर्ति ! बालपणापासून त्याने ज्या मूर्तीची आराधना केली, जागृत असता, निद्रित असता, शयनात, स्वप्नात, मपदेत, विपदेत, आनदोत्सवात तसेच समरकोलाहलात ज्या मूर्तीने एकदा हृदयात वास केला तीच आनदमयी प्रतिमा अझून तेथेच होती ! ज्या मूर्तीला हृदयातून घालविण्याकरिता तो नगरापासून इतका दूर आला, आतापर्यत गिरिगव्हरात, निर्जन अरण्यात व घोर तिमिरात बैराग्याच्या वेषाने राहिला, तीच प्रतिमा पूर्ण सौदर्याने व पूर्ण गौरवाने अझून त्याच्या हृदयातच होती आणखी गिरिराणी ! तिचा कोठे पत्ताच नाही ! काय ? ही प्रतिमा येथून ढळणार नाहीच इतकी हट्टी आहे का ? अजय ! हिरण्मयीचे अत करण तुला दिसू शकेल काय ?

इतक्यात एकाएकी अजयसिहाला कोणी मागून 'अजयसिह' अशी हाक मारली. आश्चर्यचकित मुद्रेने अजयसिहाने मागे वळून पाहिले तो समोर तापसकुमार उभा ! अजयसिंह आपल्याशीच ह्मणाला "अझून अजयसिह हिरण्मयीला विसरू शकत नाही ! या अपरिचित तापसकुमाराचा आवाजसुद्धा मला हिरण्मयीच्या कठासारखाच वाटतो !"

तापसकुमार ह्मणाला "अजयसिह ! तुह्मी फारच निष्ठुर आहा. गिरिराणीचे प्राण तुमच्याकरिता व्याकुळ होतात, आणखी तुह्मी तिला झुरत ठेविता ?"

अजयसिंह ह्मणाला "आपण कोण ? सुमारे आठदहा महिन्यापूर्वी विंध्याद्रीच्या अधकारपूर्ण गुहेत मीं एका तापसकुमाराला पाहिले होतें तेच का आपण ?"

"तपस्व्याची कसली ओळख? मी तुह्माला आता सांगायाला आलो आहे ते ऐका गिरिराणीवर संकट आले आहे व केवळ तिच्यावर नव्हे तर तुमच्यावरसुद्धा संकट आलें आहे!"

"मी कोण आहे हे तुह्माला कसे समजलें?"

"मी आपणाला एकदा सांगितलेंना, परिचय करून घेण्याचा हा समय नव्हे ह्मणून? मी आज अरण्यांत पूजा करित बसलो होतो, त्या वेळेस पुष्कळसे मुसलमान सैनिक एकत्र बसून मसलत करित होते, ते ऐकून माझ्या अंगावर शहारे आले एकजण ह्मणाला 'तुमचे ह्मणणे काय आहे हे स्पष्ट सांगा आमचे तुह्माला सहाय्य हवे की नको?' दुसरी व्यक्ति ह्मणाली 'माझी आणखी कांही इच्छा नाहीं, फक्त गिरिराणीला येथून नेण्याची आहे माझे लोक थोडे आहेत, पण आपण सहाय्य कराल तर हे काम सहज होण्यासारखे आहे' यावर पहिली व्यक्ती ह्मणाली 'आह्माला फक्त अजयसिंहाला कैद करून न्यावयाचे आहे जर त्याला राणीचे सहाय्य मिळेल तरच आह्माला तुमच्या लोकांची गरज पडेल' मी हे ऐकल्याबरोबर तुमच्या शोधाला निघालो किती वेळाने तरी तुह्मी मला येथे भेटलात उठा, आता आपले कर्तव्य करा, व राणीला सोडवा"

अजयसिंह ह्मणाला "गिरिराणीवर संकट येणार हे मला पूर्वीच कळलें होते"

"तर मग आपण वाड्यांतच कां जाऊन राहिला नाही? इतक्या लांब रहाणे उचित नव्हे!"

यावर अजयसिंहाने कांहीच उत्तर दिलें नाहीं. तापसकुमाराच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या

इतक्यांत कोटावरून गोकुळदासाची भेरी वाजली अजयसिंह तरवार उपसून दुर्गाकडे धावून गेला तापसकुमारहि त्याच्या मागोमाग गेला

## प्रकरण पचविसावे.
## रजपूतांची रंगभूमि.

किल्ल्याच्या जवळ येऊन अजयानें पाहिले, तो, दरवाज्याजवळ कित्येक लोकाचे मृत देह पडले होते. मुसलमानाच्या सैन्याने दुर्गाच्या आत प्रवेश केला, असे त्याला वाटले गिरिराणीचें रक्षण करण्याची अमूल्य सधि त्याला मिळणार नाहीं काय ? किल्ल्यात शिरून तो गिरिराणीचा शोध करू लागला आत जाऊन पहातो, तो किल्ल्यात शत्रूकडचे लोक नाहींत किंवा लढाईहि नाहीं, केवळ गिरिराणीच्या सखींच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. गिरिराणीचा त्यानें पुष्कळ शोध केला, पण काहींच पत्ता लागेना तत्क्षणी तो किल्ल्यातून बाहेर पडला किल्ल्यापासून थोड्याच अतरावर सुमारें पन्नास पायदळ शिपाई शभर घोडेस्वाराबरोबर लढत असलेले त्याला दिसले सर्वाच्यापुढें वृद्ध गोकुलदास होता. एका स्वाराच्या घोड्यावर गिरिराणी मूर्च्छित पडली होती क्षणार्धात गोकुल-दासाच्या उजव्या बाजूस अजयसिंहाची तरवार चमकू लागली व लगेच त्या तरवारीने दहाबारा घोडेस्वारास छाटून काढिले या नवीन योद्ध्याच्या अगीं अलौकिक युद्धकौशल्य असून त्याच्या भुजात असाधारण बल होते, हे मुसलमान सैनिकाच्या चागले प्रत्ययास आले त्याच्या मुखमडलावर असीम उत्साह व असीम स्फूर्ति चमकत होती त्याच्याशीं लढून जय मिळविणे अगदींच अशक्य आहे, हे पहाताच गिरिराणीस घोड्यावर ठेविलेल्या घोडेस्वाराने मोठ्याने ओरडून ह्मटले "तुह्मी या काफरास अडवा, मी दहाबारा स्वारासमवेत गिरिराणीस घेऊन जातो."

स्वाराने एका हाताने मूर्च्छित गिरिराणीस सावरून धरिले, व दुसऱ्या हातात लगाम धरून घोडा सोडला. त्याच्याबरोबर आणखीहि दहा बारा घोडेस्वार निघाले गिरिराणीस घेऊन जाणाऱ्या स्वाराचा पाठलाग करणे अजयसिंहास अत्यावश्यक होते. गिरिराणीस जर सोडविलें नाहीं, तर मग उगीच रक्तपात करण्यात काय अर्थ ? त्याने गोकुलदासावर लढाईचा भार टाकून पाठलाग करण्याचा निश्चय केला; पण गोकुलदास

कोठे होता? त्या ह्मातान्याने एकनिष्ठेने स्वामिकार्य बजावित असतां केव्हाच इहलोकाचा त्याग केला होता. अजयाने बाजूस पहातांच त्याच्या लक्ष्यात ही गोष्ट आली. त्यानें खिन्न मनाने चाऱ्ही बाजूस पाहिलें. आतां युद्धाचा भार कोणावर टाकावा? इतक्यात बाजूस कोणीं ह्मटले "अजयसिंह, तुह्मी या स्वाराचा पाठलाग करा, मी येथे हे युद्ध संभाळतो!"

गोकुळदास पडताच तापसकुमाराने एका मेलेल्या सैनिकाची तरवार उचलली व त्याच्या घोड्यावर आरोहण करून अजयसिंहाच्या बाजूस तो लढू लागला. तो शब्द ऐकताच आश्चर्यचकित होऊन अजयसिंहानें पाहिले, तो, जटाजूटधारी तापसकुमार तेथे लढत होता. तापसाचे मुखमडल जटानी झाकिले होतें. केवळ दोन डोळेच दिसत होते. हे डोळे अजयसिहाच्या परिचयातले होते काय? हे उज्वल नेत्र आणखी कोणाचे असू शकतील काय? हे प्रेममय, अमृतमय कटाक्ष व ही स्वर्गीय ज्योति आणखी कोणाच्या नयनात असू शकेल काय? तापसकुमार पुन ह्मणाला "अजयसिंह. लवकर जाऊन गिरिराणीला सोडवा!"

पुनः तोच सुधामय, तोच मनमोहन, तोच हृदयोन्मादकर कठरव! अजयसिंहाने प्रचड आघाताने समोरील म्लेच्छसैनिकास परलोकीं धाडले व त्याच्या अश्वावर आरोहण करून त्या पळपुट्या मुसलमानाचा पाठलाग करण्यासाठीं प्रस्थान केले घोडा अजयसिंह नेईल तिकडे भरधाव जाऊ लागला क्षणार्धात शैलखडावरून, क्षुद्रनदी ओलाडून अजयसिंहाचा घोडा पवनगतीने धावत सुटला. काहीं दूर गेल्यावर गिरिराणीस घेऊन जाणारे लोक त्याच्या दृष्टीस पडले. गिरिराणी अझूनहि मूर्च्छितच पडली होती. थोड्याच वेळात अजयसिंहानें त्याना अडविलें. अजयसिंहावर एकदम दहा तरवारींचा हल्ला झाला. पण अजयसिंहानें त्या चुकवून एकाचा हात व एकाचे डोके उडविलें इतक्यात मागून आणखी एका टोळीनें अजयसिंहावर हल्ला केला तरवारीच्या आघातानें अजयसिंहाच्या घोड्यानें प्राण सोडिले तरीपण अजयसिंहाची तरवार चमकतच होती. प्रेतावर प्रेतें पडू लागलीं, छिन्न शिरावर छिन्न शिरें

आदळू लागलीं, रक्ताचा पाट वाहू लागला या युद्धात तरवारींस विराम नव्हता किंवा योद्ध्याचे हात थकले नाहींत अजयसिंहाची लाब तरवार विजेप्रमाणे चमकतच होती प्रचड आघातानी ती शत्रूचे देह व हृदय विदीर्ण करू लागली जय, रजपूताचा जय!

आज मेवाडराजकुमाराची शोणितपिपासिनी तरवार शत्रुरुधिराचे मनसोक्त पान करित होती. चाऱ्ही बाजूस मागेपुढे यवनसेना, अगावर यवनाचे रक्त, पायाखालीं यवनाचीं प्रेते, यवनाचीं शिरे! प्रबळ यवन-सेनेबरोबर एकटा अजयसिंह अतुल स्फूर्तीने व असीम उत्साहाने लढत होता पण असा तो किती वेळ लढणार? आज मृत्यु तर येणार, तेव्हा बनेल तोपर्यंत शौर्य गाजवावे असा त्याने निश्चय केला थोड्याच वेळात त्याचे हात थकले, शत्रुरुधिराने माखलेला देह दुर्बल झाला, अजयसिंहाला घेरी येऊ लागली शत्रुसैन्यातील एक जण ओरडून ह्मणाला! "पुरे करा आता लढाई बद करून याला कैद करा"

लगेच आणखी एक जणाने जरा लाबून म्हटले "भारतेश्वरास पुत्रा-पेक्षाहि प्रिय अशा अजयसिंहाला कैद करण्याइतका कोण धीट आहे?"

या गभीर वाणीबरोबरच 'जय अजयसिंहाचा!' ह्या मधुर कठातून निघालेल्या मधुरतर शब्दानी अजयसिंहाच्या देहात नूतन प्राण घातले सम्राट् अकबरशहा व त्याच्याजवळच उभा असलेला तापसकुमार अजयसिंहाच्या दृष्टीस पडले तापसकुमाराचा देह रक्ताने न्हाणिलेला होता व त्याची तरवार शत्रूच्या रक्ताने लाल झाली होती अकबरशहा ह्मणाला "बेटा अजय! मी वीरसखा अकबर तुझ्या बाजूस उभा आहे. तुला शोधित शोधित मी चागल्याच प्रसगीं येथे आलो ह्मणावयाचा!"

तापसी ह्मणाला "आणखी मी निष्काम ब्रह्मचारी—अजयसिंह! तुमच्या अभीष्टसाधनाकरिता परमेश्वराची प्रार्थना करतो!"

पुनः तोच मोहमय कठस्वर! अजयसिंहाने तापसकुमाराकडे पाहिलें. जटाकलापात तेच ज्योतिर्मय, अमृतपूर्ण, विशाल, रक्तिमवर्ण नेत्र चमकत

होते! अजयसिंहास पुनः मूर्च्छा येऊन तो तापसकुमाराच्या पायापाशीं पडला.

---

## प्रकरण सव्विसावे.

## हिरण्मयीचा नूतन वेष.

सम्राट् अकबरशहाने समरभूमीवर चोहींकडे पाहिले व तीव्र दृष्टीने पश्चात्वर्ती एका सैनिकाकडे पाहून ह्मटले "मूर्खा सेलीमा! तुला या गुप्त वेषात मी ओळखणार नाहीं असे तुला वाटते काय?"

युवराज सेलीम काहींच न बोलता भुईकडे पहात राहिला. अकबरशहा पुन्हा बोलू लागला "आजची ही लढाई ह्मणजे भरतखडाच्या भावी सम्राटाच्या गौरवाचा विषय असेल, नाही रे? एकदा या रणभूमीकडे नजर फेक. एकट्या हिदु वीराच्या तरवारीनें शभर सैनिकास धूळ चारली आहे, आणि मी आलो नसतो तर तुझेहि पण शिर तुझ्या या मित्राच्या शिराबरोबर येथेच पडले असते! आजपासून या तरुणाची वीरादर्श समजून पूजा करित जा. मी तुला विचारतो, कीं, आज तू आपल्या दोस्तासहवर्तमान या बालराज्ञीच्या अत:पुरात का शिरलास?"

सेलीम ह्मणाला "मी गिरिराणीला पळविण्यास येथे मुळींच आलों नव्हतो. या दुर्वृत्त रजपूत तरुणालाच दड करण्यासाठीं आलो होतों. ज्या दिवशीं हा काफर एखाद्या चोराप्रमाणे दिल्लीश्वराच्या अत पुरात शिरला, व नारीहृदय दिल्लीश्वराने त्याला शिक्षा केली नाहीं, तेव्हाच याला शिक्षा करण्याचा मीं निश्चय केला व नतर ह्या चोराने बैराग्याचे सोग घेऊन अत पुरातून हिरण्मयीला पळविलें."

तापसकुमार आतापर्यंत सज्ञाहीन अजयसिहाची शुश्रूषा करित बसला होता. तो एकदम चवताळून म्हणाला "खोटी गोष्ट! वीर अजयसिंहाच्या नावाला कलक लावू पहाणारा खोटे बोलतो! यवनस्पर्शाने दूषित झालेल्या हिरण्मयीचा विसर पडावा, ह्मणून अजयसिंह या जगलात भटकत आहे."

सेलीम तापसाकडे पहात पहात पुढें सरला. याचवेळेस अकबरशहाने पुढें होऊन ह्मटले "तू खोटें बोलतोस हे मला माहीत आहे. गिरिराणी कुठे आहे? लवकर साग!"

सेलीम ह्मणाला "ज्या व्यक्तीने गिरिराणीस नेण्याकरिता गिरिदुर्गावर हल्ला केला, तीच तिला घेऊन गेली"

तापसकुमार म्लान मुखाने ह्मणाला "भारतेश्वर! जिच्या सरक्षणाकरिता इतका रक्तपात झाला, व जिच्या रक्षणाकरताच अजयसिहाची अशी दशा झाली, तिला सोडवा"

गिरिदुर्गात राहिलेले सैन्यहि याच वेळेस तेथे येऊन पोहोचले अकबरशहा ह्मणाला "तुह्मी अजयसिहाची शुश्रूषा करा, मी गिरिराणीच्या शोधास जातो सेलीम, तूहि मजबरोबर चल"

नतर अकबर व सेलीम काही लोक बरोबर घेऊन निघून गेले. तापसकुमाराने एका सैनिकास डोली आणावयास सागितले त्याने अजयसिहाचे मस्तक आपल्या माडीवर घेतले. यावेळीं त्याच्या नेत्रातून अश्रूचा प्रवाह सारखा सुरू झाला व अजयसिहाच्या घायाळ देहावर ते उष्णाश्रु पडू लागले ह्याच अमृतधारानीच की काय, अजयसिहाच्या मृतवत् देहात चैतन्य शिरू लागले अजयसिहास डोलीत घालून किल्ल्यावर नेले.

पहाटेस तापसकुमाराने नदींत स्नान करून रक्ताने माखलेले आपले शरीर धुऊन काढले कृत्रिम जटा, भगवी वस्त्रे नदींत फेकून दिलीं नितब भागावर लोंबणाऱ्या केशाचा बुचडा बाधून केश झाकले जातील अशा रीतीने मस्तकावर फेटा बाधिला गळ्यापासून पायापर्यंत सर्व देह अगरखा व पायजमा यानी झाकून टाकिला. याप्रमाणे वेष पालटून झाल्यावर नदीच्या जलात त्याने आपले प्रतिबिब पाहिले नदीच्या काठची माती उकरून त्याने आपल्या डोळ्यास फासली व अधरोष्ठास राख लावली. हाय! कल्पित वेषधारी तापसकुमारा! या अमृतपूर्ण अधरोष्ठाचे—या भुवनविजयी नयनयुगुलाचे सौंदर्य मृत्तिकालेपनानें

आणि भस्मरंजनाने तिळमात्र तरी कमी होईल काय? हिरण्मयीने पाण्यात पुन्हा आपले प्रतिबिंब पाहिले व ती आपल्याशीच बोलू लागली "आतापर्यंत एक गोष्ट झाली, की, अंधारात मी कोण आहे हे अजयाला समजले नाहीं, पण त्यानं माझा आवाज ओळखला नसेल काय? ईश्वरा! इतकच कर, की, अजयाचा गिरिराणीशी विवाह होऊं दे, व अभागिनी हिरण्मयीची अंधःकारमय स्मृति त्याच्या हृदयातून गिरिराणीच्या प्रेमामुळ नष्ट होऊ दे"

"पण हे काय! आज अजयाच नाव उच्चारताच माझ हृदय इतक व्याकूळ का बर होत? अम्बरकुमारीच्या सहाय्यान ज्या दिवशी आग्र्याहून मी निघाल्ये, तेव्हापासून प्राणसखा अजयसिंहाला पहाटात, अरण्यात पाहून डोळे तृप्त करून घेत आहे, पण त्यावेळेपासून आजच्यासारखी धडकी कधीच भरली नव्हती! भगवन् भवानीपते! अभागिनी हिरण्मयीला तुझ्याजवळ एकच भिक्षा मागावयाची आहे, व ती एवढीच की, हिरण्मयीच्या प्राणाच्या—अजयसिंहाच्या-हृदयातून तिला काढून टाकून तिच्याजागी गिरिराणीची स्थापना करताना माझ मन कचरू देऊ नकोस! ह्मणजे मग माझ्या अजयाच—माझ्या बाळपणींच्या सख्याच—किशोरावस्थेतल्या मित्राच—यौवनातल्या एकमात्र सहचराच—माझ्या प्राणाच्या वल्लभाच-हृदयातल्या देवतेच-अंधःकारपूर्ण जीवनातील पूर्णचंद्राच—माझ्या भक्तीच्या आराध्यदेवतेच रूपगुणशीला, कलंकशून्या गिरिराणीबरोबर लग्न करून देताना मी धीट व आनंदपूर्ण राहीन!"

हिरण्मयी पुष्कळ वेळपर्यंत डोळे मिटून व हात जोडून आकाशाकडे पहात राहिली नंतर आपले कोमल हस्त हृदयाशीं धरून ती स्तब्ध बसली. अनंतवाहिनी तरंगिणीच्या प्रवाहाशीं तिच्या अश्रुधारा मिळून गेल्या.

## प्रकरण सत्ताविसावे.
## रजपूतसैनिक.

मध्यरात्र टळून गेली आहे. गिरिदुर्गातल्या एका बाजूच्या खोलींत अजयसिंह निजला होता. त्याच्या पायाजवळ एकजण रजपूतसैनिक स्तब्ध बसला होता. युद्धप्रसंगास तीन दिवस लोटले होते. आज अजयसिंहाला गाढझोप लागून किंचित आराम पडला होता. हे तीन दिवस हा रजपूतसैनिक रोज जाग्रणे करून त्याच्याजवळ बसलेला असे. दिवसा दुर्गातील लोक आळीपाळीने अजयाच्याजवळ बसत; पण सर्वांच्या समतीने रजपूत शिपायाने रात्रभर जागण्याचे काम आपल्याकडे घेतले होते. संध्याकाळपासून सकाळपर्यंत तो अनन्यकामनेने, अनन्यभावाने अजयसिंहाच्या तोंडाकडे एकाग्रतेने पहात त्याच्याजवळ बसलेला असे. त्याला झोप किंवा आळस माहीत नव्हती हा रजपूत सैनिक कोण, हे वाचकाला सांगावयाला नकोच!

रजनी संपत आली होती. अजयसिंहाची झोप उघडली सर्व विश्व अझून निद्रित व स्तब्ध होते खोलींत दिवा मिणमिण जळत होता. अजयसिंहाने दिव्याकडे पहात पहात डोळे उघडले, व मान सावरून सैनिकास विचारिले "आपण कोण?"

"मी तोच रजपूत सैनिक!"

अजयसिंहाची सावरून धरलेली मान पुनः गळून पडली रजपूत सैनिकाने त्याचे मस्तक मांडीवर घेतले. अजयसिंहाने पुन. विचारले "त्या दिवशींच्या तापसकुमाराचा कांहीं शोध लागला का?"

"नाहीं त्या दिवसापासून तो कुठे गेला, कांहींच समजले नाही."

अजयसिंह ह्मणाला "मला आताच स्वप्न पडले, की, यवनसंग्रामात मी गतप्राण होऊन पडलो माझा प्राणशून्य देह जमिनीवर पडला आहे तोंच त्या तापसकुमाराने माझे मस्तक आपल्या मांडीवर ठेवून माझे चुंबन घेतले. त्याच्या अधरस्पर्शाने माझ्या थंडगार कलेवरात

पुनः रक्तप्रवाह सुरू झाला. पहाता पहाता त्या कुमाराच्या नेत्रातून एकदोन अश्रुबिंदु माझ्या गालावर पडले. त्या अमृतबिंदूच्या पतनाने माझ्या देहात पुन प्राण शिरले. त्या तापसाने हृदयोन्मादकस्वराने मला 'अजय' अशी हाक मारली. त्या कर्ण मधुर स्वरानें माझ्या जड देहात चैतन्य शिरून माझे हृदय आनदाने नाचू लागले. माझ्या देहात नूतन स्फूर्तींचा सचार होऊन मी उभा राहिलो व त्याच्या मुखाकडे पहात तटस्थ राहिलो. इतक्यांत त्या तापसकुमाराचा जटा-जूट गळून पडला व चचल केशकलाप त्याच्या पृष्ठभागीं लोंबू लागला. क्षणार्धात तापसकुमार माझ्या शैशवसखीचे—प्राणसहचरीचे रूप धारण करून माझ्यासमोर उभा राहिला. मीं उन्मत्त हृदयाने, विव्हल प्राणाने माझ्या सखीला हृदयाशीं धरण्याकरिता ह्मणून हात पुढे केला. हिरण्मयीने मजकडे पुनः क्रुद्धकटाक्ष फेकिले व अगस्पर्श करू नको म्हणून सागितले, पण लगेच दयार्द्र स्वराने ती ह्मणाली 'हाय! अजय! अझूनहि तू या अपवित्र कलकिनीला विसरू शकत नाहींसना? ऐक, माझी विनति ऐक. मला विसर हृदयाला जिक व गिरिराणीवर प्रेम कर!' बोलताबोलता मला एकट्यालाच घोर अरण्यात टाकून देऊन माझी सखी दिसेनासी झाली!"

अजयसिंहाचे अशक्त शरीर थरथर कापू लागले. रजपूतसैनिक पुन. त्याच्या पायापाशीं जाऊन बसला. अजयसिहाच्या पायावर एक उष्ण जलबिंदु पडला. अजय ह्मणाला "हे काय? तुह्मी तर रडता?"

रजपूत सैनिकाने ह्मटले "महाराज! आपणाजवळ एक भिक्षा मागायची आहे!"

"बोला, माझ्या हातून होण्याजोगे असेल तर मी ते खुषीनें करीन."

"महाराज, मी गिरिराणीचा सैनिक आहे. तिचे सुख तेच माझे सुख. आज ती अभागिनी अगदीं असहाय आहे. तिचा विश्वासू प्रधान गोकुळदास व दुसरे लोक तिला सोडून गेले. आज तिची दशा पाहून

पाषाणालासुद्धा द्रव येईल. आपण अभागिनी गिरिराणीवर नाही का दया करणार?"

"माझ्या हातून होईल तितके सहाय्य करण्यास मी तयार आहे!"

"मग आपण लवकरच आमच्या राणीचे पाणिग्रहण करून आह्मा सर्वांचे मनोरथ पूर्ण करालना?"

"सैनिक! ह्या गोष्टीस मी कबूल होण्याचा किती थोडा संभव आहे हे आपणास माहीत नाहीं! हृदय फाडून दाखविता आले असते, तर त्यात गिरिराणीकरिता जागा नाही हे आपणास दिसून आले असते बालपणापासून, समजू लागल्या घटकेपासून या हृदयात एक देवीप्रतिमा स्थापित झाली आहे त्याच मनमोहिनीच्या अविच्छिन्न स्नेहाला, अविरल प्रेमकटाक्षाला, असीम सुखाला, बाळपण संपल्यावर तारुण्यात हे हृदय अर्पण केले आहे एकाएकी वसंतऋतूत आकाशात मेघ यावे, त्याप्रमाणे निष्ठुर विधात्याची 'अजयसिंहा दुर्भाग्या! तू तुझ्या हृदयातल्या हिरण्मयीच्या प्रतिमेचे विसर्जन कर!' अशी आज्ञा झाली ती आज्ञा पाळण्याकरिता मीहि पण तशीच प्रतिज्ञा केली आहे आज हे हृदय अमानुषिक संग्रामात जर्जर झाले आहे तरीपण या चूर्ण हृदयात तीच आनंदमयी प्रतिमा पूर्ण गौरवाने विराजमान आहे ह्मणून ह्मणतो, या हृदयात गिरिराणीकरिता स्थान नाही!"

अजयसिंहाच्या पायावर आता तर उष्णजलाची धारच पडू लागली!

याच वेळेस एकदम दुर्गाच्या बाहेर पुष्कळशा घोड्याच्या टापाचा आवाज झाला अजयसिंहाला बाहेर कोणीं बोललेले ऐकू आले बाहेरील गृहस्थ ह्मणाला "गिरिदुर्गातील शूरानो! ही पहा तुमची राणी परत आली आहे!"

दुर्गातील लोकानी आगन्तुकाला धन्यवाद दिले, पण तो ह्मणाला "ज्या वीरपुरुषामुळे तुह्माला तुमची राणी प्राप्त झाली, त्या अजयसिंहाला धन्यवाद द्या! आता कसे आहेत अजयसिंह?"

"त्याना आज पुष्कळ बरें वाटत आहे ते येथे आतच आहेत." पृच्छकाला उत्तर मिळाले.

पहिला गृहस्थ पुन. ह्मणाला "ऐका तर, गिरिदुर्गातील सैनिकांनो! ऐका. राणीच्या सख्यानो! ऐका तुमची गिरिराणी राजघराण्यातील आहे हे तुम्हाला माहीत आहेच, पण अजयसिहाची तुम्हाला माहिती नाही. तेहि पण विख्यात मेवाडवशातले राजकुमार आहेत आता मी कोण आहे हे ऐका मी दिल्लीश्वर सार्वभौम अकबरशहा आहे. माझ्या मनात या दुर्गावर मोठा उत्सव करावा असे आहे तेव्हा तुमच्या या राज्ञीचें व अजयसिहाचे आपण लग्न करून देऊ या याला अझून पाचसहा महिने हवेत, तरी पण आपल्या उत्सवास आतापासूनच सुरुवात होऊ द्या अकबराचा खजिना या उत्सवाकरिता खुला केला आहे!"

सर्वांमुखीं अजयसिहाचा, राणीचा व अकबराचा जयध्वनि झाला. हा आकाशभेदी जयध्वनि अजयसिहाच्या खोलीतहि ऐकू गेला. त्याचे मस्तक अथरुणावरून जमिनीवर गळून पडले. रजपूतसैनिकाच्या अगावर शहारे उभे राहिले त्याने आपले हृदय दोन्ही हातानीं गच्च दाबून धरले

---

## प्रकरण अठ्ठाविसावे
## प्रतिमाविसर्जन.

सकाळी अजयसिह डोळे उघडून पहातो, तो तेथे रजपूत सैनिक नसून गिरिराणी व तिची सखी चपला या उभ्या आहेत अजयसिंहाने गिरि-राणीच्या सुदर व सरलतामय मुखाकडे निरखून पाहिले. आज तिच्या मुखमडलावर नूतनच स्फूर्ति व उत्साह विराजमान झालीं होतीं. गिरि-राणीने अजयाचा हात धरून त्याच्याजवळ बसून प्रेमळ वाणीने ह्मटले "अजयसिह! तुम्ही माझ्या रक्षणाकरिता आपल्या हृदयातील रक्त भूमातेस अर्पण करून या रुग्णावस्थेत शय्येवर पडला आहा, आपल्या या उपकाराची फेड कशी करावी हे मला समजत नाही!"

अजयसिंह ह्मणाला "आपणास सोडविण्याकरिता मीं जे यत्न केले, ते केवळ क्षात्रधर्मास अनुसरून माझें कर्तव्य ह्मणून केले. यात माझे उपकार ते काय झाले ?"

गिरिराणीचे नेत्र भरून आले. ती म्हणाली "अजयसिंह! माझ्यावर काय सकट आल होत, हे आपल्याला माहीत नाहीं!"

बोलताबोलता गिरिराणी रुदन करू लागली.

गिरिराणीचे सात्वन करित चपला ह्मणाली "बाईसाहेब ! आज आनदोत्सवाच्या दिवशीं अस हे अभद्र रुदन का बर करिता ? ज्या गोष्टीला दिल्लीश्वरानी काल अनुमति दिली, ती गोष्ट याच्याजवळ काढू या हे पहा अकबरशहाच इकडे येत आहेत !"

गिरिराणी ह्मणाली "सखे ! चल, आपण इथून जाऊ. आता बादशहा स्वतःच ती गोष्ट काढतील !"

गिरिराणी चपलेबरोबर बाहेर पडली. बाहेर पडता पडता चपला ह्मणाली "आपण इथच उभ्या राहून त्याचीं बोलणीं ऐकू गडे !"

गिरिराणी ह्मणाली "नको, माझ्या मनात मोठी शका येते."

"कसली शका बाईसाहेब ?" चपला गालातल्या गालात हसून ह्मणाली.

गिरिराणीचे मुख निस्तेज झाले. करुणापूर्ण नेत्रानीं चपलेकडे पाहून तिने ह्मटले "अजयसिहानीं बादशहाच ह्मणण कबूल नाहीं केल तर ?"

"छे, भलतच ! शिंप म्हणून मोती फेकण्याइतके अजयसिह भोळे नाहींत !"

गिरिराणीने यावर काहीएक उत्तर न देता चपलेचा हात धरला व नतर दोघीहि महालाकडे निघून गेल्या.

अजयसिंह अकबरास पहाताच उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला, पण अकबराने त्याला उठू न देता तसेच पड़न राहण्यास सागितले. नतर लडिवाळपणाने तो अजयाच्याजवळ बसून त्याच्या मस्तकावरून, गालावरून हात फिरवित फिरवित प्रेमळ वाणीने ह्मणाला "बेटा

अजय! वीरसखा अकबर आज तुझ्या शौर्याबद्दल पुरस्कार देण्यास उत्सुक झाला आहे."

"क्षत्रिय योद्धा न्यायाकरिता वीरत्वाने लढतो. त्या शौर्याबद्दल पुरस्काराची त्याच्या मनात हाव नसते!"

"वीरपुरुषाने पुरस्काराबद्दल हाव न धरणे, हा त्याचा धर्मच आहे. तथापि त्याला तो देणे हा राजधर्म होय!"

अकबर आणखी पुढें ह्मणाला "आणि मीं तुला एकदा सांगितलेच आहे, की, वीरपुरुषाला सर्वांत उत्तम बक्षीस ह्मणजे सुंदरीचे प्रेम!"

अजयसिंहाचे मुखमंडल पांडुवर्ण झाले. अकबरशहा पुढें ह्मणाला "ऐक अजय! सरला सुंदरी गिरिराणी तुला उत्तम बक्षीस असे मला वाटते मीं सर्वांना त्याप्रमाणे काल रात्रीं सांगितलेहि आहे. आता लवकरच गिरिराणीची प्रेमपूर्ण मूर्ति अजयसिंहाच्या हृत्पटलावर स्थापन करण्याचा माझा विचार आहे!"

दिल्लीश्वर! आपण आपल्याला मोठे सुज्ञ म्हणविता, इतिहासकारहि अकबरशहास राजगुरू ह्मणतात, पण ही साधी गोष्ट आपल्याला समजू नये काय? हृदयात एक मूर्ति स्थानापन्न असता दुसऱ्या मूर्तीची स्थापना कोठे करणार?

अजयसिंह आवेशाने ह्मणाला "दिल्लीश्वर! संसारत्यागी अजयसिंहाने या दंडायोग्य काय पाप केले आहे?"

अकबरशहाच्या मुखमंडलावर विरक्तचिन्ह दिसू लागले तो ह्मणाला "राणा प्रतापसिंहाच्या पुत्राच्या मनात कोणाला दुखवावयाचे नाहीं, हे मला माहीत आहे हाय! समजले अजय! हिरण्मयीने अझून तुझ्या हृदयास सोडिले नाहींना? तू क्षत्रियवीर असून अझून आपल्या मनावर जय मिळविला नाहींस, ही फार शरमेची गोष्ट आहे! सरला गिरिराणी तुझ्या प्रणयांत गुरफटलेली आहे, व तुझ्या सहवास-लालसेने वेडी झाली आहे, हे तुला दिसत नाहीं काय? तू जर तिचा त्याग केलास तर तिची काय दशा होईल? आता दोन वर्षे संपत

आलीं, तर तू आपल्या वडिलास काय सागणार? तुझी प्रतिज्ञा पूर्ण व्हावी ह्मणूनच ईश्वराने ही सधि धाडली आहे बेटा! आपल्या वडिलाची आज्ञा पालन कर तुझ्या मित्राची–अकबराची विनति मान्य कर, गिरिराणीचे रक्षण कर आणि क्षत्रियधर्म सोडू नकोस!"

अजयसिह अकबरशहाच्या तोडाकडे पहात स्तब्ध राहिला हा हा ह्मणता त्याचे डोळे भरून आले पण एकाएकीं उभा राहून विकृत स्वराने तो ह्मणाला "विधात्या! आज मला वेड लावण्यास तुझे सर्वच जग यत्न करित आहे! पित्याची आज्ञा,भारतसम्राटाचा अनुरोध,तापस-कुमारचा उपदेश, रजपूतसैनिकाचे अश्रुबिदु ही सर्व मला वेड लावू पहात आहेत! हिरण्मयीस या हृदयातून काढून लाविले पाहिजेचना? दिल्लीश्वर! मी आपल्या ह्मणण्यास कबूल आहे अमृतमुखी सुरसुदरी हिरण्मयी! आज तुझ्या पवित्र प्रतिमेस अजयसिह आपल्या पापमय कलुषित अत करणातून काढून टाकून तिचे विसर्जन करित आहे!"

हे भाषण ऐकत असलेल्या चपलेचा आनद गगनात मावेना! ती सख्यास बोलावून मोठमोठ्याने सर्व सागू लागली जवळच उभ्या असलेल्या रजपूतसैनिकाने एक दीर्घ नि श्वास सोडला, पण तो चपलेच्या गोगाटात विलीन होऊन गेला.

---

## प्रकरण एकोणतिसावे.

## सम्राट् आणि बेगम.

सम्राट् अकबरशहा नदीतीरावर एकटाच बसून हातात असलेल्या चित्रपटाचे निरीक्षण करित होता बऱ्याच वेळाने चित्रपट खालीं ठेवून तो आपल्याशीच ह्मणाला "आश्चर्य! इतके सादृश्य? मला भ्रम तर नाही ना झाला? मी आश्चर्याने अगदीं भाबावून गेलो आहे."

इतक्यात एका संत्र्याने येऊन सागितले "जहापनाह! एक पडदानशीन स्त्री प्रभुदर्शनाची इच्छा करित आहे."

सम्राट् चकित होऊन उभा राहून ह्मणाला "तिला इकडे येऊ दे"

सम्राटाचे बोलणे पुरे झाले नाही तोच उन्मादिनी अकबरासमोर येऊन उभी राहिली वेडी किंचित्काळ स्तब्ध राहून ह्मणाली "भारतेश्वर! आपण मूर्तिमत औदार्य आहा, तरी पण आपण एखाद्या नीचाशय पुरुषाप्रमाणे एका विव्हलप्राणा स्त्रीच्या रोदनाकडे दुर्लक्ष्य करता! माझे अभागिनीचे मागणे पूर्ण करणे तर दूरच राहिले, पण आपण उलट वर्तन आरंभिले आहे! आपला मी असा काय अपराध केला, की आपण माझ्याशी असे वैर धरिले आहे!"

बादशहा ह्मणाला "बेगमसाहेब! असा शोक करू नका आपला अभिलाष लवकरच पूर्ण होईल या तसबिरीतल्यासारखी सुंदरी आपणास लवकरच भेटेल!"

अकबराने चित्रपट वेडीच्या हातात दिला, पण वेडीने तो दूर भिरकावून आवेशाने ह्मटले "याच्यात काय माती पहायची आहे? तिची मूर्ति माझ्या या पाषाणहृदयावर उज्वल वर्णात खोदलेली आहे एकदा माझ्या लाडकीला हृदयाशी धरून प्रेमभराने तिचे चुंबन घेण्यासाठी मी तहानेल्ये होत्ये राणी चांदसुलतानाने मला साहाय्यहि केले, पण आपणच एखाद्या चोरासारखे तिला पळवून नेले आणि ह्मणूनच ही वेडी आपणासमोर उभी आहे आता पहात्ये आपण माझ्याशी कसे वैर धरता ते?"

अकबर ह्मणाला "बेगमसाहेब! तुह्मी माझ्यावर उगीच रागावता. या चित्रपटाचे व गिरिराणीचे सादृश्य पाहून पुढे काय करावे, याचाच मी विचार करित होतो, तोच आपण आलात गिरिराणी ही रजपूतकन्या आहे असे मी ऐकतो, आणि ह्मणूनच माझी खात्री होत—!"

वेडी शांतपणे ह्मणाली "दिल्लीश्वर! इथे संशयाचे कारणच नाही. गिरिराणी रजपूत राजाची कन्या आहे हे खरे, पण ती मुमताजची गर्भजात कन्या आहे. हाय! मी माझ्या लाडकीकरिता देशोदेश हिंडल्ये. पळपळ मला युगाप्रमाणे भासत असे. माझ्या प्राणाचा शोध

लागल्याखेरीज मला चैन पडेना, पण मला तिचा काहींच शोध लागेना! अखेर मीं आपल्या बहिणीचे पाय धरले व तिच्या सहाय्यान आज माझे हेतु पूर्ण झाले आहेत. दिल्लीश्वर! आता मला तिला भेटायला परवानगी द्या. तिच चुबन घेऊन मी आपल्या हृदयातला अग्नि शात करीन."

अकबर ह्मणाला "बेगमसाहेब! अशा अधीर होऊ नका. मला आपल्याशीं काहीं बोलायचे आहे."

"बोला, काय बोलायच आहे ते लवकर बोला!"

"मी जें काहीं बोलतो ते स्वस्थ मनाने ऐकून घ्या. आपला वृत्तात ऐकून मला फार वाईट वाटत आहे. आपल्या कन्येचे अजयसिहावर प्रेम जडले आहे व लवकरच त्याचा विवाहहि होणार आहे. गिरिराणी ही हिन्दू आहे, मुसलमान नव्हे, असे मला व सर्वाना माहीत होतें. प्रतापसिंहाच्या धर्माभिमानी पुत्रास जर ती यावनी आहे ह्मणून समजले तर तो लग्नास तयार होणार नाहीं, व तुमच्या कन्येच्या भावीसुखावर पाणी पडेल. ह्मणून आपण लग्नापूर्वी तिची भेट घेऊ नये, असे मी ह्मणतो."

उन्मादिनी बेगमेनें दोन्हीं हातानी आपले केश ओढून ह्मटले. "मग मी अहमदनगरास परत जाव, अस आपल ह्मणण ?"

"माझी हीच विनति आहे, व मला तेच शहाणपणाचे दिसते."

"भारतेश्वर! आपण सर्व देशावर राज्य करता, पण माझ्या मनात काय चालल आहे हे आपणास कळत नाहीं! आता काहींहि होवो, मी आज जाऊन माझ्या लाडकीस भेटणारच! पहाल्ये मला कोण अडवित ते!"

पुन्हा बुरखा घेऊन उन्मादिनी निघून गेली. अकबर तटस्थ चित्रासारखा टक लावून पहातच राहिला.

---

## प्रकरण तिसावे.

## चपला व रजपूतसैनिक.

आज गिरिदुर्गात मोठाच थाट उडालेला. वसन्तपौर्णिमा आजच आहे. सध्याकाळीं अजयसिंहाशीं गिरिराणीचे लग्न व्हावयाचे आहे. सर्वांच्या मुखावर स्फूर्ति व आनद खेळत आहेत. लग्नोत्सवास जवळजवळच्या प्रातातून क्षत्रिय राजे आले आहेत. गिरिदुर्गाच्या दरवाज्यावर तोरणे बाधलीं आहेत व भितीवर नाना तऱ्हेच्या फुलाच्या माला लोबत आहेत. गायकाचे गायन व वाद्याचा निनाद सर्व वातावरण भरून टाकित आहे. कलकलवाहिनी तटिनीच्या मुखावरहि स्मितहास्य विलसत आहे.

दोनप्रहरची वेळ. वसताच्या आगमनामुळे दुर्गसमीपस्थ उद्यानात सर्वत्र सुगध दरवळला होता. अशोक तरूवर कोकिला पचम सुरात गात होती, व त्याऱ्या बाजूस कदबाच्या डहाळ्यात आपला लहानसा देह लपवून पापिया सप्तम सुरात त्याला उत्तर देत होती नर्मदानदीच्या शीतल जलात अग धुऊन व नुकत्याच विकास पावलेल्या पुष्पाच्या सौरभाने आपला देह सुगधित करून मद मारुत उद्यानात क्रीडा करित होता. याच मदमारुतसेवित व विहगकूजित उद्यानात पुष्पालकृता गिरिराणी बसली होती. चपला तिच्या पायापाशीं बसून राणीऱ्या पायास मेदी लावित होती. बाकीच्या सख्यापैकीं कोणी वीणा वाजवित बसल्या होत्या, कोणी फुले तोडित होत्या, कोणी हार गुफित होत्या व काहींजणी एकत्र बसून आज अमकीची अशी थट्टा करायची तर तमकीला असे बोलायचे, अशा प्रकारच्या गोष्टी सागत होत्या. इतक्यात एक रजपूतसैनिक गिरिराणीजवळ येऊन तिला वदन करून उभा राहिला. गिरिराणीने विचारिले "आपण कोण?"

"राणीसाहेब! आज गिरिराज्यातला आनदोत्सवाचा दिवस. आज आपला व अजयसिंहाचा विवाह होणार हे ऐकून मी एक मेवाडचा दरिद्री शिपाई उत्सव बघण्यास आलो आहे. ईश्वरसाक्ष, आज

माझ्या आनदाला सीमा नाहीं आणि ह्मणूनच नवदपतीस अहेर ह्मणून मीं हा मुकुट आणिला आहे. याचा स्वीकार कराल अशी सेवकाला आशा आहे ”

रजपूतसैनिकाने आपल्या वस्त्रातून एक फुलाचा मुकुट बाहेर काढिला व तो राणीजवळ देऊन ह्मटले “राणीसाहेब ! काल रात्रभर जागून मी हा तयार केला आहे. आपण याचा स्वीकार केलात ह्मणजे माझ्या श्रमाचे सार्थक झाले ”

गिरिराणी व चपला त्या मुकुटाकडे आश्चर्यचकित मुद्रेने पाहत राहिल्या फुलाचा इतका सुरेख अलकार कसा करता आला, हे त्याना समजेचना चित्रविचित्र रगानी त्याला फारच शोभा आणिली होती त्याच्या सुगधाने सर्व पुष्पाच्या सुगधास मागे टाकिले होते

गिरिराणी ह्मणाली “व , इतकी सुदर फुळ तुह्माला कुठ सापडली ?”

“राणीसाहेब ! काळ या अरण्यातल्या सर्व लता व तरू बुडून मीं हीं फुले वेचिली ”

चपला ह्मणाली “आणखी हा अलकार कुणी गुफला ?”

“मी आपल्या हातानी ! मी लहानपणीच फुले गुफणे शिकलो होतो आज माझे शिकणे सफल झाले ”

चपलेने बराच वेळपर्यंत सैनिकाच्या तोडाकडे पाहून हसत हसत ह्मटले “पुरुपाना इतका सुरेख मुकुट नसता आला गुफता !”

सैनिकाने चपलेस काहीच उत्तर दिले नाही तो राणीस ह्मणाला “येतो आता राणीसाहेब ! रात्री समारभाच्या वेळेस पुन येईन ”

चपलेने पुढे सरून सैनिकाचा हात धरिला गिरिराणीस या असभ्यपणाचा अतिशय राग आला ती ह्मणाली “चपले ! हे ग काय ? असा चावटपणा माझ्यासमोर करताना तुझ्या जिवाला काहीच नाही वाटत का ग ?”

“बाईसाहेब ! नुसती दाढी असली ह्मणजेच का पुरुष होतो ? याला प्रमाण हे पहा !”

बोलतां बोलता चपलेने सैनिकाचे स्मश्रूचे केश ओढले तो ते गळून पडले. गुडाळून गुडाळून बाधलेले केश पुन्हा नितबभागावर लोंबू लागले. उच्च उरोज तरगाहत कमलाप्रमाणे कापू लागले. मुख-मडल पूर्ण शशीप्रमाण चमकू लागले उद्यानशोभी कुसुमराशीस पराभूत करित व चपला आणि गिरिराणी यास विस्मित करित रजपूत सैनिकाची अतुल सौदर्यमयी भुवनमोहिनी किशोरी बनली ! चपला बराच वेळ या रूपराशीकडे मुग्ध नेत्रानी पहात राहिली. शेवटी ह्मणाली "पाहिलत राणीसाहेब ! मी जेव्हा याना तापसकुमाराच्या वेषात पाहिल, तेव्हाच ह्या पुरुष नाहीत अशी माझी खात्री झाली ही अनुपमेय रूप-ज्योति पुरुषाच्या वेषात लपू शकेल काय ?"

"मी याना मुळीं ओळखल नाही बाई ! विचार, ह्या आपली काही माहिती सागतील तर !" गिरिराणी ह्मणाली

चपलेने सुदरीचा हात धरला व आपली बोटे तिच्या गालावर ठेवून ह्मटले "का योगीराज ! तपोवनातल वर्तमान कस काय आहे ?"

गिरिराणी ह्मणाली "चपले ! थट्टा पुरे कर त्याना फक्त त्याची माहिती विचार."

चपला हात जोडून ह्मणाली "मुनिराज ! मग आपल्या तपाच उद्यापन केव्हा होणार ! कशाकरिता हे व्रत स्वीकारल होत ?"

हिरण्मयी चपलेला काहीच उत्तर न देता गिरिराणीजवळ जाऊन उभी राहिली चपला पुन. तिचा हात धरून गाऊ लागली.—

**"प्रेमयोग मेरि सखी। प्रेमलागि योगिया ॥**
**विभूति कमल अगमे । श्यामरूप प्रानमे ॥**
**ध्यान, ज्ञान मन्त्र आलि । मोरी वनमालिया ॥**
**प्रेमयोग मेरि सखी । प्रेमलागि योगिया ॥"**

हिरण्मयी गिरिराणीस ह्मणाली "राणीसाहेब ! मला इथून जाऊ द्या !"

गिरिराणी उठून उभी राहून ममतापूर्ण वाणीने ह्मणाली "भगिनी ! तू कोण हे जाणण्याची माझी फार इच्छा आहे."

जवळच्या अशोकाच्या झाडाच्या बाजूने एकजण ह्मणाले "ते सर्व मला माहीत आहे !"

या बोलण्याबरोबरच कोणाच्या हास्याचा व टाळ्याचा प्रतिध्वनि उद्यानात झाला. सर्वांनी चकित होऊन पाहिले, तो वेडी हसत हसत पुढें सरली. हिरण्मयीने वेडीकडे पहाताच तिला घेरी आली व धाडकन् ती खालीं पडली गिरिराणी व चपला या दोघी एकमेकींस घट्ट बिलगल्या. वेडीने चपलेचा हात धरून तिला दूर लोटून व गिरिराणीला हृदयाशी धरून ह्मटले "हेच–हेच माझ्या हृदयातल रत्न ! एकदा अशीच राहून माझ्या हृदयास शात कर ! मी तुझी राजराजेश्वरी आई मुमताजबेगम ! तुला एकदा अस हृदयाशीं धरायला सापडाव ह्मणून वेडीच्या वेषात देशोदेशी आज बारा वर्षे हिडत्ये आहे !"

---

## प्रकरण एकतिसावे

## हे गीत कोण गाते ?

सध्याकाळ. पौर्णिमेचा चद्र अझून दिसत नव्हता चिरप्रेममयी कल्लोलिनीचे उच्छ्वास तरगभगात व गीतिनिनादात उसळ्या मारित होते. अमरनदिनी तरगिणी कोणत्या अमरलोकीच्या भाषेत, कोणते स्वर्गीय आलाप घेत सुधाशूला येण्यास आळवित असेल कोण जाणे !

याच निर्जन प्रदेशात हिरण्मयी एकटीच बसून रोदन करित होती बालपणापासूनच्या सर्व गोष्टी तिच्या दृष्टिसमोर चित्रित होत होत्या. बऱ्याच वेळाने डोळे पुसून हिरण्मयी आपल्याशीच ह्मणाली "आज मेवाडराजकुमाराच सुदरी गिरिराणीबरोबर लग्न होणार ! आज अजयसिहाच्या हृदयाशी गिरिराणीच प्राणसमीलन होणार आज माझ्या जीवलग अजयाच्या हृदयातून या पापिणी हिरण्मयीच चित्र अपनीत होणार–असा आज भाग्याचा दिवस ! असा आनदोत्सवाचा दिवस ! मग हिरण्मयीच्या अश्रुबिन्दूनी नर्मदेच पाणी कलुषित का व्हाव बरे ! माझ हृदय–माझा प्राणसखा अजय माझा न होता गिरिराणीचा

होणार ह्मणून माझ्या हृदयात का बर कालवत ? देवा ! तुला माहीत आहे, अजयाच्या क्षणकाल सुखाकरिताहि ही हिरण्मयी शभर वेळा आपली प्राणाहुति देण्यास तयार आहे ! पण देवा ! आज वेडीच्या तोंडून मीं काय ऐकल ? गिरिराणी यवनी ! मुमताज बेगमेची कन्या ! अखेर हिंदुसूर्य प्रतापसिंहाचा पुत्र यवनीशीं विवाहबद्ध होणार ! अजयसिहाला अझून काहींच माहीत नाहीं लग्न झाल्यावर त्याला हे समजल, तर मग मात्र अमृतराशीवर विषबिंदु पडणार ! हा मगलोत्सव झाल्यावर घोर अनर्थ ओढवणार ! देवा ! तू हे काय केलस ?"

हिरण्मयी तेथेच पुष्कळ वेळपर्यंत चिंताग्रस्त बसली होती. अजयसिहाच्या कानावर ही गोष्ट घालावी, असे एकवार तिच्या मनात आले. पण, मग पुन हिरण्मयी त्याच्या हृदयात वास करू लागेल व सत्यप्रतिज्ञ अजय पित्राज्ञेप्रमाणे प्राण देईल ! असा विचार करित हिरण्मयी बसली असता तिला स्वप्नासारखा भास झाला तिला वाटले, आपण उदयपुरच्या राजवाड्यात अजयसिहाशीं होरी खेळत आहो अजयाच्या अगावर अबीर टाकून पळत असता गाणे गात आहो—भान विसरून हिरण्मयी गाऊ लागली —

**प्राण परतोरे जागत प्यारी । मोसे बनमाली चातुरी सारी ।**
**बिनति करू सावलिया तोरी ॥**

एकाएकी कानन, पर्वत, आकाश, समीरण गीतनादाने भरून गेलीं. आज सध्याकाळींच अजयाचे लग्न व्हावयाचे होते. अकबरशहा पुष्कळशी वऱ्हाडी मडळी घेऊन वधूगृहीं जाण्यास निघाला होता. वाद्याचा सारखा गजर होत होता. सर्वांपुढें अकबरशहा व त्याच्या बाजूस मानवदमनावर बसलेला अजयसिंह चालला होता मानवदमनास उदयपुराहून मुद्दाम आणविले होते अजयसिहाचे मुख म्लान दिमत होते अकबराने कारण विचारताच अजयसिह म्हणाला "दिल्लीश्वर ! या वाद्याचा ध्वनि मला कसासाच वाटतो ! हा गजर जरा थाबवायास सागाल काय ?"

अकबराने थोडा वेळपर्यंत वाद्यनाद बंद करवून अजयसिंहास ह्मटले "बेटा अजय! आज या सुखाच्या दिवशी तू सुखी हो, सर्वांना सुखी कर व गिरिराणीच्या प्रेमाचा मोबदला दे!"

इतके बोलून त्याने पुनः वाद्ये वाजविण्यास आज्ञा केली. अजयसिंह एकदम चकित झाल्यासारखा होऊन विव्हल स्वराने ह्मणाला "नको नको! तुह्मी पुनः स्तब्ध राहून हे ऐका—दिल्लीश्वर! हे ऐका!"

अकबराने सद्गदित स्वराने विचारले "काय ऐकू बेटा?"

"ऐका—नदीतटावर कोणी गाणे गात आहे!"

अकबराने स्तब्ध होऊन ऐकिले, तो खरेच! नदीतीरावर कोणी गात होते.

अजयसिंह ह्मणाला "दिल्लीश्वर! येथेच थांबा. सम्राटाची आज्ञा उल्लंघन करून ही कोण व्यक्ति आपल्याबरोबर न येण्याचे साहस करिते, हे मी पाहून येतो. मी पाहून येतो हे गाणे कोण गाते आहे ते!"

---

## प्रकरण बत्तिसावे.

### पवित्र जलात.

क्षणार्धात मानवदमन अजयसिंहास घेऊन नदीतीरावर आला. मधुर-हासिनी तटिनीच्या पात्रापाशी बसून कोणी रमणी पाठीवर केश मोकळे टाकून गायनात दंग असलेली त्याच्या दृष्टीस पडली. ज्या आशैशव-पूजिता प्रतिमेचे आज विसर्जन करून अजयसिंहाने त्या जागी गिरिराणीची स्थापना केली होती, तीच अमृतमयी हिरण्मयी नदीतीरा-वर त्याच्या नेत्रासमोर विराजमान झाली! हिरण्मयी—सुरलोकींच्या देवी-बरोबर मर्त्यलोकीच्या गिरिराणीची काय तुलना करावयाची!

अजयसिंहाने घोड्यावरून उतरून हिरण्मयीचा हात धरून ह्मटले "हिरण! एकदा क्षमा कर—एकदाच माझ्या अपराधाची क्षमा कर!"

"अजय हे काय! आज पुन: तुला या पापिणीची कशी आठवण झाली?"

"हिरण! तुला काय माहीत, हा अजय तुला तुझ्या सिंहासनावरून पदच्युत करून त्यावर दुसऱ्याच कोणाला बसवणार होता! पण देवमुद्रा तुला तेथून पदच्युत करू शकणार नाही, हे मला आज कळले!"

"मग काय झाल? त्या सिंहासनावर बसण्याला कलंकिनी हिरण्मयी अगदीच अयोग्य आहे!"

अजयसिंह आता देहभान विसरला आपल्या दीर्घ–बलिष्ठ–बाहूंचे हिरण्मयीच्या सुकुमार देहलतेवर वज्रकठिण वेष्टन घालून उन्मत्त होऊन त्याने ह्मटले "हिरण! चल सखे! आज वसन्ती पौर्णिमा आहे आपण लहानपणीं खेळत होतो तशी या नदीच्या काठीं खेळू!"

हिरण्मयीच्या अंगातहि या वेळीं अद्भुत बलाने संचार केला अजयसिंहाचा हात झिडकारून ती आवेशाने ह्मणाली "अजय! अजय! हे काय? पापपंकात रुतू नकोस! वीरत्व भ्रष्टवू नकोस! मला स्पर्श करू नकोस! हतभागिनी हिरण्मयीचे ते भाग्याचे दिवस गेले! जा, तुला परमेश्वराची शपथ आहे, जा–गिरिराणीबरोबर आनंदाने रहा! अभागी हिरण्मयीला या कृष्णजलांत प्रवेश करून प्राणविसर्जन करू दे"

अजयसिंहाच्या वमन्यातून रक्तप्रवाह जोराने वाहू लागला दोन वर्षांपूर्वी पित्यापाशी केलेल्या प्रतिज्ञेची त्याला या वेळीं आठवण झाली दोन वर्षे तर होऊन गेली–अजयसिंह हिरण्मयीला विसरला नाही!

नदीच्या प्रवाहाकडे पाहून व आनंदाने टाळी वाजवून हसत हसत अजयसिंह ह्मणाला "हो हिरण! अगदी योग्य बोललीस! गंभीर कृष्णजलांत! दोन वर्षांपूर्वीच बाबा ह्मणाले होते, की, पवित्र जलाच्या शीतल गर्भांत फेकिला असता हृत्पिंडाच्या ज्वाला शांत होतात व उत्तप्त हृदयास शांति मिळते!"

हिरण्मयी हसत हसत ह्मणाली "मलाहि पण एका वेडीन असच सागितल होत. आपण दोघ कृष्णवर्ण जलात आपलीं हृदय शात करू! आज बारा वर्ष झालीं त्या गोष्टीला!"

आता तर त्या उभयताच्या हास्याला सीमाच राहिली नाहीं. परतु ते हास्य भयपूर्ण, कठोरतापूर्ण, अत्यत भयानक—अत्यत विकट! दोघानीहि टाळ्या वाजविल्या व नतर एकमेकास दृढालिगन दिले. मानवदमनानेहि फुरफुरून उभयतास सहानुभूति दर्शविली अजय-सिहाने पुढें होऊन हिरण्मयीस घोड्यावर बसविले व तिला तो हृदयाशी घट्ट धरून बसला. कोणीकडे जावयाचे हे विचारावयासच की काय, मानवदमनाने एकदा नदीकडे व मग अजयसिहाकडे पाहिले अजयसिह हर्षभराने ह्मणाला "मानवदमन! गड्या! तुला नाही समजले का अझून? या तरगिणीच्या शीतल गर्भात जाऊन हृदयातला अग्नि विझवावयाचा आहे. हु—"

अजयसिह अझून परतला नाही, हे पाहून सम्राट् अकबरशहा काहीं लोकानिशीं बुडत याच वेळेस तेथे येऊन पोहोचला अजयसिहाजवळ हिरण्मयीला घोड्यावर बसलेली पाहून सर्वांना आश्चर्य वाटले अकबर ह्मणाला "हे काय अजय! तुला वेड तर नाही लागले?"

अकबरशहा अजयसिहाच्या घोड्यास धरण्यास पुढे झाला, तोच अजयसिह ओरडला "सावध रहा दिल्लीश्वर! एकदा हिरण्मयीला स्पर्श करणाऱ्या यवनाला मी क्षमा करून चुकलो आहे!"

सम्राट् पुन ह्मणाला "अजय! तुला वेड तर नाही लागले?"

"मला वेड लागले की सर्व जगाबरोबर अकबरशहालाच वेड लागले? या हृदयात ही लाडकी हिरण्मयीच राहू शकेल! गिरिराणीची येथे राहण्याची योग्यता नाहीं!"

अजयसिह क्षणभर स्तब्ध बसला. नतर ह्मणाला "दिल्लीश्वर! या मर्त्यभूमीच्या जीवनात काय सार आहे? या हिरण्मयीच्या प्रेमाकरिता

शभरदा प्राणाचा बलि देण्यास मी तयार आहे! बाबाना सागा, की, देव-दानवाचे युद्ध आज सपले! अनत जन्म घेतले तरी अजयसिह हिरण्मयीला विसरू शकत नाही ! ह्मणून त्याची आज्ञा पाळण्याकरिता या मेवाड-वशातील राजपुत्राने त्याच वशातील या पवित्र तरवारीने आपला हृत्पिड काढून या नर्मदानदीत फेकून दिला !"

अजयसिहाने सर्कन म्यानातून तरवार काढली व ती एका हातात धरून दुसऱ्या हाताने हिरण्मयीला घट्ट धरून ठेविले. क्षणार्धात घोड्यास टाच मारून त्याने छातीत तरवार भोसकून घेतली. मानवदमन एकदा फुरफुरला व हिरण्मयी व अजय यास घेऊन पाण्यात शिरला. हिरण्यमयीचे व अजयसिहाचे हृदय नर्मदानदीच्या पाण्यात मिळून गेले! दोन्ही प्राण्याच्या हृदयातला वन्हि शीतल सलिलाने विझवून टाकला. अनत हृदयाचे अनत प्रेम अनत प्रवाहिनीच्या अनत उदरात विलीन झाले !

---

## उपसहार

सात वर्षानतर सम्राट् अकबरशहा याच रस्त्याने पुष्कळसे सैन्य घेऊन दक्षिणेकडे स्वारीवर चालला होता. नर्मदानदीच्या तीराकडून कोणाच्या तरी बासरीचा शब्द त्याच्या कानी पडला त्याने बरोबरच्या लोकास पुढे जाण्यास सागून तो आपण एकटाच तिकडे गेला

बादशहाने पाहिले, गिरिदुर्ग जमीनदोस्त झाला होता, आणि ज्या ठिकाणी अजयसिह व हिरण्मयी याच्या अपार्थिव प्रेमाने अपार्थिव समाधि घेतली होती त्याच ठिकाणी एक लहानशी पर्णकुटी बाधलेली होती नदीतीरावर पर्णकुटीसमोरच एक तपस्विनी भगवी वस्त्रे परिधान करून एकटीच बसून आलाप घेत बासरी वाजवित होती. ही तपस्विनी कोण? दुसरी कोण असणार? गिरिराणी! तापसी गिरिराणीच्या देहावर फक्त एकच अलकार-कठात हिऱ्याची माळ असून ती चादण्यात चमकत होती व तिच्यावरील 'मेवाड राजकुमार अजयसिह' ही अक्षरे स्पष्ट वाचता येत होती तपस्विनीची अमृतनिस्यदिनी बासरी, अमृतमय आलाप घेत व सुधाशूच्या अमृतमय किरणात अमृतराशि मिसळत अमृत-भाषिणी कल्लोलिनीच्या अमृताच्या उच्छ्वासात त्यास विलीन करित व अजयहिरण्मयीच्या अमृत लोकीच्या प्रेमाच्या अमृतमय स्मृतीने अकबर बादशहाला उन्मत्त करित अमृतावर अमृतवर्षाव करित होती! या मर्त्य लोकात इतके अमृत असेल, हे बादशहाला माहीत नव्हते! यापूर्वी या पृथ्वीतळावर इतका निर्विच्छिन्न अमृतमय उच्छ्वास त्याने स्वप्नात किंवा कल्पनेतसुद्धा घेतला नव्हता! या अमृतमय दृश्याची अमृतमय स्मृति त्याच्या अतःकरणात जन्मभर जागृत राहिली!

बऱ्याच दिवसानी ती अमृतमुखी गिरिराणीहि अमृतलोकास निघून

गेली! परतु आह्मी पाहिले आहे, की, नर्मदानदी अझून तसेच अमृतमय उच्छ्वास घेत क्रीडा करित असते व तिच्या तरगभगाने अझूनहि अमृतराशि उचबळतात. तिच्या पवित्र तीरावर जी स्वर्गीय गोष्ट घडली, तिचे स्मृतिचिन्ह तिच्या प्रत्येक लहरीत दिसून येते. आता तेथे एक लहानसे गाव वसले आहे. त्याचे नाव

**अमृतपुलिन.**